# शृंगार श्रीरंग

जयदेव कवी विरचित
"गीतगोविन्दम्" या काव्याचा
भावानुवाद

कवि : राजा बढे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

# श्रृंगार-श्रीरंग

अनुक्रमणिका

# श्रृंगार-श्रीरंग

महाकवि श्रीजयदेव-विरचित ‘गीतगोविन्द’
ह्या महाकाव्याचा रसानुवाद

**राजा बढे**

**महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ**

अनुक्रमणिका

**सप्टेंबर १९८०**

© महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**प्रकाशक**
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**मुद्रक**
व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई ४०० ००४

अनुक्रमणिका

# निवेदन

मराठी भाषेला आणि साहित्याला आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या व आधुनिक सांस्कृतिक मूल्यांच्या आविष्काराचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, विविध विद्या व कलांविषयक उत्कृष्ट ग्रंथांची निर्मिती करून मराठी भाषेला जागतिक उच्च स्थान मिळवून द्यावे या उद्देशाने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने बहुविध वाङ्मयीन कार्यक्रम आखला असून तो व्यवस्थितपणे कार्यवाहीत आणण्याकरिता विश्वकोश समिती, इतिहास समिती, भाषांतर समिती, मराठी वाङ्मयकोश समिती, ललितकला समिती, प्रकाशन समिती आदी समित्या स्थापन केल्या आहेत.

२. ललितकला समितीच्या कार्यक्रमात मंडळाच्या बहुविध वाङ्मयीन कार्यक्रमास अधिक संस्कृतिप्रवण करण्यासाठी ललितकलाविषयक नाट्य, वाद्य, चित्र, शिल्प व संगीत या विषयांचे संशोधन, विवरण व इतिहास यांचा अंतर्भाव आहे. या कार्यक्रमात कला व कलासंबद्ध विषयांवर मूलभूत संशोधन करून लिहिलेले ग्रंथ, संगीत व संगीतशास्त्र, नाट्यशास्त्र व नाटक, नृत्य व शिल्प इत्यादींवरील प्रमाणभूत जुन्या ग्रंथांची भाषांतरे, विविध कलांचा इतिहास, कलाकारांची चरित्रे इत्यादी वाङ्मयाच्या प्रकाशनाबरोबरच संस्कृत व मराठीतर अन्य भारतीय भाषांतील तसेच पश्चिमी व अन्य परदेशी भाषांतील ललितकलाविषयक अभिजात वाङ्मय मराठीत भाषांतरित करून प्रकाशित करण्याचा कार्यक्रम अंतर्भूत आहे. या कलांचा वाङ्मयाच्या द्वारे मराठी वाचकांस संक्षेपाने व विस्ताराने परिचय करून देणे हा मंडळाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

३. या योजनेखाली मंडळाने कै. के. नारायण काळे यांनी अनुवादित केलेली स्तानिस्लाव्स्कीची ‘अभिनय साधना’ आणि ‘भूमिका शिल्प’, श्री. श्री. ह. देशपांडे यांनी अनुवादित केलेले कोपलँडचे ‘संगीत व कल्पकता’, प्रा. र. पं. कंगले अनुवादित ‘रस-भाव-विचार’ व ‘दशरूपक विधान’ (भरतनाट्यशास्त्र—रससिद्धान्तविषयक अध्याय ६ व ७ आणि नाट्यशास्त्रविषयक अध्याय १८ व १९ ची भाषांतरे), श्री. श्री. ह. देशपांडे अनुवादित ‘महाराष्ट्राचे संगीतातील कार्य’, प्रा. ग. ह. तारळेकर अनुवादित शाङ्र्गदेवाचे ‘संगीतरत्नाकर—भाग १’, स्ट्रॅविन्स्कीचे ‘सांगीतिक सौंदर्यशास्त्र’ (भाषांतरित), तसेच, डॉ. श्री. ना. रातंजनकर यांनी लिहिलेले ‘पं. विष्णु नारायण भातखंडे’ यांचे चरित्र, श्री. बा. गं. आचरेकर लिखित ‘भारतीय संगीत व संगीतशास्त्र’, डॉ. शं. अ. टेंकशे लिखित ‘रागवर्गीकरण’, डॉ. बी. चैतन्य देव यांचे ‘भारतीय वाद्ये’, म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांचे ‘कालिदास’ (तृतीयावृत्ती) व डॉ. श. वि. गोखले यांचे ‘लय-ताल-विचार’ अशी पुस्तके प्रकाशित केली आहेत. नंदिकेश्वराचे ‘अभिनयदर्पण’, भामहाचे ‘काव्यालंकार’, आनंदवर्धनाचे ‘ध्वन्यालोक’, दण्डीचे ‘काव्यादर्श’, कवी हालाची ‘गाथासप्तशती’, कवी बिहारीची ‘सतसई’, इत्यादी ग्रंथांची भाषांतरे मंडळाच्या वतीने क्रमाने प्रकाशित व्हावयाची आहेत. याशिवाय, श्री. पार्वतीकुमार संपादित ‘तंजावरची नृत्यसाधना’, डॉ. भा. कृ. आपटे संपादित ‘Maratha Wall Paintings’ हे ग्रंथही लवकरच मंडळाच्या वतीने प्रकाशित होणार आहेत.

४. मंडळाने स्वतः प्रकाशित केलेल्या व करावयाच्या ललितकलाविषयक ग्रंथांखेरीज तज्ज्ञ लेखक व कलाकार आणि कलासंस्था यांना कलाविषयक संशोधनासाठी व प्रकाशनासाठी मंडळाने अनुदाने दिली आहेत. श्री. ह. वि. दात्ये यांची ‘गायनी कळा’, श्री. निखिल घोष यांचे ‘रागतालाची मूलतत्त्वे’ व ‘अभिनय

स्वरलेखन पद्धती' (इंग्रजीत व मराठीत), डॉ. अशोक दा. रानडे यांचे 'संगीताचे सौंदर्यशास्त्र', पं. बाळकृष्ण कपिलेश्वरी यांचे 'श्रुतिस्वरदर्शन' व 'स्वरप्रकाश', डॉ. ना. ग. जोशी यांचे 'मराठी छंदोरचनेचा विकास', श्री. वा. र. देवधर यांनी लिहिलेले 'कै. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे चरित्र' व 'थोर संगीतकार' इत्यादी ग्रंथांच्या प्रकाशनाकरिता मंडळाने सुयोग्य अनुदाने दिली आहेत. गांधर्व महाविद्यालयाच्या 'संगीत कला विहार' या मासिकालाही गेली अनेक वर्षे मंडळाचे अनुदान दिले जात आहे.

५. संगीत विषयातील संशोधनाच्या संदर्भात, रुपारेल महाविद्यालय, मुंबई, येथील भौतिकी विभागामध्ये मंडळाच्या अनुदानाने संगीत-ध्वनि-विज्ञानाचे मौलिक संशोधन झाले आहे. त्यामधून व्यावहारिक उपयोगाच्या दृष्टीने लक्षणीय अशी माहिती वा वाद्य मिळू न शकल्यामुळे ते कार्य आता स्थगित केले आहे. तानसेन म्युझिक ॲकॅडेमी, मुंबई, या संस्थेला स्वयंचलित 'सूरमंडल' तयार करण्यासाठी मंडळाने अनुदान दिले होते. श्री. बा. दा. मोहिते, सांगली, यांना ४८ श्रुतींवर आधारलेल्या सप्तकाची बाजाची पेटी तयार करण्यासाठीही अनुदान दिले आहे. डॉ. ह. वि. मोडक, वास्तव विभाग, वाडिया महाविद्यालय, पुणे, यांना दक्षिण भारतातील देवळांतील स्तंभांमधून निघणाऱ्या संगीतसुरांच्या संशोधनाकरिताही अनुदान दिले असून त्यांची ध्वनिमुद्रिते व संशोधनपूर्ण निबंध तयार झाला आहे. दंडतारविरहित तंबोरा तयार करण्याचा प्रयत्न कै. डॉ. श्री. व. निंभोरकर, अमरावती, यांनी काही वर्षे केला. त्याकरिताही मंडळाने अनुदान दिले आहे. पं. अंबालाल सितारी यांना तंबोऱ्याच्या तीन मूलाकृती तयार करण्यासाठी मंडळाने अनुदान दिले असून प्रयोगांती त्यांनी खर्चाच्या दृष्टीने स्वस्त व रचनेच्या आणि हाताळणीच्या दृष्टीने सोप्या अशा तंबोऱ्याच्या तीन मूलाकृती तयार केल्या आहेत. एकंदरीत संशोधनाच्या प्रयत्नांतून प्रायोगिक उपयुक्ततेच्या दृष्टीने लक्षणीय यश प्राप्त झालेले नाही हे येथे नमूद केले पाहिजे. परंतु, संशोधनाचे प्रयत्न सतत चालले पाहिजेत, म्हणून मंडळ सतत प्रयत्नशील आहे. परिणामी जिथे आधी संशोधन केवळ अभावानेच माहीत होते अशा भारतीय तंबोऱ्याच्या क्षेत्रातही पं. अंबालाल सितारी यांना मंडळाने दिलेल्या अनुदानाने संशोधनाचे पहिले पाऊल पडले आहे. जे. ग्रिफिथ्स या इंग्लिश संशोधन कलावेत्त्याने अजिंठा येथील चित्रांचा संग्रह काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला. अजिंठा येथील चित्रकला ही भारतातील प्राचीन चित्रकलेचा एक वैभवशाली भाग आहे. या चित्रसंग्रहाचे पुनर्मुद्रण करून ते प्रकाशित करण्याची कार्यवाहीदेखील मंडळातर्फे चालू आहे.

६. कै. कवी राजा बढे यांनी केलेल्या जयदेव कवीच्या 'गीतगोविन्दम्' या संस्कृत ग्रंथाचा प्रस्तुतचा मराठी अनुवाद 'श्रृंगार-श्रीरंग' या शीर्षकाने प्रकाशित करण्यास व मराठी वाचकांना सादर करण्यास मंडळास आनंद होत आहे. 'गीतगोविन्दम्' काव्याची रचना गायनासाठी झालेली असल्यामुळे अनुवादातही गायनसुलभता साधण्याच्या दृष्टीने कै. बढे यांनी चांगलीच दक्षता घेतली आहे. जयदेव कवी आणि मधुरा भक्ती या विषयावर, अष्टपदीच्या गायनपद्धतीवर आणि त्या गीतांनी नृत्यकलेच्या क्षेत्रात केलेल्या कार्याविषयी माहिती देणारी, रसिक पंडित प्रा. अरविंद मंगरूळकर यांची 'प्रस्तावना' या ग्रंथास लाभल्यामुळे या ग्रंथाचे मोल निश्चितच वाढले आहे.

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ

अनुक्रमणिका

वाई

श्रावण २४, शके १९०२

दिनांक १५ ऑगस्ट १९८०

अनुक्रमणिका

# प्रस्तावना

## श्रीजयदेव, 'गीतगोविन्द' आणि मधुरा भक्ती

### अरविन्द मंगरूळकर

'गीतगोविन्द' ह्या काव्याचा कर्ता जयदेव हा कवी. जयदेवाचा काळ ख्रिस्तशकाच्या बाराव्या शतकातला. म्हणजे संस्कृत वाङ्मयसंसाराचा उभारीचा काळ संपल्यानतरचा. संस्कृत वाङ्मयाच्या अस्सल आणि ऐनजिनसी ऊर्जितावस्थेचा, अर्थात निर्मितीचा काळ त्यापूर्वी कित्येक शतके होऊन गेला. जुने नमुने सुबकपणे घटवून-गिरवून काढणे किंवा त्यांत तपशिलांची भर घालणे हाच प्रमुख उद्योग आता उरला होता. रूढ चाकोरीतून सुटण्याच्या प्रयत्नापेक्षा किंवा साक्षात बंडखोरीपेक्षा युगप्रवृत्तीची मुद्रा मिरवीत राहणे हा ह्यापुढील संस्कृत वाङ्मयाचा एक साधारण विशेष आहे. ह्या युगप्रवृत्तीचा पाठपुरावा जसा प्राचीन समीक्षकांनी केलेला आहे, तसाच तत्कालीन कलावंतांनीही तो राजीखुषीने केलेला आहे. त्यात पुष्कळदा अनुकरण आहे; कधीकधी स्पर्धा आहे. असे दिसते की, समीक्षक आणि कलावंत ह्यांनी एकमेकांची जणू कोंडी केलेली आहे! काव्याचे विशेष जाणून, पारखून समीक्षकांनी त्यांचे सूक्ष्म विवेचन करावयाचे, आणि उत्तरकालीनांनी त्या विवेचनाच्या अनुसाराने रचना करावयाची. आणखी असे की, संस्कृत काव्यवाङ्मयाला संकेतनिष्ठतेचा जो एक दुर्धर शाप आहे, त्याला ह्या काळाच्या आगेमागे भर आलेला दिसतो. नाटकात काय किंवा काव्यात काय, ही संकेतसारणी प्रबल आहे.

**जयदेव**

संस्कृत वाङ्मयामध्ये तीन वा अधिक जयदेवांचा उल्लेख येतो, आणि त्यांच्यामध्ये कधीकधी घोटाळाही झालेला आहे. हे तिन्ही जयदेव आपापल्या परींनी प्रसिद्ध आहेत. पहिला 'गीतगोविन्द' कार जयदेव. हा बाराव्या शतकातला. दुसराही जयदेव बाराव्याच शतकातला; पण तो 'प्रसन्नराघव' ह्या नाटकाचा रचयिता आणि 'चन्द्रालोक' ह्या साहित्यशास्त्रग्रंथाचा कर्ता. 'पीयूषवर्ष' हे ह्याचे दुसरे नाव. आणि तिसरा जयदेव हा मिथिलावासी न्यायशास्त्रज्ञ. आपल्याला ह्यांतील 'गीतगोविन्द' कार जयदेवाचा विचार करावयाचा आहे.

'गीतगोविन्द'कर्ता जयदेव ह्याच्या वडिलांचे नाव 'भोजदेव' आणि आईचे नाव 'वामदेवी' किंवा 'रामादेवी' किंवा 'राधादेवी'. आपल्या मातापित्यांचा निदश जयदेवाने स्वतःच आपल्या 'गीतगोविन्दा'च्या शेवटच्या बाराव्या सर्गात केलेला आहे. [श्रीभोजदेवप्रभवस्य रामादेवीसुतश्रीजयदेवकस्य, १२·२४·१२]. जयदेवाचा जन्म आजच्या पश्चिम बंगाल प्रदेशाच्या बीरभूम जिल्ह्यातल्या 'कें (किं) (ति) दुबिल्व' ह्या गावी झाला. (किन्दुबिल्वसमुद्रसंभवरोहिणीरमणेन, ३·७·८) हे 'केंदुबिल्व' म्हणजे 'अजय' ह्या नदीच्या काठचे आजचे 'केंदुली' हे गाव. ह्या गावी आजदेखील प्रत्येक वर्षी माघमासाच्या शेवटच्या दिवशी जयदेवाच्या स्मरणार्थ 'यात्रा' भरते. आणि ह्या आपल्या गावी जयदेव हा 'कविराज' म्हणूनच ओळखला जातो. असा त्याचा मान आहे. जयदेव हा परम कृष्णभक्त आणि थोर साधू होता. त्याच्या बायकोचे नाव पद्मावती. तिचा उल्लेख त्याने आपल्या काव्यात दोनदा (१·२; ११·२१·८) केलेला आहे. पद्मावती ही प्रथम नर्तकी होती; नंतर तिने जयदेवाशी विवाह केला. तसेच, देवळात ती जेव्हा नृत्य करीत असे, तेव्हा तिच्या नृत्यपदन्यासांना अनुबंधी असे अनुगान जयदेव स्वतः करीत असावा, जसे त्याच्या पहिल्याच सर्गाच्या दुसऱ्या श्लोकातील 'पद्मावतीचरणचारणचक्रवर्ती' ह्या स्वतःलाच अनुलक्षून आवर्जून योजिलेल्या पदावरून

उघड होते [वाग्देवताचरितचित्रितचित्तसद्मा पद्मावतीचरणचारणचक्रवर्ती । श्रीवासुदेवरतिकेलिकथासमेतमेतं करोति जयदेवकविः प्रबन्धम् ॥ गीतगोविन्द, १·२]. जयदेवाविषयी अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. त्यांवरून त्याची लोकप्रियता जरी ध्यानात येत असली, तरी त्यांना ऐतिहासिक सत्याचा आधार कितपत आहे ते सांगता येत नाही. पहिल्याच सर्गाच्या चौथ्या श्लोकात जयदेवाने 'आर्यासप्तशती'कार गोवर्धनाचार्य, शरण, उमापतिधर, श्रुतिधर आणि धोयी ह्या पाच कवींचा कवित्वाच्या बाबतीत काहीशा अधिक्षेपाने उल्लेख केलेला आहे. ह्यावरून असे वाटते की, हे सहाही कवी ज्येष्ठ-कनिष्ठ समकालीन असावे. पराशर ह्या नावाचा आपला एक मित्र असल्याचा उल्लेख त्याने 'गीतगोविन्द', १२·२४·१२ ह्यात अभिमानाने केला आहे. स्वतः जयदेव हा बंगालच्या सेन-वंशातल्या लक्ष्मण सेनाच्या काळी (इ.स. १११९) (कीथच्या मते ११८०–१२००) होऊन गेला. आणि तो त्याचा आश्रितही असावा; कारण लक्ष्मण सेनाच्या सभाद्वारावरील लेखात वरील कवींसकट जयदेवाचा उल्लेख आहे. हा झाला जयदेवाचा साक्षात उल्लेख. श्रीधरदासाच्या १२०६ ह्या वर्षाच्या 'सदुक्तिकर्णामृता'त जयदेवाची अवतरणे आलेली आहेत; आणि १२९२ ह्या वर्षाच्या एका शिलालेखात 'गीतगोविन्दा'तल्या दशावतारस्तुतीचा एक श्लोक आलेला आहे. त्यावरून ह्या वेळेपर्यंत तो कवी म्हणून सुप्रतिष्ठित झालेला असावा. अर्थात जयदेवाचा काळ खचित १२०६-पूर्वीचा आहे, असे अनुमान सहजच करिता येते. 'गीतगोविन्द' हे वैष्णवभक्तिपर काव्य आहे. त्यामुळे विष्णुभक्ती जेथे विपुल प्रमाणाने रूढ आहे, ते मिथिला आणि ओडिसा हे दोन्ही प्रदेश जयदेवावर आपला हक्क सांगतात. बंगालही तो हक्क सांगतो. अशा प्रकारे जयदेव हा बंगाली, की मैथिल, की उडिया, असा एक वाद आहे. प्राचीन काळी ओडिसाचा असलेला काही भाग आज बंगालचा झालेला आहे. त्यामुळे हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होतो. पण बहुधा जयदेव हा उडिया असावा. जयदेवाविषयी व्यक्तिगत आणि विश्वसनीय अशी इतकीच माहिती आपल्याला सांगता येण्यासारखी आहे.

केवळ एकाच काव्याने ज्यांना दिगंत कीर्ती मिळाली, अशा फार थोड्या कवींमध्ये जयदेवाची गणना आहे. 'गीतगोविन्द' हे काव्य केवळ संपूर्ण भारतात नव्हे, तर पाश्चात्त्य देशांमध्येही त्याच्या माधुर्यामुळे आणि सरलतेमुळे अत्यंत लोकप्रिय झाले आहे. डॉ. कीथ ह्यांनी आपल्या 'संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासा'त असे म्हटले आहे की,

"Jayadeva is a master of form and diction, and above all he is not merely of remarkable skill in metre, but he is able to blend sound to emotion in a manner that renders any effort to represent his work in translation utterly inadequate."

रवींद्रनाथ ठाकुरांच्याही मनावर 'गीतगोविन्दा'ची विलक्षण मोहिनी पडली होती. आपल्या 'Reminiscences' या पुस्तकामध्ये त्यांनी म्हटले आहे की, "'गीतगोविन्दा'चे शब्दसौष्ठव आणि गीतमाधुर्य ह्यांमुळे ह्या काव्याची माझ्या अंतरंगावर इतकी आश्चर्यकारक व मधुर चित्रे उमटली की, माझ्या खास उपयोगासाठी संबंध 'गीतगोविन्दा'ची एक प्रत स्वतः लिहून घेतल्यावाचून मला चैन पडले नाही." भारतातल्या भिन्नभिन्न प्रदेशांत 'गीतगोविन्दा'वर चाळिसांहून अधिक टीका लिहिल्या गेल्या आहेत. विविध सुभाषितसंग्रहात 'गीतगोविन्दा'तली अनेक अवतरणे आलेली आहेत; आणि 'मेघदूता'प्रमाणेच त्याची कितीतरी अनुकरणे झालेली आहेत; निदान बारातरी उपलब्ध आहेत. परंतु त्यांतल्या एकालाही 'गीतगोविन्दा'च्या आसपासही फिरकता आलेले नाही. कोणत्याही श्रेष्ठ कृतीच्या अनुकरणाचे नशीब असेच असते. मुळाचा दर्जा इतका सरस आणि श्रेष्ठ असतो की, त्याचा मोह तर अनिवार असतो; पण त्याचे अंतरंग

अनुक्रमणिका

तितकेच अजोड आणि आलवार असते. ‘गीतगोविन्दा’तल्या गीतावली आजही ओडिसाच्या वैष्णव देवालयांत नर्तकीकन्या नृत्यगायनासमवेत भावभक्तीने गात असतात, आणि त्यांच्या ‘मधुरकोमलकान्तपदावली’ ऐकताना भक्तजन धुंदफुंद होऊन जातात. आणि आजही जगन्नाथाच्या रथयात्रोत्सवाच्या वेळी एकोणिसावी अष्टपदी एका मखमलीच्या कापडावर लिहून ती जगन्नाथाच्या (देवाच्या) हातात देतात!

हे झाले ‘गीतगोविन्दा’च्या भारतातल्या लोकप्रियतेविषयी. पण पाश्चात्त्य देशांतही ‘गीतगोविन्दा’च्या कोमल रचनेने विलक्षण भुरळ घातलेली आहे. १८०७-मध्ये सर वुइल्यम जोन्झ्‌ने आणि १८७५-मध्ये एड्‌विन् आर्नोल्ड्‌ने त्याचे इंग्रजीत भाषांतर केले. १९०४-मध्ये कूर्त्लिए, फूशे ह्यांनी त्याचे फ्रेंचमध्ये भाषांतर केले. डाल्बेर्ग, रूकेर्ट इत्यादिकांनी त्याचे जर्मनमध्ये, तर फादेगोन् इत्यादिकांनी डच भाषेत त्याचे भाषांतर केले. परंतु ह्यांतल्या कोणत्याही भाषांतराला मूळच्या अद्वितीय नादसौंदर्याची अल्पशीही बरोबरी करिता आली नाही, असा त्या त्या भाषेतील जाणकरांचा अभिप्राय आहे. जर्मन महाकवी गोय्‌टऽ ह्याच्याही मनावर ‘गीतगोविन्दा’च्या नादवत्तेची इतकी मोहिनी पडली होती की, त्याचे आपण स्वतः भाषांतर करावे, असे त्याने एकदा म्हटले होते. जयदेव गुजरातीतही गेला आहे. मराठीत त्याचे चारपाच अनुवाद झालेले आहेत. १८४५-च्या सुमारास भावाचार्य अष्टपुत्रे ह्यांनी ‘भावार्थदीपिका’ ह्या नांवाने ह्या काव्यास धरून समश्लोकी काव्य रचिले; आणि चेतोहर देव यांनी १८८८-मध्ये ‘गीतगोविन्दा’चा सटीप श्लोकबद्ध अनुवाद केला. गोविंदराव टेंबे ह्यांनी जयदेवाच्या चरित्राला अनुलक्षून ‘जयदेव’ नावाचे स्वरनाट्य रचिले असून ते संपूर्ण संगीतमय आहे. त्याचे पुण्या-मुंबईस रंगभूमीवर प्रयोग झालेले आहेत. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे ह्यांचा ‘सुश्लोकगोविन्द’ उल्लेखनीय आहे. अलीकडे श्री. आनंद साधले ह्यांनीही ‘गीतगोविन्दा’चा गद्य अनुवाद केला आहे. वस्तुतः ‘गीतगोविन्द’ हे भाषांतरातीत आहे.

## गीतगोविन्द

‘गीतगोविन्द’ हे कृष्णभक्तिपर काव्य खरे, पण ते स्तोत्रकाव्य नाही, किंवा कथा-काव्यही नाही; ते केलिकाव्य आहे. वृंदावनातल्या राधाकृष्णाच्या वासंतिक रतिलीलांचे वर्णन ज्यात मनोहारितेने गुंफिलेले आहे, असे ते एक शृंगार-भक्तिपर काव्य आहे. म्हणजे शृंगाराच्याद्वारा त्यात भक्ती हे साध्य कल्पिले आहे. त्याचे एकूण सर्ग बारा. हे सर्ग छोटे-छोटेच आहेत. एका बैठकीत वाचून संपतील असे; पण घोळवून-घोळवून वारंवार (मोठ्याने) वाचावे असे. ह्या सर्गांची प्रबंधवार अंतर्गत विभागणी केलेली आहे. ‘प्रबंध’ ही गेयरचना असून तो संगीतातील एक जुना पारिभाषिक शब्द आहे. [चतुर्भिर्धातुभिः षड्‌भिश्चाङ्गैर्यस्मात् प्रबध्यते। तस्मात् प्रबन्धः कथितो गीतलक्षणकोविदैः ॥ — संगीतरत्नाकर. तसेच, पहा : ‘बालसंगीतबोध’ (पुस्तक तिसरे : १९०६), नारायण दासो बनहट्टी, पृ. ३९–४२.] हा ‘प्रबंध’ विभाग स्वतः जयदेवानेच केलेला आहे, की कोणा उत्तरकालीनाने ‘गीतगोविन्दा’ची संगीतानुकूलता लक्षात घेऊन तो केलेला आहे, ते सांगता येत नाही. पण ‘गीतगोविन्द’ वाचताना असे ध्यानात येते की, हा प्रबंधविभाग अगदीच काही तांत्रिक वा यांत्रिक नाही. उदाहरणार्थ, पहिल्या सर्गात चार ‘प्रबंध’ आहेत. परंतु पहिल्या प्रबंधापूर्वी मंगलाचरणाचे चार श्लोक आहेत, ते सर्व विविध गणवृत्तांत आहेत. परंतु त्यांच्यापुढे येणारा पहिला प्रबंध मात्रावृत्तात आहे. तो संपल्यावर एक श्लोक गणवृत्तात व त्याच्या नंतरचा दुसरा प्रबंध मात्रावृत्तात. नंतर पुन्हा दोन श्लोक दोन गणवृत्तांत आल्यानंतर तिसरा प्रबंध मात्रावृत्तात. पुढे तीन श्लोक विविध गणवृत्तांत आणि चौथा प्रबंध मात्रावृत्तात. आणि सरतेशेवटी तीन श्लोक एकाच गणवृत्तात. असे बारा सर्गांत एकूण चोवीस प्रबंध आहेत. मात्र पहिल्या सर्गाचाच नमुना शेवटपर्यंत आहे, असे नाही. सर्गांतील प्रबंधांची आणि श्लोकांची संस्था बदलती आहे.

अनुक्रमणिका

ही सर्गप्रबंधविभागणी तंतोतंत समसमानतेच्या (symmetry) तत्त्वानुसार यांत्रिकपणाने केलेली नाही, हे लयदृष्ट्या विशेष हृदयंगम झाले आहे. गण-मात्रावृत्तांचा संगीतानुकूल मेळ घातल्यामुळे हे प्रबंध वाचताना (खरे म्हणजे 'ऐकताना'; कारण त्यायोगेच त्यांच्या नादवत्तेची अस्सल खुलावट होते.) मनाला सुखदायक हेलकावे मिळतात, आणि साहित्य-संगीताने मन आणि कान तृप्त होतात. 'गीतगोविन्द' ही जशी साहित्यकृती आहे, तशीच ती गीतकृतीही आहे, हे 'गीतगोविन्द' ह्या नावावरूनदेखील स्पष्ट आहे. तसाच त्यात नृत्याचाही अनुबंध असल्यामुळे ताल अपरिहार्य आहे. अर्थात 'नृत्यं गीतं तथा वाद्यं त्रयं संगीतमुच्यते' हे लक्षात घेता ते यथार्थपणे 'संगीत' आहे, हे उघड आहे.

सर्गप्रबंधविभागणीचे वर जे विवेचन केले, ते पाहता ही विभागणी स्वतः जयदेवानेच केलेली असावी, असे वाटते. सर्व सर्गांत अशीच योजना आहे. तात्पर्य हे की, गणवृत्तांतले श्लोक कधी प्रस्तावनेसारखे आहेत, तर कधी ते संस्कृत नाटकामधल्या विष्कंभकाप्रमाणे कथेच्या जोडणीसाठी रचिले आहेत. ह्या श्लोकांना 'युतिश्लोक' म्हणता येईल. 'प्रबंध' हा एक संगीताचा जुना प्रकार आहे. अर्थात प्रबंध हे राग-तालांमध्ये गाइले जात असत. त्यांशी नृत्याचाही येथे संबंध. त्यामुळे असे संभवनीय आहे की, प्रस्तावाचे गणवृत्तांतले श्लोक हे कोणा दुसऱ्या गायकाने पठनपूर्वक 'म्हणावयाचे' [संस्कृत नाटकांतही सूत्रधार नांदीश्लोकाचे 'पठन'च ('गायन' नव्हे,) करीत असे. पहाः सूत्रधारः पठेन्नान्दी मध्यमं स्वरमाश्रितः ।—नाट्यशास्त्र.], आणि नंतरचा 'प्रबंध' हा रागतालानुसार नृत्य करीत येणाऱ्या केंद्रवर्ती नर्तकवृंदाने 'गावयाचा' (प्राचीन काळी नर्तकी स्वतः गात-गात नृत्य करीत असत. मालविकेने गीतासह केलेले 'छलित' नावाचे नृत्य हा ह्याचा कालिदासकालीन पुरावा होय.) प्रबंध हा रागतालबद्ध. त्यातील तालाशी नृत्याचा अपरिहार्य असा संबंध; कारण लयतालांवाचून नृत्याची कल्पनाही अशक्य. प्रबंधाच्या शब्दांमध्ये आणि अर्थामध्ये नाट्य, म्हणजे अभिनय गुंफिलेला; आणि ह्या नाट्याचा, अर्थात विविध भावांचा आणि अभिनयाचा नृत्यात आविष्कार केलेला. अशा प्रकारे 'गीतगोविन्द' ही साहित्य, गीत, नृत्य, भाव, अभिनय या सर्वांचा संमिश्र आविष्कार करणारी अपूर्व कलाकृती आहे. तिच्या प्रायोगिक संपन्नतेसाठी या सर्वांच्या संकलित जाणकारीची अपेक्षा आहे; कारण त्यायोगेच त्याचा घाट अथवा बंदीश सिद्ध होणार.

जयदेवाने आरंभी स्वतःला अनुलक्षून 'पद्मावतीचरणचारणचक्रवर्ती' (१·२) असे म्हटले आहे, ते मला दुसऱ्या एका अर्थाने फार साभिप्राय वाटते. तो स्वतःला 'चक्रवर्ती' म्हणवितो. अर्थात तो 'चारणां'चा चक्रवर्ती. म्हणजे भाटांचा सम्राट, हा एक (व्याकरणाला न मानवणारा, पण रसिकाला जाणवणारा) अर्थ. हे चारण पद्मावतीच्या चरणांचे चारण होत. 'चरण' हे ह्यातील पद उघडच नृत्याचे, म्हणजे नृत्याच्या पदन्यासांचे सूचक आहे. 'चारण' (भाट) हे पद स्पष्टपणे संगीताचे बोधक आहे; आणि 'चक्र' (समुदाय, वृंद) हे पद वृंदगान, वृंदनर्तन आणि वृंदवादन ह्यांचे प्रतीक आहे. हे सर्व समासपद जयदेवाचे विशेषण असल्याने तो 'चक्रवर्ती' म्हणजे या सर्व मंडलाचा नेता असावा, असे म्हणणे अयुक्तिक ठरणार नाही. ह्यात नर्तकी असलेल्या पद्मावतीची, अर्थात जयदेवाच्या भार्येची (पद्मावती = लक्ष्मी असाही अर्थ) प्रशंसा तर सूचित आहेच पण जयदेवाने स्वतःचे स्थानही त्यायोगे दर्शविलेले आहे. 'करोति जयदेवकविः प्रबन्धम्' असे म्हणून आपण 'प्रबंधकार' असल्याचे त्याने येथे सांगितलेच आहे. पण 'गीतगोविन्द' ही वर विवेचिल्याप्रमाणे प्रयोगशरण कलाकृती असल्याने तिच्या प्रयोगाच्या वेळी पद्मावतीच्या नृत्यातील पदन्यासांची प्रशंसा करणाऱ्या भाटांच्या समुदायातील तो प्रमुख होता, असेही त्याने स्पष्ट म्हटले आहे. त्याचप्रमाणे कृष्णाच्या प्रेमलीला हा प्रस्तुत प्रबंधाचा विषय असून हे काव्य महाकाव्य अथवा खंडकाव्य नसून 'केलिकाव्य' ह्या वाङ्मयप्रकाराचे आहे, असे ह्या पहिल्या सर्गाच्या दुसऱ्याच श्लोकात विधान आहे.

अनुक्रमणिका

हे सर्व निर्देश 'गीतगोविन्दा'ची घडण समजावून घेण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. त्यामुळेच 'प्रबंधां'च्या शिरोभागी जे राग आणि ताल दिलेले आहेत, तेही स्वतः जयदेवानेच दिलेले असावे, ह्याविषयी शंका राहत नाही. अर्थातच जयदेव हा साहित्याचा निर्मितिक्षम जाणकार, कुशल रचनाकार, उत्तम, संगीतज्ञ, चांगला तालज्ञ आणि सूक्ष्मदर्शी नृत्यज्ञ होता. 'गीतगोविन्दा'ची रचना पाहता त्याला अनुसरणारे नृत्य हे 'भावाश्रयी नृत्य' होते, केवळ ताललयांचा आविष्कार करणारे 'नृत्त' नव्हते, हेही उघड आहे. ह्या संदर्भात 'अन्यद् भावाश्रयं नृत्यं नृत्तं ताललयाश्रयम्' ही 'नृत्य' आणि 'नृत्त' यांची शास्त्रोक्त आणि परंपरेमध्येही टिकून राहिलेली स्वरूपे लक्षात घेणे येथे असल्याचे आहे.

'गीतगोविन्दा'त जे नृत्य योजिले जात होते, ते कोणत्या प्रकाराचे असावे?

आजमितीस ओडिसा, आंध्राचा मध्यपूर्वभाग आणि तमिळनाडू येथे अनुक्रमाने नांदणारे 'ओडिसी', 'कुचिपुडी' (हे आंध्रातील एका गावाचे नाव आहे) आणि 'भरतनाट्यम्' असे नृत्याचे तीन प्रकार आपल्याला माहीत आहेत. हिंदुस्थानाच्या पूर्वकिनाऱ्यास ओडिसापासून दक्षिणेपर्यंतचा जो पट्टा आहे, तेथे ह्या तीन प्रकारांची नांदणूक झालेली आहे. हे तिन्ही देवालयांमधील देवपूजेच्या वेळचे दासीनृत्याचे ('दासीआट्टम्'चे) प्रकार होते. त्यांमधून त्यांचा आजचा विकास झालेला आहे. अर्थात जयदेवाच्या नांदणुकीचा परिसर पाहता त्याच्या काळी असलेले नृत्य आजच्या 'ओडिसी' ह्या नृत्यप्रकाराचे बाराव्या शतकातले बीजभूत नृत्य असावे, हे अनुमान सयुक्तिक ठरेल. आजचे वरील तिन्ही नृत्यप्रकार भरतनाट्यशास्त्रात सांगितलेल्या, स्वरूपाशी जवळचे नाते सांगणारे प्रकार आहेत. तेव्हा 'गीतगोविन्दा'चे बाराव्या-तेराव्या शतकातले नृत्य भरतनाट्यशास्त्रानुसारी असावे, हे उघड आहे. विशेष रूपाने लक्षात घ्यावयाची गोष्ट ही की, ओडिसी, कुचिपुडी आणि भरतनाट्यम् ह्या तिन्ही प्रकारांच्या नृत्यकार्यक्रमांमध्ये आजही 'अष्टपदी'चा एक कार्यक्रम समाविष्ट असतो. अर्थात तो आजच्या त्या-त्या शैलीला, रागांना आणि तालांना अनुसरून दर्शविला जातो. पण मुद्दा हा की, जयदेवकालीन 'गीतगोविन्दा'ची परंपरा आजही टिकून आहे.

'गीतगोविन्दा'चा नृत्याविष्कार कसा करावा, ह्यासंबंधीचे एक जुने हस्तलिखित तंजावूरच्या 'सरस्वती-महाल' ग्रंथालयाने प्रकाशित केलेले आहे. हे हस्तलिखित त्यातील काही सर्गांनाच अनुलक्षून रचिलेले आहे; पण ते अतिशय तपशिलाचे आहे. कोणत्या चरणाला, कोणत्या शब्दाला, कोणती नृत्यमुद्रा करावी, ह्याचे सविस्तर असे पारिभाषिक वर्णन त्या पुस्तकात दिलेले आहे. फक्त त्यात पदन्यासही त्या-त्या वेळी कसे करावे, एवढे दिलेले नाही. तथापि आहे त्या स्थितीत 'गीतगोविन्दा'ची ही जुन्या काळची नृत्यलिपी (notation) आपल्याला उपलब्ध होते. हा एक महत्त्वाचा पुरावा आहे, ह्यात शंका नाही. [ह्या परिच्छेदातील माहिती भरतनाट्यम्-नर्तकी सौ. सुचेता चापेकर (भिडे) यांच्या कृपेने मिळालेली आहे.]

अशा प्रकारे पठन, गायन आणि नर्तन ह्या सर्वांच्या मिलाफामुळे 'गीतगोविन्दा'चा वाङ्मयीन, स्वरमय आणि नृत्यात्मक आविष्कार दृश्य आणि श्राव्य असा उभयविध झालेला आहे. 'गीतगोविन्द' हे नाव घेण्यासारखे पहिले आणि अद्वितीय नृत्यनाट्य आहे. दृश्यतेमुळे ते नाट्यानुबंधी (अभिनयानुबंधी) आहे; तर या श्राव्यत्वामुळे ते साहित्यगुणानुसारी झाले आहे. ह्या दोन्ही माध्यमांचा जयदेवाने जो अप्रतिम मेळ येथे साधिलेला आहे, त्याला संस्कृत वाङ्मयात खरोखर तोडच नाही. त्याच्या रूपाने सर्वस्वी नवीन असा एक संमिश्र आविष्कार उदयाला आला. 'गीतगोविन्दा'चे अद्भुत यश आणि त्याची झालेली उत्तरकालीन अनुकरणे ह्यांचे रहस्य गीत-नृत्य-नाट्य-साहित्याच्या ह्या अभिनव आविष्कारात आहे.

ह्यातील गीत, नृत्य आणि नाट्य या प्रयोगशरण कला होत. जयदेवाच्या काळी त्यांचा जो आविष्कार (बहुधा, जगन्नाथपुरीच्या विख्यात) देवालयात होत असेल, त्याची आज साक्ष उरली नाही; आपणांला त्याची केवळ कल्पनाच करता येण्यासारखी आहे. विविध रागतालांच्या रूपाने त्याची स्थूल चौकट काय-ती आपल्यापुढे आहे. मात्र त्या आविष्काराचे 'साहित्य' 'गीतगोविन्दा'च्या रूपाने आपल्यापुढे साक्षात आहे. प्राचीन संगीतशास्त्रात 'धातु' [पहा : तत्र गानात्मको धातुर्मातुरक्षरसंभवः ।] (म्हणजे गानरूप) आणि 'मातु' [पहा : तत्र गानात्मको धातुर्मातुरक्षरसंभवः ।] (म्हणजे शब्दरूप, अक्षररूप) असे जे दोन पारिभाषिक शब्द येतात, त्यांचीही येथे सहजच आठवण होते. 'गीतगोविन्द' हे अशा 'धातुमातूं'चे आहे.

'गीतगोविन्दा'त सर्गबंधरचना असल्याने ते महाकाव्य आहे, असा गैरसमज होण्याचा संभव आहे. पण ते जसे महाकाव्य नाही, तसेच खंडकाव्य वा स्तोत्रकाव्यही नाही. जयदेवाच्या शब्दांनी सांगावयाचे, तर तो 'रतिकेलिकथायुक्त प्रबंध' (१·२) आहे. अर्थात साहित्यदृष्ट्या ते केलिकाव्य, आणि संगीतदृष्ट्या तो 'प्रबंध' आहे. प्रत्येक सर्गाचे पुन्हा पोट-विभाग आहेत. त्यांना 'पदावली' म्हणतात. जयदेव 'पदावली' हाच शब्द योजितो (१·३). ह्या पदावलींना 'अष्टपदी' अशीही रूढ संज्ञा आहे. मात्र दर वेळी तीत आठच कडवी असतात, असे नाही. येथे एक विधान करणे योग्य होईल : मात्रावृत्तात्मक पदावली ह्या एखाद-दुसरा अपवाद वगळता 'अष्टपदी'च आहेत; आणि अशा अष्टपदींनाच शिरोभागी रागताल दिलेले आहेत, हे लक्षणीय आहे. कारण मात्रावृत्तात्मक रचना जसा करण्याला सोप्या, तशाच त्या गायनालाही अनुकूल असतात. जयदेवाचे हे तारतम्य बहुमोल आहे. कै. पी. सांबमूर्तींच्या मते "जयदेवाच्या अष्टपदी हे द्विधातुप्रबंध आहेत. 'उद्ग्राह' आणि 'ध्रुव' (म्हणजे दाक्षिणात्य संगीतातील उत्तरकालीन 'पल्लवी' आणि 'चरण') असे त्याचे दोन भाग आहेत." अशा प्रत्येक पदावलीच्या अंती जयदेवाने आपले नाव गुंफिलेले आहे. तसेच, गीतात प्रत्येक कडव्यात अंत्ययमकही साधिलेले आहे. काही दाक्षिणात्य रचनाकारांनी सदृश विषयांवर 'गीतगोविन्दा'च्या धर्तीने रचना केलेल्या आहेत. ह्या संदर्भात चंद्रशेखरेंद्र सरस्वतीची 'शिवाष्टपदी', रामकवीची 'रामाष्टपदी', तसेच 'गीतसुन्दरम्' आणि 'स्कन्दाष्टपदी' उल्लेखनीय आहेत. मराठीत 'गीतरामायण', 'गीतगोपाल' ह्या ग. दि. माडगूळकरांच्या रचना प्रसिद्धच आहेत. पण ती कथागीते आहेत; ती नृत्यनाट्ये नव्हेत. जयदेवाचा थाट-घाट वेगळा. तो अधिक नेटका, कमालीचा ललित आणि आखबंद आहे.

दोनतीन पिढ्यांपूर्वीच्या गायकांमध्ये मैफलीत एखादी 'अष्टपदी' म्हणण्याचा प्रघात महाराष्ट्रात रूढ होता [नारायण दासो बनहट्टी ह्यांनी आपल्या 'बालसंगीतबोध' (पुस्तक तिसरे : १९०६) ह्यात 'गीतगोविन्दा'तील १·२ आणि ४·८ ह्या दोन अष्टपदी अनुक्रमे भूपकल्याण आणि सोहनी ह्या रागांत आणि त्रिपुट चतुरस्रजाती ह्या तालात स्वरलिपिबद्ध करून दिलेल्या आहेत (पृष्ठ—पाठ : ६८, ६९). त्यांचे मूळचे रागताल गुर्जरी—प्रतिमठताल व कर्णाटकराग—एकताली ताल असे आहेत. कै. मास्तर कृष्णरावांनी भास्करबुवांकडून परंपरेने चालत आलेल्या दोन अष्टपदी मला स्वतःला सांगितल्या होत्या. त्या त्यांच्या समीतसंग्रहात हस्तलिखितस्वरूपात होत्या.] [तसेच, पहा : ना. दा. बनहट्टी ह्यांचे बरीच पुस्तक, पृष्ठ ४५]; आणि दाक्षिणात्य संगीतसभांमध्ये ती परवापरवापर्यंत गाइली जात होती. मात्र 'गीतगोविन्दा'तल्या प्रत्येक अष्टपदीच्या शिरोभागी जे रागताल दिलेले आहेत, त्या रागतालांत ती गाइली जात नव्हती. कारण त्या रागतालांची परंपरा आज अखंडपणे टिकून राहिलेली नाही. आजच्या भजनांप्रमाणे, नाटकीय पदांप्रमाणे किंवा रामदास-दासोपंत इत्यादिकांच्या पदांप्रमाणे 'गीतगोविंदा'तील पदावली ह्या राग-तालबद्ध आहेत, आणि त्या गावयाच्या आहेत, हे 'गीयते' ह्या आवर्जून केलेल्या सूचनेने स्पष्ट केले आहे. गुर्जरी, वसंत, रामकरी, मालव, कर्णाटक, देशाख, वराडी, केदार, गुणकरी, गौडमालव, देशाङ्क, भैरव, देशवराडी आणि विभास इतक्या रागांचा आणि प्रतिमठ, रूपक, एकताली, यतिताल, अष्टताली आणि आडवताल ह्या तालांचा उल्लेख आहे. हे सर्व ताल दाक्षिणात्य संगीतात आजही आहेत, असे सुचेता चापेकर (भिडे) सांगतात.

अनुक्रमणिका

ह्या पदावली गाणाऱ्या व्यक्ती तीन : राधा, माधव आणि राधेची सखी. तथापि या पदावली म्हणजे संवाद नव्हेत; ती वैयक्तिक भावाविष्कारांची, वर्णनांची, अथवा स्वगतसदृश अथवा काव्यगत श्रोत्याला उद्देशून केलेली भाषणे आहेत. त्यामुळे त्यांना नाट्यरूप येते. भावाविष्कार तर सर्वत्र आहे. वर्णन येते, ते एक पार्श्वभूमी म्हणून येते. 'मेघदूता'मध्ये वर्णन हे आविष्काराशी पूर्ण एकजीव झालेले आहे. तसे ते येथे थोड्या स्थळी आहे. वरील तीन व्यक्तींच्या भूमिका नृत्यामध्ये वठविणाऱ्या व्यक्ती ह्या नृत्यनाट्य—संगीतामध्ये पारंगत असाव्या, अशी स्पष्टच अपेक्षा आहे.

'गीतगोविन्दा'च्या प्रास्ताविकातील पुढील श्लोक भूमिका जाणून घेण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे :

**यदि हरिस्मरणे सरसं मनो**
**यदि विलासकलासु कुतूहलम् ।**
**मधुरकोमलकान्तपदावलीं**
**शृणु तदा जयदेवसरस्वतीम् ॥ १·३**

ह्यातील 'पदावली' ह्याचे विवेचन ह्यापूर्वी केले आहे. 'गीतगोविन्द' हे केवळ शृंगारकाव्य, किंवा केवळ भक्तिकाव्य आहे, असे ज्यांना वाटत असेल, त्यांनी वरील श्लोकाचा पूर्वार्ध अवश्यमेव ध्यानी घेतला पाहिजे. तसाच १२·१३ हाही श्लोक. "हरिस्मरणाच्या ठिकाणी ज्यांना रुची आहे आणि रतिविलासांच्या विविध कलांच्या बाबतीत ज्यांना कुतूहल आहे," त्यांच्यासाठी हे गीतनृत्यनाट्य आहे (१२·१३). ह्यातही जयदेव 'वैष्णव अनुध्याना'चा आणि 'कृष्णैकतानत्वा'चा उल्लेख करितो. 'हरिस्मरणे' ह्या पदाने नवविध [श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥—भागवत ७·५·२३.] वैष्णवभक्तीचा एक प्रकार निर्दिष्ट आहे. अर्थात तत्पूर्वीचे श्रवण-कीर्तन हे भक्तिप्रकार त्यात येऊन जातात. आणि उरलेले आत्मार्पणापर्यंतचे प्रकार 'गीतगोविन्दा'त कलात्मकतेने प्रकट केले आहेत. ही कलात्मकता अर्थातच राधामाधवविलासांच्या लीलायिताची. हा सर्व आविष्कार जयदेवाच्या 'मधुरकोमलकान्तपदावलीं'नी आणि 'संदर्भशुद्धवाणी'ने (१·४) होणार आहे, अशी येथे ग्वाही दिलेली आहे. ह्या आविष्कारात कथेची आडकाठी नको, म्हणून 'गीतगोविन्दा'त आडपडद्यासाठीसुद्धा कथा नाही. राधा, माधव आणि राधेची सखी ह्यांच्या व्यक्तिरेखाही मुद्दामच धूसर ठेविल्या आहेत. येथला माधव हा काव्यनाटकादिकांत येणारा सर्वसाधारण कृष्ण नसून जयदेवाने पहिल्याच 'जय जगदीश हरे' ह्या नितांतसुंदर पदावलीत केलेल्या वर्णनानुसार दशविध रूपे—म्हणजेच अवतार—धारण करणारा, संसाराचे सारसर्वस्व असलेला जगदीश 'केशव' अर्थात विष्णू आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक पदावलीत शेवटी जयदेव आपले नाव गुंफितो, त्या वेळीही त्याने कृष्णाचा निर्देश अत्यंत भक्तिभावाने केलेला आहे. हे सर्वच संदर्भ जयदेवाचा श्रीकृष्णासंबंधीचा भक्तिभाव आपल्याला स्पष्टपणे जाणवून देतात. 'गीतगोविन्दा' मधील स्थायी वृत्ती कोणती आहे, ह्याचा हा अंगुलिनिर्देशच आहे.

'गीतगोविन्दा'चा अगदी पहिलाच मंगलश्लोक ('मेघैर्मेदुरमम्बरं...') ह्या केलिकाव्याचे पृथगात्मत्व दाखवितो. जयदेव म्हणतो, "आभाळ मेघांनी कसे ओथंबून आले आहे. सावळ्या तमालतरूंमुळे वनस्थली काळवंडून गेल्या आहेत. त्यात रात्रीचा मिट्ट अंधार. हा तर मुलखाचा भित्रा. राधे, ह्याला तूच नीट घरी आणून पोहोचव बरे." प्रत्यक्ष नंदाने केलेली ही आज्ञा राधा कशी मोडणार? निघाली बिचारी कृष्णाला पोहोचवावयाला. पण हे काम तिला तरी नकोसे थोडेच होते? नीलमाधव तर ह्या संधीची वाटच पाहत होता. म्हणून तर त्याने भित्रेपणाचे हे सोंग केले नसेल? जयदेव म्हणतो, "ह्या अंधारात यमुनेच्या तीरावरून

अनुक्रमणिका

कुंजाकुंजात, झाडाझाडाच्या आडोशाने, वाटेवाटेवर रमत-गमत, थांबत-थबकत जाणाऱ्या ह्या अद्‌भुत विलासयात्रिकांच्या—राधामाधवांच्या लीला मी किती आणि कशा बरे वर्णू?"

जयदेवाच्या 'गीतगोविन्दा'ची सुरुवात ही अशी आहे. अगदी मुलखावेगळी. सर्वसामान्यपणे संस्कृत वाङ्मयात भीरू असते ती प्रेयसी. प्रियकर तिला धीर देऊन, आपल्या बाहूंचा आधार देऊन घरी पोहोचवितो. पण 'गीतगोविन्दा'त सारेच उलटे. प्रेयसी आपल्या प्रियकराला सोबत देते. राधा कृष्णाला घरी पोहोचविते!

हा झाला आरंभ. पण 'गीतगोविन्दा'च्या सर्गांची अखेरीस येणारी नावे पहा. वेगळीच आहेत : सामोद-दामोदर, अक्लेश-केशव, मुग्ध-मधुसूदन, स्निग्ध-माधव, साकाङ्क्षपुण्डरीकाक्ष, सोत्कण्ठ-वैकुण्ठ, नागर-नारायण, विलक्ष-लक्ष्मीपती, मुग्ध-मुकुन्दवदन, चतुरचतुर्भुज, सानन्द-गोविन्द आणि प्रीत-पीताम्बर. असे हे 'गीतगोविन्द' नुसते आद्यंतीच नव्हे, तर आशय, घडण आणि आविष्कार ह्या सर्वच दृष्टींनी पृथगात्म आहे.

**मधुरा भक्ती**

'भक्ती' या शब्दात मूळ धातू जो 'भज्' त्याचा अर्थ सेवा करणे, प्रेम करणे. आणि सेवा, प्रेम ह्यांच्या विविध छटा आणि अनेकविध रंग ह्यांनी 'गीतगोविन्द' तुडुंब भरलेले आहे. 'मधुरा भक्ती' हे नाव देण्याने ह्या रंगांचा एक स्थूल वर्ग कळतो, इतकेच काय ते. गाण्याच्या मैफलीत एखाद्या अनोख्या रागाचे फक्त नाव कळल्याने जसे आणि जेवढे ज्ञान होते, तसे आणि तेवढेच ज्ञान आपल्याला ह्याने होते. तेव्हा त्याच्या अधिक जाणकारीसाठी आविष्कारासह आशयाची जाणीव करून घेतली पाहिजे.

जिला आपण 'भक्ती' म्हणतो, तीत प्रीती, मधुरता, द्रुती, उदारता, रुची इत्यादी अनेक सूक्ष्म आणि परस्परसंपृक्त वृत्तींचा उत्कट प्रत्यय असतो. उपकाराच्या वा देवघेवीच्या अंशाचा तर तीत वाराही नसतो. द्वैतभावनेने सुरू होऊन ती अद्वैतावस्थेत विलीन होते; आणि अद्वैतात जाणीव अशी शिल्लक राहत नसल्याने भक्तीच्या आनंदोपभोगासाठी ती पुन्हा द्वैती बनते. अशा रीतीने वर्तुलाची दोन टोके एकमेकांना मिळतात. ज्ञानदेवांनी मोठ्या अपूर्वाईने असे म्हटले आहे की, "भक्त हा वस्तुतः देवच; पण भक्तीच्या आनंदास्तव तो स्वतःच आपले दोन वाटे करतो; आणि अशी वाटणी केल्यावर दुसऱ्या भागाला 'देव' असे नाव देतो; आणि स्वतःच्याच एका भागाला 'सेवक म्हणवितो."

[पहा : ज्ञानदेवी : १२·१८५—१८७.
किं भक्तिसुखा लागि। आपण चि जाला दों भागीं।
वांटूनियां आंगीं। सेवकै बाणी ॥ १२·१८६;
येरा नांव नी ठेवी। मज भजतेया वोज बरवी।
न भजतेया दावी। योगियां जो ॥ १२·१८७.] भक्तिमार्गातील द्वैत आणि अद्वैत असे लोकविलक्षण प्रकाराचे असते. द्वैतात अद्वैताची ओढ आणि अद्वैतात द्वैतातील आनंदाची उत्कंठा! आणि अशा विलक्षण प्रकाराच्या समरस अनुभवासाठी स्त्री-पुरुषांच्या संबंधाची भूमिका प्रवृत्त झालेली आहे. खरे पाहता, 'स्त्री-पुरुष' असे त्रयस्थपणे म्हणण्यापेक्षा 'पति-पत्नी' अथवा 'प्रियतम-प्रेयसी' असेच म्हणणे अनुभवदृष्ट्या यथार्थ होय. त्यातही 'पति-पत्नीं'च्या संबंधामध्ये जो एक लौकिक कर्तव्यनिष्ठेचा बाह्य लिप्ताळा असतो, तो प्रियतम-प्रेयसी ह्यांच्या संबंधात मुळीच नसल्यामुळे हाच संबंध अधिक इष्ट मानून ज्ञानदेवांनी—

**अर्जुना तो चि भक्तु । तो चि योगी मुक्तु ।**
**तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये ॥**

—ज्ञानदेवी : १२·१५६

येथे तो सांगितलेला आहे [तसेच, पहा : ज्ञानदेवी : १३·६०४, ६०५, ३७४; ११·१६९; ५·१३२, १३३.]. 'अनुभवामृता'तील प्रियु-प्राणेश्वरी ह्यांचाही संबंध येथे आठवण्याजोगा आहे. 'घनु वाजे घुणघुणा' ह्या ज्ञानदेवांच्या विराणीत हा संबंध किती अप्रतिम रीतीने सांगितला आहे :

**घनु वाजे घुणघुणा । वारा वाजे रुणझुणा ।**
**भवतारकु हा कान्हा । वेगीं भेटवा कां ॥ १ ॥**

**चांद वो चांदणें । चापे वो चंदनु ।**
**देवकीनंदनु। वीण नावडे वो ॥ २ ॥**

**चंदनाची चोळी । माझें सर्व अंग पोळी ।**
**कान्हो वनमाळी । वेगीं भेटवा कां ॥ ३ ॥**

**सुमनाची शेज । नितळ वो निकी ।**
**पोले आगिसारखी ।वेगीं विझवा कां ॥ ४ ॥**

**तुम्ही गातांसे सुस्वरें । ऐकोनि द्या उत्तरें ।**
**कोकिळे वर्जावें । तुम्ही बाईयांनो ॥ ५ ॥**

**दर्पणीं पाहतां । रूप न दिसे आपुलें ।**
**बापरखुमादेवीवरें । विठ्ठलें मज ऐसें केलें ॥ ६ ॥**

द्वैतानंतरच्या ह्या अशा ऐक्याचे वर्णन करिताना दिली जाणारी प्रिय-प्रेयसीची उपमा आणि तद्विषयक भाव निदान उपनिषत्कालाइतका तरी प्राचीन आहे. 'बृहदारण्यकोपनिषदा'त (४·३·२१) "तद्यथा प्रियया संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद, नान्तरम्, एवमेवायं पुरुषः प्राज्ञेनात्मना संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद नान्तरम्।" असे म्हणून "प्रिया आपल्याशी एकरूप झाली, म्हणजे जशी माणसाची सर्व अंतर्बाह्याची जाणीव लोपते, आणि त्याला वेगळे असे काहीच जाणवत नाही, तद्वत...." असे सूचित केलेले आहे. भक्तीचे रूप असेच असते. तो द्वैतान्ती येणारा ऐक्याचा लोकविलक्षण आनंदानुभव आहे. अशा प्रीतीचे अत्युत्कट स्वरूप प्रिय-प्रेयसींच्या संमिलनातच प्रत्ययाला येते. त्यामुळे ख्रिस्ती साक्षात्कारवाद्यांनी काय, सूफीपंथीयांनी काय किंवा दाक्षिणात्य आळवार-संतांनी काय (ख्रिस्तशकाची पहिली सातआठ शतके), प्रियतम आणि प्रेयसी ह्यांचाच कित्ता घेतलेला आहे, हे उद्बोधक आहे. ईश्वरभक्तीचा हा विश्वमार्ग आहे, असे सर्व धर्मांतील आणि पंथांतील साक्षात्कारवाद्यांना जाणवत आलेले आहे,— आणि ते प्रत्येकाला स्वतंत्रपणे. ही जाणीव किंवा हा अनुभव मिथ्या कसा म्हणावा? ज्ञानदेवांनी तर गुरुशिष्यांच्या संबंधाचेही असेच वर्णन केलेले आहे :

**नातरि जिवाचिये सेजे। गुरु कांतु करुनु भुंजे।**
**ऐसिं प्रेमाचिं भोजें। बुद्धि वाहे ॥ १३·३९०**

उत्तरेकडील मीरा (१५ वे शतक), आपल्याकडील कान्होपात्रा (१४६८), दक्षिणेकडील आळवार-संत, कबीर (१२ वे—१४ वे शतक), सूरदास, विद्यापती (अभिनव जयदेव) (१४ वे—१५ वे शतक), चंडीदास (१४ वे—१५ वे शतक), वल्लभमार्गी इत्यादी कितीतरी संतांची उदाहरणे ह्या संदर्भात लक्षणीय आहेत. दक्षिणेकडील आळवार-संत विष्णुचित्त ह्याची मुलगी अंदालकन्या रंगनायकी ही स्वतःला जन्मभर रंगनाथाची विवाहित पत्नी मानीत होती. लौकिक विवाह तिने केलाच नाही. ती त्यालाच प्रियकर समजे. त्याच्यासाठी केलेला फुलहार ती स्वतःच्याच गळ्यात घाली आणि स्वतःच्याच सौंदर्यावर लुब्ध होऊन विचारी, "ह्या माझ्या सौंदर्यावर आता लोभावेल ना तो?" पुष्कळदा ती बावरी होऊन मनाने वृंदावनात भटके; गोपींशी खेळे; कृष्णाबरोबर नाचे! गोपीभावात ती आकंठ बुडून गेली होती! तिने जी पदे रचिली आहेत, त्यांत रंगनाथाशी झालेल्या आपल्या विवाहाचे तिने सविस्तर वर्णन केलेले आहे; आणि दक्षिणेकडील वैष्णव मंदिरांतून आजही प्रत्येक वर्षी तिच्या ह्या विवाहाचा दिवस मोठ्या उत्सवाने साजरा केला जातो.

उत्तरेकडील मीरेचे चरित्र लोकविख्यात आहे. तीही अशीच कृष्णभक्तीने वेडावून गेलेली. तिच्या लेखी श्रीकृष्ण हा एकच पुरुष. एकदा ती वृंदावनात चैतन्यदेवांचे प्रसिद्ध शिष्य रूपगोस्वामी ह्यांना भेटण्यास गेली असता ती स्त्री म्हणून त्यांनी तिला भेटण्याला नकार दिला. तेव्हा मीराबाईने त्यांना निरोप कळविला की, "आजपर्यंत मी तर असे समजत होते की, वृंदावनात भगवान श्रीकृष्ण हा एकच पुरुष असून इतर सर्व लोक गोपींच्या स्त्रीरूपाने आहेत. पण आज मला समजले की, भगवंतांव्यतिरिक्त आणखीही एक दुसरे पुरुष वृदांवनात आहेत!" मीरेचा अधिकार पाहून गोस्वामींनी मग तिची भेट घेतली. मधुरा भक्ती ती ही!

मधुरा भक्ती आणि साक्षात्कारवाद ह्यांचे जवळचे नाते आहे. दोहोंतही आत्मप्रत्यय आधाराला आहे.भेद एवढाच की, साक्षात्कारवाद हा अमूर्ताच्या अनुभवमार्गाने जातो, तर मधुरा भक्ती वर दर्शविल्याप्रमाणे प्रिय-प्रेयसींच्या मूर्त वाटेने जाते. प्रत्येक चांगल्या कल्पनेचे आणि वृत्तीचे मानवाने विकृतीत रूपांतर केलेले आहे हे खरे. त्याप्रमाणे मधुरा भक्तीचेही विकृतीकरण झाले नाही, असे नाही. पण तिचा मूलस्रोत पर्जन्यकाळच्या मेघोदकाप्रमाणे शुद्ध आहे, हे ह्या पंथातील थोर संतांच्या विविध उदाहरणांवरून आपल्याला दिसून येते; आणि ह्या संतांचा अनुभव मिथ्या समजण्याचे कारण नाही. मधुरा भक्ती हे कामवृत्तीचे उन्नयन नाही. मुळात वृत्तीमध्ये कोणताच हिणकस अंश नसल्याने सगुणोपासनेचा तो आगळा आणि वेगळा प्रकार आहे.

मधुरा भक्तीच्या मार्गामध्ये भक्तांना जीवनात ईश्वराविषयीच्या प्रेमाचा नुसता आधारच असतो, असे नाही; तर त्याची पराकाष्ठेची उत्कटता त्यांच्या ठिकाणी असते. ते सदैव आसुसलेले असतात. तेच त्यांचे जीवन होते. मुक्ततेची आणि अंतिम विजयाची त्यांना इतकी खात्री असते की, लौकिक आपत्ती वा प्रतिबंध ह्यांची त्यांना रतिभरही जाणीव नसते. आपल्यालाच काय ते त्यांच्या ह्या लौकिक आपत्तींचे भान असते; कारण आपण वेगळ्या भूमिकेत वावरत असतो. मीरेच्या नातेवाइकांना प्राणनाशक वाटणारा विषाचा प्याला स्वतः मीरेला अमृतच होतो! विभक्त झालेला जीव देवभाव पावणार आहे, राधाभावाचा कृष्णभाव होणार आहे, अशी त्यांना खात्री असल्याने, आणि आपल्याला तशी नसल्याने त्यांच्या आणि आपल्या भूमिकेत भेद पडतो. ईश्वरापासून विभक्त असलेला त्यांचा जीव विरहात निरंतर व्याकुळलेला असतो. मौज अशी की, हा

विरहही त्यांना दसलाखाचा वाटतो. ह्याचमुळे ज्या घरात विरह नाही, ते घर कबीराला स्मशानासारखे वाटते. तो म्हणतो :

**गदगद बानी कंठमें, आँसूं टपके नैन।**
**वह तो बिरहिन रामकी, तलफति है दिन-रैग॥**

येथे अभिमान असा आहे की, "कंठात गहिवर दाटला आहे! डोळ्यांतून अश्रू झरताहेत! रात्रंदिवस तडफड होत आहे! पण मी (अशा-तशाची नाही) रामाची विरहिणी आहे!" ह्या ईश्वररतीत भक्तांना मग विविध रंग जाणवतात. प्रेम, मान, अनुराग इत्यादी विविध भाव त्यांच्या प्रत्ययाला येतात. अंध गुलाबरावमहाराजांना अगदी लहानपणापासूनच कृष्णदर्शनाचे अनुभव येत असत. असे भक्त आपण आपल्या प्रिय मित्राला ओळखतो, तसे त्याला ओळखतात. तात्पर्य, विरह, मिलन आणि दिव्य आनंद अशा या मधुरा भक्तीतल्या अवस्था दिसतात. ह्या मार्गातील भक्तीचे म्हणूनच उन्नयन होत नाही, तर खरोखर रूपांतरण होते.

अशा ह्या भक्तीमधील तन्मयता ही ईश्वराशी एकरूपता होय आणि तिचा मूलभाव रती. तीतूनच प्रेम, मधुरता, द्रुती इत्यादी सर्व भाव उत्पन्न होऊन ते शेवटी आत्मार्पणामध्ये परिणत होतात. त्या वेळी दोघांचे सुख एकच होते. आपल्याकडे श्रृंगार ह्या रसाचा स्थायीभाव रती हा मानिला आहे. त्यामुळे रतीच्या सांधेजोडीमधून श्रृंगार आणि भक्ती या दोहोंचेही साध्य गाठता येते. येथे मधुरा भक्तीच्या संदर्भात श्रृंगार ह्याचा काव्यनाटकातील श्रृगार असा मर्यादित अर्थ न घेता जर व्यापक अर्थ घेतला, तर रती ह्याचाही तसाच व्यापक अर्थ होईल. ह्यायोगे मग मधुरा भक्तीच्या स्वरूपाचा व्यापक रीतीने आणि यथार्थतेने उलगडा होईल. एकीकडे शकुंतलेचे दुःषंतावरचे सखोल प्रेम किंवा एखाद्या स्त्रीचे पुरुषावरील उत्कट असे लौकिक प्रेम आणि दुसरीकडे रंगनायकीचे रंगनाथावरील, अथवा मीरेचे कृष्णावरील, अथवा कान्होपात्रेचे विठ्ठलावरील प्रेम, अथवा सहाव्या शतकातल्या नम्म आळवाराचा विरहि-राधाभाव ह्यांतील सर्वांचे मूळ अधिष्ठान रती हेच असले, तरी त्यांच्या प्रकारांत उद्देश्य व्यक्तीनुसार फरक आहे; आणि तो महत्त्वाचा आहे. म्हणून पहिल्या प्रकारात ते प्रेम श्रृंगाराला जन्म देते, तर दुसऱ्यात ते मधुरा भक्तीमध्ये परिणत होते. दोहोंतही श्रृंगार आढळेल. पण पहिल्यात श्रृंगार हे साध्य असेल; दुसऱ्यात श्रृंगाराच्या साधनव्यवहाराने अद्वैत हे साध्य होते. ह्यामुळेच रती या मूलभावाकडून जे श्रृंगारापर्यंतच येऊन थांबतात, त्यांना मधुरा भक्तीचे स्वरूप फक्त श्रृंगारमय दिसते, किंवा काहींना ते विकृती म्हणून जाणवते. ज्यांना ते श्रृंगारमय दिसते ते अर्ध्या वाटेवरून पाहतात व म्हणून त्यांना ते अपूर्ण दिसते; ज्यांना त्यात विकृती जाणवते, ते त्याचे मिथ्यारूप पाहतात. सारांश, वरील उदाहरणाने बोलावयाचे, तर रती या मूलभावापासून श्रृंगारापर्यंत येताना शकुंतला आणि रंगनायकी या दोघीही समांतर प्रवास करितात. पुढे श्रृंगाराच्या टप्प्याला शकुंतला थांबते, आणि रंगनायकी पुढे निघून जाते. ह्यात श्रेष्ठकनिष्ठभाव सूचित करावयाचा नाही, एवढे लक्षात ठेवणे योग्य होईल.

मधुरा भक्तीच्या उत्कट अवस्थेत भक्त हा नवजीवनाचा भोक्ता होतो. त्याची ही अवस्था अखंड असते. त्याचा भावावेश कधी-काळी येऊन गेलेला, चुटपुटता आणि नुसता स्मरणात नांदणारा असा नसतो. अनुभूतीचा आधार असल्यामुळे त्याचे जीवन काल्पनिक आनंदात विहार करीत नाही. त्यामुळे त्या जीवनाला अनेक परिमाणे लाभतात.

अनुक्रमणिका

वैष्णव पंथ आणि त्यातही राधागोपीकृष्णचरित्र हे ह्या भक्तीचे अधिष्ठान आहे. हा पंथ अशा भक्तीला विशेषच अनुकूल आहे, यात शंका नाही, कारण त्यात प्रेमाचा विविध रीतींनी आविष्कार झालेला आहे. त्या प्रेमात ईश्वराचे मानुषीकरण आहे; तसे मनुष्याचे दैवतीकरण आहे. इतिहासात जिला अस्तित्व नाही, अशा राधेची श्रीकृष्णासह देवालयांत ठिकठिकाणी स्थापना व्हावी, प्राचीन बहुविध चित्रावलींत तिला महत्त्वाचे स्थान मिळावे, संगीताच्या हजारो बंदिशींत ही 'बरसानेकी नार' किंवा 'वृखभानकुमारी' चमकत रहावी, कथक असो, भरतनाट्यम् असो, कुचिपुडी, ओडिसी किंवा मणिपुरी असो— सर्व नृत्यप्रकारांत (रुक्मिणी कमी येईल, पण) राधा ही एक मोहमयी जादू ठरावी, हा प्रकार ह्याच एका लोकोत्तर व्यक्तीच्या संबंधात दिसून येतो. राधेला वगळा, संगीत भुंडे होईल, नृत्यकला पोरकी दिसेल, 'गीतगोविन्द' शून्य वाटेल, पहाडी, कांगडा इत्यादी चित्रशैलींची कलमे नीरंग होतील आणि श्रीकृष्णाची उपासना अर्धफलाची होईल!

हे सर्व विवेचन लक्षात घेता 'गीतगोविन्दा'तील श्रृंगार हा कसा मधुरा भक्तीच्या मार्गावरचा टप्पा आहे, ते ध्यानी येते. असूया, शंका, फसवणूक, भय, उत्कंठा, मिलनानंद ह्या राधाकृष्णांच्या विविध भावांचे त्यातले वर्णन हे मधुरा भक्तीच्या भूमिकेने येथे पहावयाचे आहे. अत्यंत रम्य निसर्ग हे त्यातले संकेतस्थल आहे. निसर्ग आणि मानवभाव हे परस्परांत मिसळून गेलेले आहेत. दोघांनी एकमेकांना साथ दिली आहे— साद घातली आहे— जणू जीवशिवांनी. वसंत ऋतू बहरला आहे. शेजारी कुंजवन स्तब्धपणे साक्षीला उभे आहे. जवळच शांत वाहणारी यमुना आपल्या तरंगांच्या मिस्कील डोळ्यांनी राधाकृष्णांच्या प्रेमलीला पाहत आहे. पाखराचे पीस भुईवर पडले, तरी त्याचा आवाज यावा, अशी मुग्ध शांतता नांदत आहे. वनमाली हा नायक आहे, मोठा खट्याळ, प्रेमळ, लाघवी. सापडूनही दिसेनासा होणारा आणि न दिसताही सदैव सोबत करणारा; आणि कांतिमती राधा, कृष्णप्रेमात चिंब भिजलेली राधा, कृष्णाच्या आठवणींच्या किलबिलींत हरवून गेलेली राधा त्याचा शोध करीत आहे. ती त्याच्यावर रागावते—रुसते, पण त्याच्यासाठी नित्य आसुसलेली असते. राधेच्या सखीला जेवढा राधेविषयी कळवळा आहे, तेवढाच वनमालीविषयीही आहे. ह्या विरही जिवांचे प्रेममिलन हे त्यांचे सफल जीवन आहे. म्हणून राधेची सखी परोपरीने तिची विनवणी करिते, आणि राधा कृष्णाची आळवणी करिते.

अशा परिसरातल्या अशा संदर्भात कितीतरी कल्पनांची पाखरे जयदेवाच्या मनात भिरभिरून जातात; आणि मग तो राधेच्या आधाराने खंडिता, कुपिता, कलहान्तरिता, वासकसज्जा, अभिसारिका, मुग्धा, स्वाधीनपतिका इत्यादी नायिकांची भावपूर्ण वर्णने करितो. कल्पना सांकेतिक; पण त्यांचा आविष्कार अतिशय लोभस. रुसलेली राधा, रागावलेली राधा, असूयाप्रेरित राधा अशी राधेची विविध रूपे आणि भाववृत्ती आपल्याला येथे पहावयाला मिळतात. पण त्या सर्वांतून तिच्या प्रेमजीवनाचा निर्मळ झरा सतत झुळझुळत, खळखळत असतो. प्रेम हा तिचा मुख्य भाव. खरे म्हणजे राधा ही प्रीतीच आहे. प्रीती हीच राधेच्या रूपाने यमुनातीरी कुंजवनात खेळते आहे. ती भक्त आहे; कृष्ण हा तिचा देव आहे. ती प्रेयसी आहे; तो प्रियतम आहे. ह्या भूमिकांचे रसायन असे अद्‌भुतपणे एकजीव झालेले आहे की, जो जसे पाहील, तसे ते त्याला दिसते. देवात प्रियतम, भक्तात प्रेयसी, प्रियतमात देव, प्रेयसीत भक्त.

भारतीय संस्कृतीत काम हा चतुर्विध पुरुषार्थांतला एक पुरुषार्थ आहे. त्यामुळे 'गीत-गोविन्दा'तील श्रृंगार ज्यांना उत्तान अथवा भडक वाटतो त्यांनी भारतीय संस्कृतीची पुन्हा एकदा निर्लेपपणे नीट ओळख करून घ्यावयास पाहिजे! ह्या भारतीय संस्कृतीत कडकडीत वैराग्य अथवा कठोरतम त्याग हा जसा मुळीच दूर नाही, तसाच श्रृंगार अथवा संभोग हाही मुक्तमान्य आहे. त्याचा निषेध तर नाहीच, उलट ती जीवनातली एक सफलता मानिली आहे. रतिभावना ही सदैव शुची आहे. [कविवर्य भा. रा. तांबे ह्यांनी रा. चिं. श्रीखंडे यांना लिहिलेल्या ७ ऑगस्ट १९३४ च्या एका पत्रात 'गीतगोविन्दा'वर वैषयिकतेचा आरोप करणाऱ्यांचा अगदी निकराने समाचार घेतला आहे. पहा : 'कविवर्य तांबे :

अनुक्रमणिका

साहित्यविचार' : पृष्ठ २२०, पत्र क्रमांक १७ 'भक्ती आणि श्रृंगार'.] ज्या ठिकाणी 'गीत-गोविन्द' जन्माला आले, त्याच ओडिसाच्या परिसरात कामशिल्पांनी तुडुंब भरलेले कोणार्कचे महाभव्य सूर्यमंदिर आणि मिथुनशिल्पांनी लहरलेले जगन्नाथाचे मंदिर हीही निर्माण झाली, हा केवळ योगायोग नाही. जीवनाकडे धीटपणे पाहण्याची ती पद्धती आहे. 'गीतगोविन्दा'चा जन्मकाल आणि ह्या मंदिरांचा निर्मितिकाल हेही एकमेकांच्या आगेमागेच आहेत, हीही एक लक्षणीय गोष्ट आहे.

**नटमोगरी**

सबंध 'गीतगोविन्दा'त अनघडपणा असा नावालाही नाही. सर्व सुघड, मुलायम. विषयाला अनुरूप. त्यातली जयदेवाची ध्रुवपदे ही खरोखर अद्‌भुत आहेत.

**प्रिये चारुशीले प्रिये चारुशीले मुञ्च मयि मानमनिदानम् ।**
**सपदि मदनानलो दहति मम मानसं देहि मुखकमलमधुपानम् ॥ ध्रु० ॥ १०·१९.**

किंवा

**धीरसमीरे यमुनातीरे वसति वने वनमाली ।**
**गोपीपीनपयोधरमर्दनचञ्चलकरयुगशाली ॥ ध्रु० ॥ ५·११**

किंवा

**हरिरिह मुग्धवधूनिकरे । विलासिनि विलसति केलिपरे ॥ ध्रु० ॥ १·४.**

ही ध्रुवपदे स्वतःच गाणारी आहेत! अशीच सर्व ध्रुवपदे पहिल्या सर्गाच्या दुसऱ्या प्रबंधात प्रत्येक कडव्यात प्रथमचरणान्ती जयदेवाने 'ए' हे संस्कृत रचनेत सहसा न येणारे संबोधनवाचक अव्यय किती धीटपणाने पण कमालीच्या खुलावटीने योजिले आहे!

उदाहरणार्थ :

**दिनमणिमण्डलमण्डन भवखण्डन ए ।**
**मुनिजनमानसहंस जय जय देव हरे ॥**
**कालियविषधरगञ्जन जनरञ्जन ए ।**
**यदुकुलनलिनदिनेश जय जय देव हरे ॥ १·२. इ.**

तशीच पहिल्या सर्गातली सुप्रसिद्ध 'दशावतारलीला' ('जय जगदीश हरे') पहा. जयदेवाची यमके, अनुप्रास आणि पदरचना ह्यांची येथली सुभग लीला अशी बहारीची आहे की, नरसिंह आणि वामन ह्या अवतारांच्या वर्णनांतील रौद्र-भयानक-अद्‌भुत रसही जयदेवाच्या हातांत 'जयदेवी' आणि कोवळे बनले आहेत. कठीणपणा असा जयदेवाच्या रचनेत नसतोच. सर्वत्र द्राक्षापाक. लांबलांब समासदेखील रेशमाच्या

अनुक्रमणिका

लडींसारखे मऊ आणि सरळ होऊन जातात; आणि तरी त्यांचा घाट बिघडत नाही. पहिल्या सर्गातला चौथा प्रबंध

**हरिरिह मुग्धवधूनिकरे । विलासिनि विलसति केलिपरे ॥ ध्रु० ॥ १·४. इ.**

हा कसा अथपासून इतिपर्यंत उन्मादक आणि खट्याळपणाच्या वर्णनाने भरलेला आहे! लघुगुरु-अक्षरांची किती चतुराईची गुंफण त्याने येथे केली आहे! जोडाक्षरे शक्य-तो टाळून जयदेवाने येथे लयकारीची कशी सुंदर मोहिनी उभी केली आहे!

**चन्दनचर्चितनीलकलेवरपीतवसनवनमाली ।**
**केलिचलन्मणिकुण्डलमण्डितगण्डयुगस्मितशाली ॥ १·४·१**

ह्या कडव्यात रंगांचे कसे इंद्रधनुष्य त्याने नटविले आहे! "कृष्णाच्या श्यामल शरीरावर पिवळे चंदन चर्चिले आहे; वनमाळी **पीतांबर** नेसला आहे : खेळताना **रत्न**जडित कुंडले कानांत आंदोळताहेत; त्यांच्या रत्नांची **तरळती प्रभा** जिकडेतिकडे फाकलेली आहे, आणि ती त्याच्या हसऱ्या गालांवर पसरून त्यांची शोभा दुणावली आहे!" रंगांची येथे नुसती बहार झाली आहे! एवढेच नाही, ते रंग हलते रंग आहेत, जिवंत रंग आहेत! निरांजनाच्या ज्योतीसारखे. पुढेही ह्या पदावलीत मिस्किलपणाची रेलचेल आहे. "प्रिये चारुशीले, प्रिये चारुशीले" हीही पदावली अशीच मिट्ठास आहे. शब्दझंकाराचा जयदेवाला विलक्षण मोह आहे. आणि तो मोह, ती धुंदी ऐकणाऱ्यामध्ये संक्रांत करण्याचे त्याचे कौशल्यही अद्‌भुत आहे, भारून टाकणारे! पण नादाचा प्रभू असलेला हा कवी 'चक्रवर्ती' होण्याऐवजी कधीकधी नादाचा दास होऊन जातो! आणि पद्मावतीच्या पायांतल्या घुंगरांसारखी नुसतीच शब्दांची रुमझुम ऐकत राहतो!

गणवृत्त असो, वा मात्रावृत्त असो, वृत्ताच्या धाग्याधाग्यातून जयदेवाने आंदोळत्या लयीची आणि ललित ध्वनींची गुंफण केलेली आहे. मोठ्याने वाचताना तिचा अद्‌भुत प्रत्यय येतो. वृत्तरचना, गेय बंध, आलंकारिक शैलीचा संयत उत्कर्ष, मधुरा भक्तीचे अधिष्ठान, सरस शब्दबंध ह्या सर्वांचे रसायन संस्कृतात येथे प्रथमच आस्वादावयाला मिळते. हा आस्वाद घेताना रंग, नाद, साहित्य, भाव, लय, भक्ती, नृत्य ह्यांच्या कक्षा वाढत्या—विस्तारत्या आणि एकमेकींत मिश्रित होत जातात. एका रम्यधूसर, तरलमधुर गुंफणीमध्ये आपण सापडतो.

'गीतगोविन्दा'वर आधारलेल्या अशा प्राचीन काळच्या विविध शैलींच्या चित्रावली उपलब्ध आहेत. त्यांचा 'गीतगोविन्दा' शी कसा संबंध आहे ते पाहणे हा ह्या प्रस्तावनेचा विषय नाही. पण ते पाहणे उद्बोधक मात्र होईल. त्याचप्रमाणे जयदेवाच्या शब्दयोजनकलेचाही सविस्तर रीतीने अभ्यास करणे हे फलदायी होण्यासारखे आहे. जयदेवाने संस्कृत भाषा ही कमालीची लवलवीत आणि तरल केलेली आहे. मात्रावृत्तांचा इतका विपुल उपयोग इतक्या परिमित क्षेत्रात, इतक्या समर्थपणाने दुसऱ्या कोणत्याही संस्कृत कवीने केला नसेल. अशा वृत्तांसाठी आणि अभिप्रेत यमकानुप्रास साधण्यासाठी त्याला विशिष्ट अशा लघुगुरू अक्षरांचा प्रयोग करावा लागला आहे. लघू अक्षरांचा तर तो प्रभूच म्हणावा लागेल. मात्रावृत्तात लघुगुरू अक्षरांची एक परिमित अशी राशी असते, आणि प्रत्येकच कवी ही राशी संभाळतो. पण जयदेव ती नुसतीच संभाळीत नाही. तो ती अशा रीतीने 'तोलतो' की, त्याच्या तोलदार रचनेतून लयबद्धता उत्पन्न होते. वृत्तामधून उत्पन्न होणाऱ्या ह्या लयीचा मेळ तो शब्दांमधल्या झंकारांशी घालतो. मग शब्द आपला नाद

वृत्ताच्या लयीमध्ये विरघळवून टाकितो; आणि वृत्ताची लय त्या शब्दनादाला तोलून धरते. दोन्ही मिळून अर्थाला लडिवाळपणाने संभाळतात; आणि या सर्वांतून संकलितपणे रसनिर्मिती होते. पहिल्या सर्गातला चौथा प्रबंध हा या दृष्टीने वाचण्यासारखा आहे.

अशीच जयदेवाची शब्दयोजनकला. कालिदास हा साधेच शब्द विविध संदर्भांत वापरून त्यांच्याकडून वेगवेगळ्या अर्थच्छटा काढून घेतो; आणि अशा प्रकारे शब्दांना वाकवितो. उदाहरणार्थ, 'स्निग्ध' हा एकच शब्द कालिदास रूपाला, नादाला, वर्णाला अनुलक्षून आणि इतरत्रही वापरतो. त्याचे अर्थ मग फिरते राहतात. जयदेवही पुष्कळ वेळा हे असे करितो, असे आढळते. वाऱ्याच्या बाबतीत 'धीर' हा शब्द किंवा 'कोमल' हा शब्द संस्कृतात योजिलेला सहसा आढळणार नाही. पण जयदेव

**धीरसमीरे यमुनातीरे वसति वने वनमाली । ५·११·१**

आणि

**ललितलवङ्गलतापरिशीलनकोमलमलयसमीरे । १·३·१**

ह्या स्थळी हे शब्द फार खुलावटीने आणि सहजतेने वापरतो. खरोखर, 'धीरसमीर' म्हणून त्याला काय सुचवावयाचे असेल? मनुष्य, त्याचे मन ही 'धीर' असतात; पण 'समीर धीर' म्हणजे काय? तसाच 'कोमल' ह्याही शब्दाचा प्रयोग पहा. ह्याच ठिकाणचा (१·३·१) 'लवङ्गांच्या लतांचे **परिशीलन'** हाही शब्द पहा. असे त्याचे शब्द आलवार असतात. कृष्णाचे **'कलेवर'** नील असल्याचे तो आवर्जून सांगतो. राधेचे **'कलेवर'** श्रमजलाने भिजल्याचे तो म्हणतो. 'माझे काजळ **उजळ** कर,' असे राधा म्हणते. जयदेवाने आपले गीत 'उज्ज्वल' असल्याचे म्हटले आहे. हार, आननकमल, गीत, गण्ड (= गाल), केशिमथन, हृदय हे सर्वच 'उदार' आहेत. आता ह्या एका पदाचे भाषांतर तरी कसे करणार? कृष्णाचा कपोल (= गाल) हा चुंबनासाठी 'अनुकूल' (१·४) आहे. बालशशी हा 'अलोल' (४·९) आणि केशव हा 'नव' आहे. राधा फणकाऱ्याने कृष्णाला 'हरिहरि' म्हणते (८·१७)! आता, हे संस्कृतात कोणते रूप म्हणावयाचे? —अव्यय? पण ह्या (मराठीसदृश असलेल्या) उद्गारात राधेचा फणकाऱ्याचा भाव मात्र पुरापुरा जाणवतो. ह्या प्रबंधाची सुरुवातच मुळी 'हरिहरि याहि माधव याहि केशव मा वद कैतववादम्' अशी फणकाऱ्याची आहे. ह्यातील 'याहि', 'मा', '—वादम्' ह्यांवरचे जबरदस्त आघात खरोखर अप्रतिम आहेत. हे आणि असे अनेक शब्दप्रयोग ही जयदेवाची खास वैशिष्ट्ये आहेत. त्यांचा स्वतंत्र रीतीने अभ्यास करणे हे यासाठीच महत्त्वाचे आहे.

'गीतगोविन्द' वाचताना त्यातील दोन गोष्टींनी आपण अतिशय मोहून जातो : शब्दलालित्य आणि मात्रावृत्तरचना. जयदेवाचे शब्दलालित्य असे अद्भुत आहे की, त्यामुळेच 'गीतगोविन्दा' चे भाषांतर ही दुर्घटच नव्हे, तर अशक्य गोष्ट होऊन बसते. तोच प्रकार त्याच्या मात्रावृत्तांच्या रचनेचा. इतक्या विपुल प्रमाणाने, अशा गेयतेने आणि असल्या नादवत्तेने मात्रावृत्ते दुसऱ्या कोणत्याही कवीने योजिली नसतील. प्राकृतातील भावमय मात्रावृत्तांचा त्याच्यावर प्रभाव पडलेला असावा. अलंकारांची लपतछपत येणारी सेना, शब्दरचनेची भुलविणारी मुलायम चारुता, वृत्तरचनेचा अनोखा सफाईदारपणा, वातारवरणाची कोवळीक आणि गेयतेची धुंद करणारी मोहिनी ह्यांहीमुळे 'गीतगोविन्द' कोणत्याही कुशल भाषांतरकाराची घोर निराशा केल्यावाचून राहत नाही.

महाराष्ट्रामध्ये वैष्णवभक्तीचा प्रभाव उत्तरेकडल्यासारखा गाढ नसल्याने आपण राधाकृष्णविलासांकडे साधारणतः लौकिकापलीकडच्या अर्थाने पाहत नाही. आपल्याकडील भक्तीलाही ज्ञानदेवांनी एक बौद्धिक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. आपल्या भक्तियोगाचा हा गुण असेल वा नसेल. मात्र त्यात एक तर्ककर्कशता आहे. सगुणातही निर्गुण रूप अनुभविण्याची आपली एक रीत आहे. सगुणाच्या लोभस अनुभवापेक्षा निर्गुणाचा निरालंब साक्षात्कार आपण अधिक मानतो. त्यामुळे आपल्या सगुणाला निर्गुणाची झाक येते. सगुण हे नुसते सगुण राहत नाही; ते निर्गुणाच्या छायेत, छापेत वावरते; आणि निर्गुणाकडे झेपावत राहते. पण ओडिसा, बंगाल, मिथिला येथे वैष्णवभक्तीच्या प्रबल संप्रदायामुळे सगुणाचा सांद्र अनुभव सहज येतो; आणि पदावली ऐकताना भक्तांच्या डोळ्यांतून भक्तीचे झरे झुळझुळू लागतात. बौद्धिक प्रयत्न आणि ऐंद्रिय संवेदना ह्यांतला हा भेद आहे.

जयदेवाच्या भक्तिमार्गात पंथीय स्वरूपाचे अथवा जखडबंद असे काही नाही. दिव्य भक्तीला त्याने मानुषरूप दिले आहे, हे जसे खरे, तशीच मानवी वर्णनात त्याने दिव्यत्वाची प्रतीती आणून दिली आहे, हेही तितकेच खरे आहे. भावभावनांचा गहिरेपणा, पदांची गेयता, वर्णनांची चित्रमयता, शब्दांची नादमयता, धर्मपरतेची गूढता आणि निवेदनाची सरलता हे गुण दुसरीकडे कोठेही इतक्या उत्कटतेने आढळणार नाहीत. हे सर्व व्यक्त करण्यासाठी राधाकृष्णविलासाइतकी अनुकूल आणि नटमोगरी कथा दुसरी कोणती मिळाली असती?

राधाकृष्णांच्या प्रेमलीला आणि त्यांचे मिलन यांची परिपूर्ती झाल्यावर—अर्थात मधुरा भक्तीच्या भाषेत जीवभावाचा बह्मभाव झाल्यावर—राधेने कृष्णाला पुन्हा आपल्या अंगप्रत्यंगांवर शृंगाराचा आणि अलंकारांचा पूर्वीचा साज चढविण्यास सांगितले, असे जयदेवाने अखेरच्या बाराव्या सर्गात अतिशय काव्यमय वर्णन केले आहे. मिलनानंतरच्या पुन्हा दुसऱ्या मिलनासाठी ही पूर्वसिद्धता तर नसेल! पण मधुरा भक्तीच्या संदर्भात ह्याचा अर्थ काय करावयाचा? जीव हा ब्रह्मभावाला पोहोचल्यावरही भक्तीचा आनंद उपभोगण्यासाठी पुन्हा तो द्वैतभावाला येतो, असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. ['पहा : ज्ञानदेवी : १२·१८५—१८७. **टीप** : 'श्लोकगीतांचे संदर्भक्रम रा. चिं. श्रीखंडे यांनी संपादित केलेल्या 'सुश्लोकगोविन्द' ह्या पुस्तकातील संस्कृत भागातून दिलेले आहेत. प्रथम सर्ग, नंतर प्रबंधक्रम, शेवटी कडवे.] भक्तीच्या—मधुरा भक्तीच्या—आनंदाची ओढ अशी ही लोकविलक्षण असते. ह्यात जसे लौकिक जीवनाचे प्रतिबिंब आहे, तसा भक्तीचाही अनुभव आहे. असे चक्रपरिवर्तन हा जीवनाचाच एक विशेष आहे, ह्या दृष्टीने पाहिले असता 'गीतगोविन्दा' चा अखेरचा सर्ग एका वेगळ्या परिमाणाने आपल्याला जाणवू लागतो. आदि आणि अंत हे एकरूप होतात. वर्तुलाची टोके येथे मिळतात. एका नूतन 'गीतराधिके' च्या, किंवा नूतन 'गीतगोविन्दा'च्या म्हणा, जन्माची येथे सूचना आहे. ही एकता म्हणजे विश्वचक्राच्या आणखी विशाल नवीन आशयाची प्रतीती आहे. केंद्र नसलेल्या एका अमित वर्तुलाची जाणीव आहे.

'गीतगोविन्दा'चा गाभा असा व्यापक दृष्टीने काव्यात्म आहे, तर त्याचा बाह्य परिवेष गानात्म, नृत्यात्म आहे. संस्कृत वाङ्मयातले संकेत येथे आहेतही, आणि नाहीतही. नायकनायिकांच्या दृष्टीने ते आहेत; पण त्यांच्या आविष्कारात आणि नादगेय स्वरूपाने ते नाहीत. लौकिक आणि आध्यात्मिक वृत्तीचे मोठे झुकांडी देणारे रूप येथे पहावयाला मिळते. असा वाङ्मयप्रकार आपल्याला अन्यत्र दिसत नाही. 'गीतगोविन्द' हे महाकाव्याइतके व्यापक आणि महान नाही; खंडकाव्यासारखे त्याचे स्वरूप आखीव-रेखीव नाही; आणि मुक्तकासारखे ते लघुपृथकही नाही. ती एक आलवार फुलमाळ आहे— हलकी, सुगंधी, थोडी अरेखित, काही धूसर. पण सर्वत्र वेधक. कृष्णाच्या गळ्यातली वनमालाच जणू! जयदेवाची भिस्त व्यंजनेवर फार नाही. त्यामुळे 'गीतगोविन्दा'तल्या काव्यगुणाची प्रतवारी वेगळी झाली आहे. तथापि याहून अधिक गूढ आणि श्रेष्ठ कवित्वाने त्याची गेयता कदाचित दुखावली असती, असे वाटते. गेयता आणि फार श्रेष्ठ कविता

एकत्र नांदावयाला फारकरून तयार नसतात. संस्कृत भाषा हवी तर (हवी तशी) दमदार पाहिजे तर (पाहिजे तशी) कठोर आणि इच्छिल्यास मऊ-गोड अशी आहे. पण जयदेवाने मात्र ती रेशमाच्या लडीपेक्षाही, सायीपेक्षाही लुसलुशीत, दुलदुलीत करून आपल्या काव्यात पार मुरवून, विरघळवून टाकिली आहे. स्वतः जयदेव आपल्या काव्याविषयी 'गीतगोविन्दा' च्या शेवटच्या श्लोकात म्हणतो :

"जयदेवाची श्रृंगारमय आणि ललितसुंदर अशी कल्याणवाणी जोवर भूलोकी आहे, तोपर्यंत द्राक्षामदिरेच्या गालावर लाजेची गुलाबी चढेल! शर्करा कर्कश होईल, द्राक्षांकडे मग कोण ढुंकून तरी पाहणार? —अमृता, तू कसले 'अ-मृत'? तू तर मृत! दुधाला पाण्याची चव येईल! रसाळ आम्रफला, तू खुशाल आकांत करीत बैस! —आणि कांतेचा अधररस? —तोही रसातळाला जाईल!"

# श्रृंगार-श्रीरंग

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी आणि गीतकार कै.राजा बढे ह्यांनी केलेला 'श्रृंगार-श्रीरंग' हा जयदेवाच्या 'गीतगोविन्दा' चा अनुवाद 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळा'च्या वतीने प्रकाशित होत आहे, ही हर्षकारक घटना आहे. आजपर्यंत 'गीत-गोविन्दा'चे अनेक अनुवाद आणि भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत. हे पूर्वोक्त विवेचनात आले आहे. हे भाग्य कालिदासीय 'मेघदूता'च्या खालोखाल जयदेवाच्या 'गीतगोविन्दा'लाच लाभलेले असावे. शुद्ध काव्य ह्या दृष्टीने 'गीतगोविन्दा'चा क्रम 'मेघदूता'च्या नंतर लागेल, ह्यात शंका नाही. पण नृत्यगेयकाव्य मात्र 'गीत-गोविन्दा' सारखे संस्कृतात दुसरे कोणतेच नाही. त्याची ध्वनिमाधुरी, कोवळीक आणि रसभावपूरित आविष्कृती केवळ अद्वितीय आहे.

कोणत्याही उत्तम कविकृतीचे भाषांतर अथवा तिचा अनुवाद करणे हे सतत पराभवाच्या छायेत वावरण्यासारखेच दमछाक करणारे असते. असे म्हणतात की, भाषांतराची कला ही स्त्रीसारखी असते. पतिनिष्ठ स्त्रीप्रमाणे ती एकतर मूलनिष्ठ तरी असेल, नाही तर सुंदर तरी असेल! निष्ठावान असली, तर सुंदर असणार नाही; आणि सुंदर असली, तर निष्ठावान राहणार नाही! काहीही असो, मुळातल्या कितीतरी मनोरम छटा आणि रंग, मंजुळ ध्वनी आणि तरंग भाषांतरात कोठल्या-कोठे हरवून जातात. त्या सर्वच्या-सर्व पकडण्यासाठी सिद्धहस्त कवीचाच शोध करावा लागतो. आणि त्याच्याही पदरी पुरे माप पडतेच, असे नाही. कालिदासाच्या 'मेघदूता'चे भाषांतर अतोनात कठीण तर खरेच; पण जयदेवाच्या 'गीतगोविन्दा'चे भाषांतर सोपे मुळीच नाही. किंबहुना, काही वेळा त्याहीपेक्षा दुर्घट आहे. कारण त्यात ध्वनीचाही पाठलाग करीत रहावे लागते; अनेक प्रकारच्या गणमात्रावृत्तांचाही मागोवा घेत बसावे लागते. 'गीतगोविन्दा'चा अनुवाद करण्यास राजा बढे यांच्यासारखा मराठीतील एक उत्कृष्ट गीतिकार लाभावा, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

कै. बढे ह्यांनी येथे मोठ्या चतुराईने वेगळीच वाट काढली आहे. भाषांतरही नाही, समवृत्तही नाही, नुसता अनुवादही नाही, तर त्यांनी 'गीतगोविन्दा'चा रसभावानुवाद केला आहे. अर्थात मुळातल्या प्रत्येक शब्दाचा आणि त्याच्या अर्थाचा कानोसा त्यांनी घेतला नाही; तर त्या शब्दाला एकूण काय म्हणावयाचे आहे, काय सुचवावयाचे आहे, ह्याकडे त्यांनी कान दिला आहे. म्हणून एखादे वेळी त्यांनी अधिकही शब्द घातला आहे. मात्र शब्दातला भाव आणि उत्पन्न होणारा रस ह्यांशी प्रतारणा करावयाची नाही, ह्याकडे त्यांनी अवधान दिले आहे. ती बैठक मोडू दिली नाही. त्यामुळे मूळ कृती घेऊन तिचा पडताळा ह्या रसानुवादात सारखा पाहत राहणे योग्य नाही. ही काही आरशातली प्रतिकृती नाही; तो दरीमधून येणारा ध्वनीचा प्रतिनिनाद आहे. तथापि तो मूळच्या ध्वनीचाच आहे, हे आपल्याला सतत जाणवत राहते. रसानुवादामुळे 'गीतगोविन्दा'चे मूळ वातावरणाचे आलंकारिक छत आपल्या शिरावर टिकून राहिलेले आहे. ह्यामुळे 'गीतगोविन्द' हे काव्य क्षणभर दूर ठेवून केवळ 'श्रृंगार-श्रीरंग' वाचणे हे बहारीचे ठरते. ललितध्वनींचा कानोसा घेण्यात, लाटानुप्रास सहजपणे रचण्यात, यमकांची सुडौल बांधणी करण्यात आणि मराठीतल्या शब्दांची उचित जोखण करण्यात बढे यांना जणू उपजतच कुशलता आहे. त्यांचा ह्यातला कोठलाही 'प्रबंध' वाचताना आपल्याला अशी जाणीव होते की, ह्या कवीने मूळ कृती फार चांगल्या रीतीने आत्मसात केलेली आहे. मूळ कृतीचे रक्त होऊन, ते रूपांतरित होऊन, मराठी शब्दांतून आणि लोभस शैलीतून ते पाझरत राहते. रसवृत्तीला कोठेही डंख पोहोचत नाही.

अनुक्रमणिका

कै. बढे ह्यांचा रसानुवाद किती सरस साधला आहे, ते पाहण्यासाठी फार पाने उलटावयाला नकोत. (किंवा, कोणतेही पान उलटा!) अगदी पहिल्याच सर्गातला तिसरा 'प्रबंध' ('विहरति हरिरिह सरसवसन्ते') पहा :

**विहरति हरिसह सरसवसंती**
**विरह हरित हरि, हसति विरहिता**
**सुखवित श्यामल कांती ॥ ध्रु० ॥**

**डुलवित ललित लवंगलतांना मलय-समीर विहारी**
**गुंजित भृंग, विहंगम कोकिल मंजुल कुंजविहारी**
**प्रीति भरे मदयंती ॥ १ ॥**

**मदनोन्मादित दूर दयित, वधुवृंद विलापी पोळे**
**नील नि लोलुप अलिकुल, कलिका बकुलफुलांतरि लोळे**
**रसिका, गंधित भ्रांती ॥ २ ॥**

**नवदलमाल तमाल सुपरिमल हरित हरिणि मदगंधा**
**रक्तपळस सुमसायक घाय करी युवहृदय निखंदा**
**तळमळ ती एकांती ॥ ३ ॥ इ.**

किंवा, १·४ ('हरिरिह मुग्धवधूनिकरे') हा 'प्रबंध' पहा :

**हरि हा मुग्ध वधूंसह गे**
**करित विलास वनी सुभगे ॥ ध्रु० ॥**

**श्यामतनूवरि चंदनउटि ती, पीतवसन वनमाळी**
**कुंडलमणि गालांवर रुळती, हसतो माधव गाली**
**अधरी चांदणेच बिलगे ॥ १ ॥**

**पीनपयोधरभारवती कुणि आलिंगित श्रीहरिला**
**ऐक, ऐक राधिके, रागिणी पंचम सुस्वर धरिला**
**गुंतवी ते जीवितधागे ॥ २ ॥ इ.**

ह्यात बढे यांनी हलकेच पदरची काही नवी भर टाकून कशी पुष्टी आणली आहे, आणि ही भर मुळात कशी सामावून जाते, ते पाहण्यासारखे आहे. ५·१० ह्या 'प्रबंधा'त 'झुरतो ग वनमाली' ह्या पालुपदाने किंवा ७·१३ ह्या 'प्रबंधा'त 'अशि वैरिण का ग होसी?' ह्या पालुपदाने लावणी ढंगाचे कसे हळुसरसे शिंपण केले आहे, आणि तेही कसे मनोज्ञपणे संपादून जाते, ते अनुभविण्याजोगे आहे. बढे यांची शब्दयोजनकला पुष्कळदा जयदेवाचाच पडसाद आपल्याला ऐकविते; आणि ती ओळीओळीत, कडव्याकडव्यात आपल्या कानांला झुलवीत राहते. त्यांच्या रचनेत ऐन संस्कृत शब्द आणि शुद्ध मराठी शब्द हे मांडीला मांडी लावून बसतात,

आणि एकमेकांची खुलावट करतात. लावणीच्या ढंगाचा भडकपणा येऊ नये, म्हणून त्यांनी जो संयम पाळला आहे, तो अतिशय वेधक पण दुर्मिळ आहे. ज्यांना संस्कृताचा उगाचच धसका आहे, त्यांना ‘श्रृंगार-श्रीरंग’ स्वतंत्रपणे वाचावयाला तर खास आवडेलच, पण तो वाचल्यावर मूळ ‘गीतगोविन्द’ ही वाचावेसे वाटेल, हे राजा बढे यांचे सर्वांत मोठे यश आहे.

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


निवेदन ........ ५
प्रस्तावना ........ ८
श्रृंगार-श्रीरंग ........ २५
सर्ग पहिला सामोद-दामोदर ........ ३०
सर्ग दुसरा अक्लेश-केशव ........ ३७
सर्ग तिसरा मुग्ध-मधुसूदन ........ ४२
सर्ग चौथा स्निग्ध-मधुसूदन ........ ४६
सर्ग पाचवा साकाङ्क्ष-पुण्डरीकाक्ष ........ ५१
सर्ग सहावा सोत्कण्ठ-वैकुण्ठ ........ ५७
सर्ग सातवा नागर-नारायण ........ ६१
सर्ग आठवा विलक्ष-लक्ष्मीपती ........ ७१
सर्ग नववा मुग्ध-मुकुन्दवदन ........ ७५
सर्ग अकरावा सानन्द-दामोदर ........ ८४
सर्ग बारावा सुप्रीत-पीताम्बर ........ ९२
गीतगोविन्दकाव्यम् ........ ९९

**सर्ग पहिला**

**सामोद-दामोदर**

वंदन

प्रास्ताविक

प्रबंध १

दशावतारांचे स्मरण

प्रबंध २

श्रीकृष्णस्तव, काव्यवस्तुप्रारंभ

प्रबंध ३

वृंदावनातील वसंतशोभावर्णन सखी कामपीडित राधेला सांगते.

प्रबंध ४

गोपींसह चाललेल्या रासक्रीडेचे सखी वर्णन करून सांगते.

सर्गसमाप्ती, शुभाशीर्वाद

अनुक्रमणिका

# सर्ग पहिला
# सामोद-दामोदर

'मेघांनी हे भरले अंबर तरु तमाल घन श्यामल छाया!
जा घेउनिया खेळायाते राधे अवखळ बाळ कन्हैय्या'
नंदवचन ऐकुनिया आतुर राधा-माधव जाया निघती
यमुनापुलिनी, कुंजवनी रतिलीला लालस क्रीडा करिती ॥ १ ॥

छेडित वीणा हृदयशारदा
मनोमयी मधुगीतसंपदा
वासुदेव-रति-केलि-कला ही
श्रीजयदेव कवी नित गाई ॥ २ ॥

वांछिसि अपुले मन रमवाया
हरिस्मरणाचे अमृत प्याया
कोमल-कांत पदावलि मधुरा
ऐका रसिका जयदेवगिरा ॥ ३ ॥

रचित कवि उमापती उचित शब्दसंहती
निपुण शरण ग्रथित विषम शब्दशरे काव्यरती
सजवि चतुर गोवर्धन श्रृंगारिक भावयुती
श्रवणमधुर कुशल कवी धोयी वितरि काव्यकृती
ललित-मृदुल पदन्यास श्रुतिमंजुल शब्दसरी
रचना जयदेवाची अतुल ही जगांतरी ॥ ४ ॥

## प्रबंध पहिला

(राग—मालव, ताल—रूपक)

प्रलयकालि तारिलेस वेदा । मुनिजनमानस वारित खेदा
केशव मीनशरीर धरी । जय जगदीश हरी ॥ १ ॥

पाठीवर वाहिलीस पाही । वाचविली तू वसुंधरा ही
केशव कासवरूप धरी । जय जगदीश हरी ॥ २ ॥

कलंक शोभे चंद्रकलेवरि । धरा धरी ती दंताग्रावरि
केशव वराहरूप धरी । जय जगदीश हरी ॥ ३ ॥

करकमलावरि नखशृंगे ती । असुरभृंग कश्यपू विदारिति

केशव नरहरिरूप धरी । जय जगदीश हरी ॥ ४ ॥

छळि बळिराजा तो बटु वामन । करि पदनीरजले मन पावन
अद्‌भुत वामनरूप धरी । जय जगदीश हरी ॥ ५ ॥

क्षात्रकुले संहारित निकरे । भृगुपति भिजवित भूमी रुधिरे
केशव भार्गवरूप धरी । जय जगदीश हरी ॥ ६ ॥

इंद्रजित् वधिला दशकंधर । थरकापे भिउनी धरणीधर
केशव रघुपतिरूप धरी । जय जगदीश हरी ॥ ७ ॥

हलधर भयभीता कालिंदी । येई वाहत पदारविंदी
नीलवसन वेढिले हलधरे । जय जगदीश हरे ॥ ८ ॥

निंदित यज्ञबली पशुघाता । सदय हृदय हे अनाथनाथा
केशव बुद्धशरीर धरी । जय जगदीश हरी ॥ ९ ॥

म्लेच्छहनन करि खड्‌ग धरी । धूमकेतु की कराल निकरी
केशव कल्किस्वरूप धरी । जय जगदीश हरी ॥ १० ॥

श्रीजयदेवरचित मधुछंदा । गाइन मी निंत हृदयानंदा
केशव दशविध रूप धरी । जय जगदीश हरी ॥ ११ ॥

(प्रबंध पहिला समाप्त)

## प्रबंध दुसरा

(राग—गुर्जरी, ताल—प्रतिमठ)

कमलाश्रित-कुचमंडळ, श्रुतिकुंडल हे
कंठि रुळत वनमाळ। जय जय देव हरे ॥ १ ॥

रविकुलमंडळ-मंडन, भवखंडन हे
मुनिजनमानस हंस। जय जय देव हरे ॥ २ ॥

कलियमधन हे जनसुखवर्धन
यदुकुलनलिन दिनेश। जय जय देव हरे ॥ ३ ॥

मधु-मुर-असुर-विनाशन, गरुडासन हे

अनुक्रमणिका

सुरकुल-केलि-निधान । जय जय देव हरे ॥ ४ ॥

कमलदलापरि लोचन, भवमोचन हे
त्रिभुवनि भरुनी उरले । जय जय देव हरे ॥ ५ ॥

जनकसुतेचे भूषण, जिंकित खर-दूषण
छेदि समरि दशकंठ । जय जय देव हरे ॥ ६ ॥

श्याम जलदतनु सुंदर, धरि कंधरि मंदर
श्रीमुखचंद्रचकोर । जय जय देव हरे ॥ ७ ॥

तव चरणी शरणागत, सुखसंचित हे
प्रणतजनां प्रतिपाळी । जय जय देव हरे ॥ ८ ॥

श्रीजयदेवरचित, रसरंजित
मंगल उज्ज्वल गीते । जय जय देव हरे ॥ ९ ॥

(प्रबंध दुसरा समाप्त)

हरिल गे श्याम मनाची व्यथा
कमला-कुच-केशर-चिन्हांनी चित्रांकित उर लक्षी
रतिश्रमजल-बिंदुंनी गुंफिले जाल कुतुहले वक्षी
सुखविल ह्रदया हरिची कथा ॥ हरिल गे... ॥ ५ ॥
वासंतिक दुर्गम कासारी
वसंत-कुसुमापरि सुकुमारी
मदनभरे विव्हल अनवाणी
फिरे राधिका वेड्यावाणी
शोधित श्यामसखा वनकुंजी
मंजुवचे सखि घालित रुंजी ॥ ६ ॥

## प्रबंध तिसरा

(राग—वसंत, ताल—यति)

विहरति हरिसह सरसवसंती
विरह हरित हरि, हसति विरहिता
सुखवित श्यामल कांती ॥ ध्रु० ॥

डुलवित ललित लवंगलतांना मलय-समीर विहारी

अनुक्रमणिका

गुंजित भृंग, विहंगम कोकिल मंजुल कुंजविहारी
प्रीति भरे मदयंती ॥ २ ॥

मदनोन्मादित दूरदयित, वधुवृंद विलापी पोळे
नील नि लोलुप अलिकुल, कलिका बकुलफुलांतरि लोळे
रसिका, गंधित भ्रांती ॥ ३ ॥

नवदल-माल-तमाल सुपरिमल हरित हरिणि मदगंधा
रक्तपळस सुमसायक घाय करो युवहृदय निखंदा
तळमळ ती एकांती ॥ ४ ॥

मदनराज-भव कनकदंड-नव-केसर-कुसुम विकासे
शर मधुकरदलमीलित सुमदल-शरधि स्कंधि विलासे
जिंकित हृदयप्रांती ॥ ५ ॥

विगलित लज्जित, जग अवलोकन तरुण करुण उपहासे
विरह-निबंधन दंतुर केतकिकुंतन कुतुहल भासे
रदन-द्युति मदयंती ॥ ६ ॥

माधविका मधुमालति जाति सुगंधित कुंद-चमेली
मुनिमानस-मोहित हा युवसख वसंत सारस केली
उधळित रंग दिगंती ॥ ७ ॥

मुक्तविहारि लता तुज कवळी मोहरसी सहकारा
वृंदावनि गोविंद येड गे यमुनापुलिनि विहारा
गुंफिली सुमन-वैजयंती ॥ ८ ॥

हरिचरणस्मृतिसार गीतमय, श्रीकवि-जयदेवाचे
वन फुलले मन वसंतसमयी, खेळ ललित मदनाचे
ऐक मधुर रसवंती ॥ ९ ॥

(प्रबंध तिसरा समाप्त)

मदनसखा, मलय-पवन मंद मंद वाही
ने लुटुनी कुसुमगंध, धुंद दिशा दाही
मालतिची खुलत कळी
थरथरते ऽ पाकळी
अस्फुट दल-उमल तरी, मुकुल-परिमला ही ॥ १ ॥

अनुक्रमणिका

जाइ-जुई सुमपराग
वनि अनंग लावि आग
केतकिचा मधुरगंध मदनबंधु होई
विंधित विरही हृदया, प्राण विकल होई ॥ २ ॥

कवळि चंदना भुजंग गरळ करित काहिली
क्लेशक्लांत मलयवात जातसे हिमाचली
मोहरली वनमाया आम्रमंजिरी डुले
करिति 'कुहू' कोकिलकुल काननी निनादले ॥ ७ ॥

भृंग लोभले सहकाराच्या मुग्ध मंजिरीवरी
कोकिलकूजन येता कानी विकल होति अंतरी
वसंतसमयी येता आठव दिवस सरे विरहाचा
मनोमनी ये घडुनी संगम पथिका प्रिय रमणीचा ॥ ८ ॥

विलासिनी या रमणी अनेका
आलिंगिता, लालस भावलेखा
श्रीकृष्ण तो दाखविते दुरूनी
राधेस सांगे सखि गूज कानी ॥ ९ ॥

## प्रबंध चौथा

(राग—रामकली, ताल—रूपक)

हरि हा मुग्ध वधूंसह गे
करित विलास वनी सुभगे ॥ ध्रु० ॥

श्यामतनूवरि चंदन-उटि ती, पीतवसन वनमाळी
कुंडलमणि गालांवर रुळती, हसतो माधव गाली
अधरी चांदणेच बिलगे ॥ २ ॥

पीनपयोधर-भारवती कुणि आलिंगित श्रीहरिला
ऐक, ऐक राधिके, रागिणी पंचम सुस्वर धरिला
गुंतवी ते जीवितधागे ॥ ३ ॥

पापणिचे मृदुपंख थरकती, भृंगनयन ते काळे
वदन-सरोजा भुलले मदना जागवितो वेल्हाळे
लोचने खेळति अनुरागे ॥ ४ ॥

चुंबि कपोला कुणी येउनी गुपित सांगता कानी
रोमांचित हो नीलतनू ती मधुराधर चावोनी
पुरवी सुप्त मनोरथ गे ॥ ५ ॥

केलिकला-रति-चतुरा दुसरी ओढित धरुनी शेला
यमुनापुलिनी हळूच न्याया एकांती अलबेला
भृंग तो पुष्पवतीसंगे ॥ ६ ॥

करतालावर किणति कंकणे वाजवि मंजुल वेणू
रासरचित नाचती अंगना थरकति गतिस्वर रेणू
गिरकत वसुंधरा वेगे ॥ ७ ॥

आलिंगुनि गौरांगी वामा, चुंबित रमवी रामा
हासत डोळे मोडित पाही तिसरी ती अभिरामा
लतागुंफेत जीव रंगे ॥ ८ ॥

श्रीजयदेव-कवीकृत अद्‌भुत केशव-केलिकला ही
वृंदाविपिनी, यमुनापुलिनी रास रचुनि मन मोही
चारु-चरितांकित ललितांगे ॥ ९ ॥

(प्रबंध चौथा समाप्त)

जे आले अनुरंजना प्रियजना सानंद इंदीवर
लीला-लालित श्याम, कामललिता गोपांगना सुंदर
आलिंगी रसरंग ही मधुवनी श्रुंगार-श्रीरंग हा
खेळे रास-विलास नीलकमली कामोत्सवी भृंग हा ॥ १० ॥

कवळि भुजंगम जवळी, जाळित जीव साहता क्लेशा
उत्कंठित बहु मलयानिल तो हिमगिरि-शैल-निवेशा
आम्रमंजिरी डुले आगमी, स्वनमंजुल भृंगांचा
कोकिल-कूजित कलरव कानी, विलास आनंदाचा ॥ ११ ॥

झाली पाहुनिया विलास-वनिता, उत्कंठिता राधिका
आली धावत देहभान सुटुनी, घाली मिठी माधवा
‘ओठी अमृत साठले हरि तुझ्या, होईन मी बासरी’
चुंबी प्रेमभरे सखी स्मितमुखी ती पाहुनी चातुरी ॥ १२ ॥

[सर्ग पहिला : सामोद-दामोदर समाप्त]

अनुक्रमणिका

## सर्ग दुसरा

**अक्लेश-केशव**

प्रबंध ५

विरही राधिका श्रीकृष्णाच्या इतर गोपांगनांसह चाललेल्या श्रृंगारलीला पाहून सखीशी बोलते.

प्रबंध ६

कामार्त राधा ते भाग्य मला केव्हा मिळेल, हे सखीला विचारिते.
सर्गान्ती आशीर्वाद

अनुक्रमणिका

# सर्ग दुसरा
# अक्लेश-केशव

रमता वनि रमणीसंगे ती वनमाळी
हो मनोभंग जीवास असूया जाळी
भ्रमभ्रमर गुंजती मधुप लताकुंजांत
सांगते राधिका सखिला एकांतात ॥ १ ॥

**प्रबंध पाचवा**

(राग—गुर्जरी, ताल—रूपक)

सखये, माधव खेळत रास
आठवते गे हास्यवदन ते
करि माझा उपहास ॥ ध्रु० ॥

मधुराधरि धरि मोहन बासरि, ऐक सरस रसवंती
चलितनयन मन मिलित कपोली नाचत कुंडल-कांती
भोगित मी वनवास ॥ २ ॥

केश कुरल, वलयांकित, खोवित मोरपिसे शिरि शोभे
मेघश्यामल रंग सुरंगी इंद्रधनूवर लोभे
दावित रंगविलास ॥ ३ ॥

गौळणि गौर, नितंबवती, मुख चुंबित मोहक हासे
प्रीतिसुधाधर-मधुरा-माधव आठवि तो उल्हासे
जाळित या जीवास ॥ ४ ॥

करचरणांतिल मणीभूषणे किरणप्रभा तम जाळी
पुलकित युवती तनु-भुजबंधी कवळि हसत वनमाळी
करिती तिमिर-निरास ॥ ५ ॥

चंद्रनील नव-जलदपटावर चंदनतिलक ललाटी
उभार उरोज चुरि हरि शौर्य निर्दय हृदयकपाटी
दावित चौर्यविलास ॥ ६ ॥

मकरकुंडले मणिमय गाली, तेजतिमिर करि लीला
पीतांबर नेसला, सावळा सुरमुनि होती गोळा
करिती सतत निवास ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

कदंबतरु-तळवटी सुशोभित श्याम हरित भय कलिचे
नयनकटाक्ष मदनशर सज्जित विंधित मन रमणींचे
नाचत हृदयामधली आस ॥ ८ ॥

कवि-जयदेव-रचित अतिसुंदर मधुरिपु मोहन छंदा
पुण्यवता अनुरूप रूप जे स्मरता पदारविंदा
मनोभृंग घे ध्यास ॥ ९ ॥

(प्रबंध पाचवा समाप्त)

मनमोहन माझा ग यदुराय
ध्यानि-मनी या नयनी स्वप्नी
पाहत मी गुणिराय ॥ ध्रु० ॥

गणति न अवगुण दोष तयाचे
छळ तोषविती काय ॥ २ ॥

रमता रमवित अन्य युवतिशी
प्रिय तरि मज, निरुपाय ॥ ३ ॥

स्मरहत मन हे स्मरते झुरते
नीज उडुनिया जाय ॥ ४ ॥

काय करू मी कसे आवरू
धाव घेति हे पाय ॥ ५ ॥

### प्रबंध सहावा

(राग—मालवगौड, ताल—एकताल)

मधुकेशिमथन मज भेटवि गे
हा मदन छळितसे मजसि वियोगे
जाइ सखे वेगे ॥ ध्रु० ॥

निशावसानी निबिड निकुंजी नितांत रमविन कांता
वसंत खेळे, हसती डोळे, आतुर मन एकांता
दिशि दिशि शोधित जागे ॥ २ ॥

पहिली-वहिली भेट प्रियाची, भीत लाजरी बाला

अनुक्रमणिका

बोलुनि मंजुल, सैल करील दुकूल मला अनुकूला
अनावृता उत्संगे ॥ ३ ॥

रचिली कोमल शेज फुलांची, शयनावरती निजले
कुच कवळित आलिंगन चुंबन, मधुर रसांनी भिजले
प्राशिता सुधा सानुरागे ॥ ४ ॥

मद-धुंदीने मिटत पापणी आळसलेले डोळे
अंग-अंग रोमांचित होई रतिरंगी हिंदोळे
रमता रतिरमणासंगे ॥ ५ ॥

कुस्करली ग फुले कोवळी, विस्कटली ही वेणी
'कुहुकुहु' कोकिल करि तरि कोरित उरी नखांची लेणी
टचटचली पीन कुचाग्रे ॥ ६ ॥

रुणुझुणु पैंजण करि, मणिरशना किणकिण, कटिकंपाने
सुरतरंग सरता कच कर्षुनि करील चुंबनदाने
कपोला केश सारुनी मागे ॥ ७ ॥

रतिलीलेने शिणली काया, परि तो रसरंगेला
मदनदमन मधुसूदन कधि गे पाहिन छिनिमिनि डोळा
ही आस जिवा लागे ॥ ८ ॥

हावभावयुत रतिश्रृंगारा सखिते सांगत राधा
श्रीजयदेव-कवी-विरचित या मधुरगीत-रसबंधा
रंगवी भावचित्र रंगे ॥ ९ ॥

(प्रबंध सहावा समाप्त)

गळे करांतुनि यावा, बघुनी मला लाजवंतीला
स्वेदसदन स्मितहास्यवदन तो दाखवि राजसलीला
नेत्रपल्लवी-संकेताने खुणावीत भ्रूभंग
व्रजललनांते जाया निघुनी सांगतसे श्रीरंग
सुमनांतरिच्या मधुरमरंदा भुलला भावमिलिंद
पाहिन कधि आनंदकंद हा भक्तसखा गोविंद ॥ २ ॥

विरहताप दे अशोक, शोकाकुल करिति लता
छळतो गे मन माझे बहर तयांचा फुलता
सरसन्निध उद्यानी कुसुमगंध येई

अनुक्रमणिका

**शीतमंद गंधवाह जाळितसे बाई**
**मधुपांचा गुंजारव आम्रमंजिरी भवती**
**सुखवी ना मजसि सखे प्राण विकल होती ॥ ३ ॥**

**विस्कटला वेणीबंध, थरथर ती भिवयांची**
**पापणिची हालचाल, चोरभेट नयनांची**
**अधरावरले हासू चांदणेच ओघळले**
**गालावर मोहरले चंद्राचे गोड खळे ॥ ४ ॥**

[सर्ग दुसरा : अक्लेश-केशव समाप्त]

अनुक्रमणिका

**सर्ग तिसरा**

**मुग्ध-मधुसूदन**

प्रबंध ७

श्रीकृष्णाचे विरहोद्गार

उपसंहार

आशीर्वाद

**अनुक्रमणिका**

# सर्ग तिसरा
# मुग्ध-मधुसूदन

कंसारी होय संसारी, वासनाबंध शृंखला
सोडुनी गोपिकावृंदा, राधिका हृदयी धरी ॥ १ ॥

मदनबाण व्रणविव्हल माधव, भवती शोधुनि दमला
दिसे न राधा, कालिंदीतट-कुंज-कोटरी निजला ॥ २ ॥

### प्रबंध सातवा

(राग—गुर्जरी, ताल—एकताल)

मजवरि रुसली राधा, मानिनी
मजवरि रुसली राधा
रमवित रमता रमणीसंगे
मानिनीचा मान भंगे
मी कारण या अपराधा ॥ ध्रु० ॥

बोलु कसे, करु काय भामिनी
चैन नसे ग विजनी सदनी
नीज न येई नयनी शयनी
छळिसि असा, प्रारब्धा ॥ २ ॥

कोपे चढती वरती भिवया
आठवितो गे वदन-कुवलया
रक्तकमलि जणु नीलभृंगि ती
भ्रमते मरंदलुब्धा ॥ ३ ॥

वससि सदा हृदयात कामिनी
वणवण वनिते फिरतो विपिनी
वेडा तुज धुंडीत कुंजवनि
तुजवरि प्रीत अगाधा ॥ ४ ॥

उगाच धरिसी अढी मज गमे
सोडि असूया येइ प्रियतमे
कुठे कळेना लपलिस सुषमे
क्षमा करी अपराधा ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

भास तुझा मज होइ राधिके
दूर उभी का मनोहारिके
आलिंगुनि तनु प्रीतिचंद्रिके
एकांती रतिबंधा ॥ ६ ॥

सखे येउ दे राधे करुणा
मदन छळितसे तुझिया रमणा
साहु कसे या जिवंत मरणा
निववी अनंगबाधा ॥ ७ ॥

सिंधुसंभवा चंद्रबिंब की
किंदुबिल्व कुलवतंस लोकी
श्रीजयदेव-कवीवर गाई
हरिसंकीर्तन-छंदा ॥ ८ ॥

(प्रबंध सातवा समाप्त)

नव्हे भुजंगम, मृणालमाला हृदयावरती पाहे
कमलदलांची पडे सावली, गरलकंठ हा नोहे
विरहि प्रियेच्या पांडुरपण ये, भस्म नसे रे अंगा
समजुनि शंकर करिसी कोपे प्रहार काय अनंगा ॥ १ ॥

नको रे धरू कुसुमचापा, बाण हा आम्रमंजिरीचा
कापवी देह टणत्कार, ओढिता कंकर भृंगाचा
सहज घेइ प्राण, अनंगा तव शरसंधान
घातकी तुझ्या प्रेमलीला, जिंकिती जगास मोहून ॥ २ ॥

विंधिती हरिणींचे डोळे, टाकुनी कटाक्ष मदधुंद
आधिच हृदय भेदले रे, जाहलो सख्या जायबंद
करावी छिन्नभिन्न हृदये पुन्हा का ती माळायाला
नसे पुरुषार्थ पुष्पधन्व्या, मारिता मज घायाळाला ॥ ३ ॥

कर्णपाळ प्रत्यंचा नयनांचे तीक्ष्म बाण
खेचताच वक्रगती भिवयांची ती कमान
देवि कामरूपिणीच राधिका, स्वये तिला
अजिंक्य मन्मथे अमोघ अस्त्रभार अर्पिला ॥ ४ ॥

करि घाय उरी सखि सायक तो तुझिया नयनांमधुनी सुटता
भृकुटी थरके, नच नेम हुके, तनु कापतसे धनु वाकविता

अनुक्रमणिका

मृदु कुंतल गुंतविती ललिते रति जागविती, मनि आतुरता
रशना मणि मंजुल नादविते, कटि कंपित चेतवि चित्तव्यथा ॥ ५ ॥

रतनार तुझ्या अधरा बघुनी, नच भान उरे मजसी रसिके
कुचमंडल कंचुकिसंचित ते करिती मज वंचित प्राणसखे
सुखसंग समागम स्पर्श तुझा, मतिविभ्रम लोचनि लास्य तसे
रसभाव सुधा मधुराच गिरा, मृदुहास्य तुझ्या अधरी विलसे
वदनांबुज सौरभ तो सुभगे, विषयी सविकल्प समाधित या
विरही तरिही तुजवीण सये, हृदयातिल दुःख न जाय लया ॥ ६ ॥

किरिट-कुंडले हलति लोल ती अधरी मंजुल वेणू
किंचित् कलती मान, अंगुली आंदोलित स्वररेणू
वेणूरव-रंजिता वाहते कालिंदी सुखसरिता
नुरले भान तयास कशाचे गानलुब्ध व्रजवनिता
कुणी न पाही, कटाक्षलीला, जडता मोहनबाधा
भावमुग्ध मुखचंद्र कौमुदी कामसुंदरा राधा ॥ ७ ॥

[सर्ग तिसरा : मुग्ध-मधुसूदन समाप्त]

अनुक्रमणिका

**सर्ग चौथा**

**स्निग्ध-मधुसूदन**

प्रबंध ८

सखी राधेची विरहव्याकुलता श्रीकृष्णाला सांगते.

प्रबंध ९

राधिकेची विरहावस्था

सर्गसमाप्ती : शुभेच्छा

अनुक्रमणिका

## सर्ग चौथा
## स्निग्ध-मधुसूदन

यमुनातीरी नीरव कुंजी उदास मानस मौनी
भ्रांतचित्त माधवा सांगते राधासखि येवोनी ॥ १ ॥

**प्रबंध आठवा**

(राग—कानडा, ताल—एकताल)

तुजविण विकल राधिका दीना
          हा विरह तिला साहीना
मदनशरे जाहली भयाकुल, माधव तव पदलीना ॥ ध्रु० ॥
निंदित इंदुकिरण, मन विंधित चंदनगंध विषारी
व्यालगरल लहरी अनुमीलित मलयसमीर विहारी
          तळमळते ती मीना ॥ २ ॥

हृदयि वसे ब्रिजलाल तयाते ठेवि उरी लपवोनी
मदनशरांचे घाव चुकविते नलिनिदले कवळोनी
          विरहे म्लान-मलीना ॥ ३ ॥

कुसुमाकर-शर-शेज रचे ती, विलास-केलि कराया
शरतल्यावरि कोमल काया तुजसी आलिंगाया
          अनुकंपित आंतर वीणा ॥ ४ ॥

वाहति नयनांतुनी आसवे भिवजी मुखारविंदा
अमृतबिंदू की ओघळती राहू गिळिता चंद्रा
          ती झाली रे अतिदीना ॥ ५ ॥

मदनरूप रेखिते तुझे तो कस्तुरिकेने श्यामा
पूजि मकर करि चूतमंजिरी, देउनिया अभिरामा
          रंगवी चित्र भावलीना ॥ ६ ॥

'आल्ये आल्ये, शरण प्रिया मी तुझिया पदारविंदा'
जाळित हा बघ चंद्र उदेला, लोटु नको गोविंदा
          जाहली हाय पराधीना ॥ ७ ॥

घडे न भेटी तुझी जाणुनी चिंतनि होई लीन
हसते, रडते, चिडते शोके चित्त शांतवी दीन

अनुक्रमणिका

राधिका होय भाग्यहीना ॥ ८ ॥

श्रीजयदेव-रचित मधुरचना, रुचेल तुजसी रसिका
हृदयभावकल्लोल राधिका, सखि सांगे हरि दुरि का
राहसि रे राधारमणा ॥ ९ ॥

(प्रबंध आठवा समाप्त)

विलासमंदिर तिला माधवा, काननवन भासते
उदास मनि हासते ॥ माधवा... ॥ ध्रु० ॥

सखि सहवासहि होय नकोसा
सदाच टाकित हाय उसासा । श्वासे तनु जाळिते ॥ माधवा... ॥ २ ॥

लागताच की वणवा विपिनी
सैरावैरा पळते हरिणी
विरहव्यथित ती दोन विरहिणी । लपावया धावते ॥ माधवा... ॥ ३ ॥

शार्दुल भासे, मदन यम खरा
गिळायास ये तिला श्रीधरा
आठवीत तुज श्यामसुंदरा । अश्रुमणी गाळिते ॥ माधवा... ॥ ४ ॥

## प्रबंध नववा

(राग—देशी, ताल—एकताल)

राधिका झुरते, झुरते तुजसाठी
माधवा, देई रे भेटी ॥ १ ॥

गळा मणिमाळा स्तनयुगुलावरती
रुळती, श्वासाने झुलती ॥ २ ॥

कृशतनु राधा, विरह दुर्निवार
तिला तो सोसवे न भार ॥ ३ ॥

विषासम होई शीत सुगंधाची
उटी लाविली चंदनाची ॥ ४ ॥

मदन हा जाळी, जाळित जीवास

अनुक्रमणिका

उष्ण ते सुटती निःश्वास ॥ ५ ॥

भिरभिरा पाहे, पाहे भवताली
दिसे का कोठे वनमाली ॥ ६ ॥

तरंगत सजल दृष्टि करुणा
तुटोनी देठ नलिन-नयन ॥ ७ ॥

रचावी शय्या मुकुलित कुसुमांची
भासते तिला इंगळांची ॥ ८ ॥

सांज ओसरता, चिंति भाविकाल
टेकुनी तळहाती गाल ॥ ९ ॥

'कशी बाई ग, कंठु काळरात?'
बैसते सखी विचारात ॥ १० ॥

राधिका माझी, अभागिनी पोर
म्लान ती दिसे चंद्रकोर ॥ ११ ॥

माधवा येई, येइ देवदेवा
जिवलगा, मरण तरी दे वा ॥ १२ ॥

विरहिणी राधा, धाव अता धाव
सारखे घेइ तुझे नाव ॥ १३ ॥

गाइ जयदेव, नित तुझिया छंदा
राधिकारमणा गोविंदा ॥ १४ ॥

(प्रबंध नववा समाप्त)

थरथरते, मनि झुरते, रातंदिन तळमळते
तव विरहे रतिरमणा, काळिज तिळतिळ जळते
रोमांचित होय तनू, करित सखी हायहाय
देत हुंदके रडते मोकलुनी धायधाय
उठते, पळते, पडते बेसावध होउनिया
घडि-घडि तुज आठवुनी म्हणते, ये प्राणप्रिया ॥ १ ॥

बावरते, सावरते, भरले तिज प्रेमपिसे

उतरतो न दाह तिचा, कामज्वर वाढतसे
धन्वंतरि तूच तिला, रे तुझाच भरवसा
वाचवि रे सखि माझी, पाजुनिया दिव्यरसा ॥ २ ॥

वैद्य अश्विनीकुमारांपरी धन्वंतरि तू खरा
अंगसंग अमृतेच शमवी तिचिया कामज्वरा
सुसाध्य तुजसी देता वळसे मात्रेचे केवळ
विमुक्तबाधा होइल राधा, जाइल ती भोवळ
दया करी तिजवरी वाचवी राधिकेस राजसा
कासाविस जाहला जीव हा तुजविण वेडापिसा
जाइल कोमेजुनी जिवलगा फूल जाइचे तसे
उपेंद्र वज्राहुनी मुकुंदा कठोर होसी कसे ॥ ३ ॥

साहतो न कामदाह, जाळि जीव चांदणे
चंद्र कुमुद चंदन उटी, ती सुरम्य चिंतने
आठविता रतिविलास, धरित प्राण जीवना
शांतवील श्यामतनू पुरवि तिची कामना ॥ ४ ॥

पळभर विरहाते साहिना जी कधीही
प्रियकर सहवासा पापणी आड येई
सतत बघत राही लोचने ती मिटेना
अनिमिष नजरांची ती मिठीही सुटेना ॥ ५ ॥

निरखित मधुमासी रम्य चूतांकुराते
विकसित सहकारा पाहुनीया भराते
चिरविरह तुझा ती साहता काळ कंठी
विरहविकल राधा आणुनी प्राण कंठी ॥ ६ ॥

वृष्टी व्याकुळ गोकुळी, जनपदां द्यायास संरक्षण
तारी बाहुवरी गिरी उचलुनी गोविंद गोवर्धन
सानंदे व्रजसुंदरी अरुण या ओठी जया चुंबिले
ते बाहू बलदंड कृष्ण ह्रदयी भक्तांचिया बिंबले ॥ ७ ॥

[सर्ग चौथा : स्निग्ध-मधुसूदन समाप्त]

अनुक्रमणिका

**सर्ग पाचवा**

**साकाङ्क्ष-पुण्डरीकाक्ष**

प्रबंध १०

राधिकेची सखी श्रीकृष्णाची विरहावस्था राधेला सांगते.

प्रबंध ११

कृष्णकामना पूर्ण करण्याविषयी सखी राधेला विनविते. (अभिसारिका राधा)

सर्गसमाप्ती : आशीर्वाद

अनुक्रमणिका

## सर्ग पाचवा
## साकाङ्क्ष-पुण्डरीकाक्ष

जा त्वरे दूतिके घेउनि येई तिला
'मी इथे थांबतो,' सांगतसे दूतीला ॥
हरि वेतसकुंजी तुजसाठी थांबला
घेउनी निघे ती निरोप ओथंबला ॥
जाहली वियोगे प्रियास जो पारखी
राधेस रमणसंवाद सांगते सखी ॥ १ ॥

### प्रबंध दहावा

(राग—वराडी, ताल—रूपक)

तुजसाठी सखि राधे, झुरतो ग वनमाळी
करि अनंग हृदयभंग
मलयपवन देइ संग
चंद्रकिरण होति शूळ, मरण ये कपाळी ॥ झुरतो ग... ॥ १ ॥

तरुवेढित पुष्पलता
वाढविती हृदयव्यथा
कुसुमगंध करिति निकर, बहर जीव जाळी ॥ झुरतो ग... ॥ २ ॥

उरि लागे मदनबाण
कासाविस होति प्राण
वैजयंति माळ गळा आसवांत न्हाली ॥ झुरतो ग... ॥ ३ ॥

विव्हळतो हाय हाय
रडतो गे धाय धाय
येति हुंदके फुलून प्रेम घाव घाली ॥ झुरतो ग... ॥ ४ ॥

थरथरत्या अंगुलिंनी
घेइ कान झाकोनी
मधुपांचा गुंजारव करित गे कहाली ॥ झुरतो ग... ॥ ५ ॥

येतसे भरून ऊर
साहवे न विरह क्रूर
लोळतसे धरणीवर, व्यथित साद घाली ॥ झुरतो ग... ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

ऐकुनिया कोकिलरव
होई गे तव आठव
'हे राधे', 'हे राधे' फिरत भोवताली ॥ झूरतो ग... ॥ ७ ॥

सोडुनिया सदनि वास
राधा वैशाखमास
भोगित वनि विजनवास, आस ही निमाली ॥ झुरतो ग... ॥ ८ ॥

कविवर जयदेव गात
राधेचे विरहगीत
होई मन कृष्णलीन, धन्य भाग्यशाली ॥ झुरतो ग... ॥ ९ ॥

(प्रबंध दहावा समाप्त)

ते संकेत-निकुंज मन्मथ-महातीर्थी वसे माधव
झाला साधक सिद्ध मंत्र जपता आलापि राधास्तव
ध्यानी ये कुचकुंभ निर्भर परीरंभामृता वांछिता
पूर्वीच्याच स्थली पुन्हा प्रिय सखे तो वाट पाही अता ॥ २ ॥

**प्रबंध अकरावा**

(राग—गुर्जरी, ताल—एकताल)

जा नितंबिनी अविलंबे
प्रिय राधे कामकदंबे
कुंजवनांतरि यमुनातीरी झुळझुळ वाहत वारा
तिथेच बैसे ग वनमाळी, आठवि रतिसुखसारा
ग अनुसर कंथ, कथंबे ॥ १ ॥

करुनि साजश्रृंगार नेसुनी निळा रेशमी शेला
जाई, बाइ ग उशीर होई एकांती अलबेला

कुचयुग चुरती, चंचल करयुग सघन गोपयुवतींचे
थरथरती मृदुकाय, थरकती जघन नव्या नवतीचे
वरि उसळति कवळी लिंबे ॥ ३ ॥

आळवीत तव नाव राधिके वाजवि मंजुळ पावा
संकेताने तुला बोलवी रव वायूवरि यावा

अनुक्रमणिका

प्रीति ही मनात ओथंबे ॥ ४ ॥

तरुवर उडती स्वैर पाखरे, पडे पानपाचोळा
येता चाहुल भास होतसे आलिस तू लडिवाळा
हालती तुझीच प्रतिबिंबे ॥ ५ ॥

फुलाफुलांची रचिली शय्या परिमळ गुंफित जाळे
तुला बघाया सखे लागले वाटेवरती डोळे
तुजवरती जीव विसंबे ॥ ६ ॥

कटिरशना ती पायि पैंजणे नकोच असल्या वेळी
चहाड या वैरिणी सांगती पोसवल्या ग केळी
कर्पुरगौरा रतिरंभे ॥ ७ ॥

नीट घेइ ग निळी ओढणी, दिसू न येइल कोणा
निबिड निकुंजी, अंधारी तो, निळावंतिचा राणा
चंद्राची चुंबनबिंबे ॥ ८ ॥

गळा मोतिया-हार शोभतो, गगनी बलाकमाला
गौरांनी आलिंगनि दिसशी विजेपरी घननीळा
भुजांतरि झळकसि परिरंभे ॥ ९ ॥

फेडुनि वसना, अंगभूषणा कर जघनावर घ्यावे
सुमशयनावरि पंकजनयने, हरि-रति-सुख भोगावे
विरता सुरतरंग भंगे ॥ १० ॥

भारिच बाई हरि अभिमानी सरत चालली रजनी
झरझर जाई अता राधिके पुरवि कामना रमुनी
श्याम तुजसाठी खोळंबे ॥ ११ ॥

श्रीजयदेवरचित नितमंगल, भाव ललित हे छंद
प्रसन्नहृदये हरि प्रणयाते, गाइ गीतगोविंद
सुखतरंगसिंधु उचंबे ॥ १२ ॥

(प्रबंध अकरावा समाप्त)

वळुनि वळुनि पाहतो भिरभिरा, सोडित दीर्घ उसासे
लतानिकुंजी जाई येई मनात चिंतित भासे
पुनः पुन्हा रतिशय्या सजवी, वाटेवरती डोळे

अनुक्रमणिका

कामविकल हरि करि हे चाळे तुजसाठी लडिवाळे ॥ १ ॥

पुरे पुरे बाई, राधिके पुरे अता मात
सांजवेळ झाली, लागली पहा सांजवात
रवीचा रथ हा, निघाला बघ मावळतीला
कृष्णमनोरथही, गडे ग जातिल विलयाला ॥ २ ॥

लांबल्या छाया, बाइ ग होइल ना रात
जाशिल भेटाया, कशी ग या अंधारात?
मयूरापरि मी विनवाया तुजला
फोडिते टाहो, राधिके कंठ कि ग सुकला ॥ ३ ॥

ऊठ, ऊठ बाई, घडी ही दवडु नको वेडे
भेट जिवलगाते, कशाला हे आढेवेढे
नको वेळ लावू, मनाचे उघडी दरवाजे
जा उडुनी मैने, राधिके ऐक गडे माझे ॥ ४ ॥

कशि रात फसविते अंधारी कामुका
कुंजात कळेना काळोखातिल चुका
कधि अंधारामधि आलिंगन देउनी
कुचयुगे मर्दुनी, अधराते चुंबूनी
कुजबुजत बोलती नीविमोक्ष साधुनी
परि गुपित उघडता, कारभार हा मुका
तो नव्हेच वल्लभ, ती नच अभिसारिका ॥ ५ ॥

भलतेच युगुल जुळविते रात ही अशी
शंतनू-मेनका, पाराशर-उर्वशी
कळतो ना काटा तमात रुतला कुशी
ओळखी नीट तो चोर कोण नेमका
सावध ग राधे भान नसे कामुका ॥ ६ ॥

भयचकिता लपत-छपत तिमिरातुनि जाता
थबकत तरुतळि थकता
अंधारी पथ चुकता
भेट गडे प्रियकरास, जाइ सखे आता ॥ ७ ॥

मन्मथमथ गति मंथर
मंद मंद पद सुंदर
वाटतसे तुज बघुनी चंद्र येइ हाता ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

**राधामुखारविंदा भवती मिलिंद घालित रुंजी**
**त्रिलोकसुंदर वृंदावन हे कुंजनीलिमा पुंजी**
**व्रजसुंदरिच्या हृदयानंदा पुरवी लीलारमणा**
**कंसध्वंसना, देवकिनंदन धूमकेतु हा जाणा ॥ ९ ॥**

[सर्ग पाचवा : साकाङ्क्ष-पुण्डरीकाक्ष समाप्त]

अनुक्रमणिका

## सर्ग सहावा

## सोत्कण्ठ-वैकुण्ठ

प्रबंध १२

राधिकेची असहाय अवस्था (वासकसज्जा राधा)

अनुक्रमणिका

# सर्ग सहावा
# सोत्कण्ठ-वैकुण्ठ

(वृत्त—मालिनी)

निरखित वनकुंजी आकुला चारुशीला
सहृदय सखि सांगे येउनी माधवाला
तुजवरि अनुरक्ता राधिका शक्तिहीना
अविरत विरहार्ता चिंतनी मग्न दीना ॥ १ ॥

विचलित तनुकंपा चालता तोल जाई
बघुनिच अनुकंपा अंतरी येत पाही
अवनत मुखक्लांता, मूर्छिता प्रीतिबंधा
विकल मदनमंदा जाहली रे मुकुंदा ॥ २ ॥

## प्रबंध बारावा

(राग—गुणकली, ताल—रूपक)

नाथ हरे, यदुनाथ हरे, राधा कुंजवनी विचरे
शोधित दिशि दिशि तुजसि मुकुंदा
बिंबाधरमधु चुंबि मिलिंदा
नाथ हरे, राधा कुंजवनी विचरे ॥ ध्रु० ॥

मदनोन्मादे तो मदयंती
उचलताच पद भोवळ येती
तंद्री नच उतरे, राधा कुंजवनी विचरे ॥ २ ॥

करि किसलय—मृदुमृणाल-कंकण
जीवित रतिलालस परिरंभण
आस मनात उरे, राधा कुंजवनी विचरे ॥ ३ ॥

स्वयेच होई कृष्ण श्यामला
रमते करुनी अभिनयलीला
भावसंगमी विहरे, राधा कुंजवनी विचरे ॥ ४ ॥

येइ न का गे हरि हा अजुनी
पुसते सखिते फिरुनी फिरुनी
विस्मरते न स्मरे, राधा कुंजवनी विचरे ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

कवळुनि चुंबी घनतिमिरा ही
आला श्यामसखा ग बाई
देहभान विसरे, राधा कुंजवनी विचरे ॥ ६ ॥

विलंब होता वासकसज्ञा
रडे स्फुंदुनी सोडुनि लज्जा
तुजसाठीच झुरे, राधा कुंजवनी विचरे ॥ ७ ॥

जयदेवाची प्रसन्न रसना
रसिकजनांच्या पडता श्रवणा
सुधानंद वितरे, राधा कुंजवनी विचरे ॥ ८ ॥

(प्रबंध बारावा समाप्त)

ही पुरे गडे रतिलीला
जीव हा शिणला
'रे सोड मला ब्रिजलाला' ॥ ध्रु० ॥

श्रृंगाररसाचा सिंधु, त्यात अवगाही
राधिका पडे संमोही
'ऊं हुं, ऊं हुं' सुरत-सत्कार, टाकि सीत्कार
अंग चोरोनी, कुच संकोचे झाकोनी
थरथरतो अंगी काटा
हा श्याम फार ग खोटा
चुंबितो कवळुनी ओठा, लाजऱ्या गाला
'रे सोड मला ब्रिजलाला' ॥ २ ॥

प्रणयाचा चालवि खेळ
लहरीत रमे किति वेळ
जणु उभा पुढे घननीळ
बोलते मनाशिच विकला
'रे सोड मला ब्रिजलाला' ॥ ३ ॥

रोमांचित तनु ये थकवा
मुखि स्वेदबिंदु थरकावा
लटकाच धरावा रुसवा
करि हावभाव हा फसवा, रंगवीत मीलनलीला
'रे सोड मला ब्रिजलाला' ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

तरुवरति, येत सळसळ ती, पाखरे उडति
स्वैर किलबिलति
होइ मनि भ्रांति
आलाच सखा एकांती ॥ ५ ॥

श्रृंगारसाज लेउनी, मुदित कामिनी
सजविते शेज
लटकीच खुणेची नीज ॥ ६ ॥

वाटते रुसावे जरा, बघुनि प्रियकरा
'दूर हो सरा, जवळि नच यावे'
गालांत हळुच हासावे ॥ ७ ॥

ही अशी प्रणयचेष्टिते सखी कल्पिते
कंठिते रजनी
स्मरविव्हल तुजवाचोनी ॥ ८ ॥

(शार्दूलविक्रीडित)

'पांथा, थांबु नकोस, वारुळ तिथे अंधारले भोवती
खेळे कृष्णभुजंग, सांज ढळता, औदुंबराखालती
आहे नंदनिवास गोकुळ पुढे, जाई मुदे येथुनी'
चातुर्ये सुचवी रहस्यस्थल ते संकेत-संगोपनी
राधेचे वच सांगतो पथिक तो येताच नंदाघरी
'राधा सोडवि संकटातुनि तुला' बोले तया श्रीहरी ॥ ३ ॥

[सर्ग सहावा : 'सोत्कण्ठ-वैकुण्ठ' समाप्त]

अनुक्रमणिका

## सर्ग सातवा

## नागर-नारायण

प्रबंध १३

श्रीकृष्ण भेटीसाठी उत्कंठिता राधा संकेत चुकविला म्हणून खिन्न होऊन शोक करिते.

प्रबंध १४

दूती एकटीच आलेली पाहून संशयिता राधा कृष्ण-गोपिकांचा विहार मनात कल्पून सखीला सांगते.

प्रबंध १५

विरहार्ता राधा कृष्ण-गोपींच्या काल्पनिक विहाराचे वर्णन करून दूतीला म्हणते.

प्रबंध १६

कृष्णसंगती रंगलेल्या भाग्यवंती गोपिकांचे वर्णन राधा करिते

कामार्त राधिकेचे उद्‌गार (विप्रलब्धा राधा)

सर्गसमाप्ती : ईशवंदन

अनुक्रमणिका

## सर्ग सातवा
## नागर-नारायण

प्रियकरास भेटाया निघती तिमिरी अभिसारिका
वाट उजळुनी लांछन आणी छळितो ग सारखा
चंद्र चोरटा येउनि गगनी दिमाख दावी जनां
करी बाइ ग गुपिते उघडी एकांती मीलना
दिगंगनांच्या दिसे आननी चंदनबिंदूपरी
सदाच मिरवी कलंक-तिलका पातक बसले शिरी ॥ १ ॥

हा चंद्र सखे पुनवेचा
वैरीच गमे गणिकांचा ॥ ध्रु० ॥

प्रियकरास भेटाया लपुनी
घन अंधारी जाता जपुनी
हळूच येई हासत गगनी
खोडसाळ जन्माचा ॥ १ ॥

लांछन लेई कलंक मिरवी
प्रीती-गुपिते जगास कळवी
चोर चांदणे मनात भरवी
चंदनतिलक दिशांचा ॥ २ ॥

कालिंदीच्या जललहरींवर
शीत कौमुदी पसरी निर्भर
वृंदावनिचा फुलवी परिसर
सिंधू रजतरसाचा ॥ ३ ॥

शशिबिंब ते गगनी जसे येई वरी हरिणावरी
होता विलंब तुला जरा, व्याकूळ हो हरिणीपरी
नयनी उभी ती आसवे, पुसते सख्या, वरचेवरी
आक्रंदिता ती मूर्च्छिता पडते पहा धरणीवरी ॥ २ ॥

### प्रबंध तेरावा

(राग—मालव, ताल—यति)

सखि, विफल विफल ग यौवन हे

अनुक्रमणिका

मुसमुसले फुलते यौवन हे ॥

लटकेच मजसि कथिलेसी
ये माधव कुंजवनासी
का सये हसुनि फसवीसी?
अशि वैरिण का ग होसी? ॥ ध्रु० ॥

विफल गमे ग रति-रंगाविण
रसरसले हे फुलते यौवन
रसाल हे मोहरले मधुवन
ललितलवंगलतेसी ॥ अशि... ॥ १ ॥

वदला मजसी येइन म्हणुनी
वाट बघू किति भरल्या नयनी?
अश्रुफुलांची ओढित स्मरणी
नच अजुनि येइ हृषिकेशि ॥ अशि... ॥ २ ॥

विसरलास का हरि वचनाला
कसे आवरू बाइ मनाला
जाऊ तरि गे शरण कुणाला
मरण तरि न का देशी ॥ अशि... ॥ ३ ॥

प्रीतीच्या या वसंतराती
अंधारातुन, सोडून भीती
चोरुनि आले वनि एकांती
तुजसी भेटायासी ॥ अशि... ॥ ४ ॥

भार तनूवरि हार रुपे ग
मदनशरांची शेज खुपे ग
चंद्र चावरा हसे लपे ग
मेघांतुनि हिणवीसी ॥ अशि... ॥ ५ ॥

अग्निवलय ही करी कंकणे
नागिण विळखे पायि पैंजणे
लावण्याचे लालस लेणे
रुचे न काहि मनासी ॥ अशि... ॥ ६ ॥

कोण गडे ग ती भाग्यवती
रमली राती हरीसंगती

अनुक्रमणिका

अभागिनी मी झाले पुरती
वंचिताच वनवासी ॥ अशि... ॥ ७ ॥

झाले माझे मन हे चंचल
गाली रुळती चुकार कुंतल
सावरिताही उडवी अंचल
लाज न या पवनासी ॥ अशि... ॥ ८ ॥

सुगंध जाळी जीव-भावना
साहु कशी या मदनवेदना
येइ माधवा माझ्या रमणा
बांधुनि घे करपाशी ॥ अशि... ॥ ९ ॥

कुसुमकोमला मधुरभाषिणी
रसिक वल्लभा रमवी रमणी
कविता वनिता नत हरिचरणी
कवि-जयदेव विलासी ॥ अशि... ॥ १० ॥

(प्रबंध तेरावा समाप्त)

माझा चंद्र मला मुकला ग ।
कसा संकेत सखे चुकला ग
अंधारी या वेतसकुंजी वाट काय भुलला ग ॥ ध्रु० ॥

कसा गडे ग येइ न अजुनी, काय कुठे रमला?
मला शोधिता निबिड काननी असेल ग थकला ॥ २ ॥

मोहुनि कोणा व्रजसुंदरिच्या करपाशी फसला
मजसि फसविले देउनि वचने, की मजवरि रुसला ॥ ३ ॥

गोप-सौंगड्यांसवे खेळता भेटवेळ भुलला
किति आशेने आल्ये बाई, डाव आज हुकला
माझा चंद्र मला मुकला ॥ ४ ॥

येता सखीते पाहुनी ती एकटी कृष्णाविना
झाली अधोमुख मूक ती, तिज बोलवेना भावना
आली कुणी युवती दुजी कृष्णासवे मनि कल्पुनी
सवतीस बोले राधिका, येईल ते ओठांतुनी ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

## प्रबंध चौदावा

(राग—वसंत, ताल—यति)

सांग तरी बाई, कोण ती सवत मला होई? ॥ ध्रु० ॥
रतिसमर-उचित ही करि रणवेषा
गळति कुसुमदल विखरित केशा
विगलितवसना ही । कोण ती सवत मला होई? ॥ १ ॥

कोण अशी ही सुगुण सुरंगा
चपलेपरि जी बिलगत अंगा
थरथरते देही । कोण ती सवत मला होई? ॥ २ ॥

रमवी हरिते ही रसिकमना
अशि कोण यौवना अधिकगुणा
माधवास मोही । कोण ती सवत मला होई? ॥ ३ ॥

आलिंगित तनुपुलक विकारा
कंपित कुचयुग उरि मणिहारा
चोरचकोरकुचा ही । कोण ती सवत मला होई? ॥ ४ ॥

कुंडल कानी गाली हलती
माजमेखला मणि किणकिणती
मंजुल तनुकंपा ही । कोण ती सवत मला होई? ॥ ५ ॥

लाजत हासत बघुनी नयनी
कोकिल-कूजित करि रतिशयनी
कुजबुजते काही । कोण ती सवत मला होई? ॥ ६ ॥

नील नवे मेघांबर ल्याली
चंद्रकोर की कुंतलजाली
चुंबित अधरांही । नुरले भान तिला काही ॥ ७ ॥

पुलक भुजलतां नवथर अंगा
श्वासोच्छ्वासे निववि अनंगा
पुरता विषयांही । कोण ती सवत मला होई? ॥ ८ ॥

श्रमजल भिजवी सुभग शरीरा
तरि ना शिणली रतिरणधीरा

अनुक्रमणिका

दावित चतुराई । कोण ती सवत मला होई? ॥ ९ ॥

जयदेवाची मधुरा वाणी
रमवी रसिका कलिमल हरुनी
पावनमन होई । कोण ती सवत मला होई? ॥ १० ॥

(प्रबंध चौदावा समाप्त)

हाय माझिया विरहव्यथेने कांतिहीन जाहला
विकल माधवापरी दिसे हा शशांक कोमेजला
सदय हृदय हा चंद्र तोच ग, छळतो मजला असा
मदन चेतवी अंगांगांतुन कसा धरू भरवसा ॥ ४ ॥

### प्रबंध पंधरावा

(राग—गुर्जरी, ताल—एकताल)

कालिंदीतटि कुंजवनी हा खेळे रसरंग
रमणिसह रमला श्रीरंग ॥ ध्रु० ॥

मदनवदन मदयंती मुदिता चुंबित अधरावरती
मृगमद-तिलक ललाटी शोभे, गगनी चंद्रावरती
लांछने पुलकित हो अंग ॥ रमणिसह... ॥ १ ॥

रमणींचा हा हरिणथवा, हरिभवती करि लयलूट
विजयशालि ग श्याम मनोहर धीट काळवीट
टोचिता उरात मृगशृंग ॥ रमणिसह... ॥ २ ॥

रुचिरचिकुरबंधात सुशोभित सुंदर तरुणानन ते
कुरबक कुसुमे, तरलित चपला, अनंगमृगकानन ते
सुषमित सुंदर सुमनांग ॥ रमणिसह... ॥ ३ ॥

कस्तुरिलेखन स्तनयुगगगनी, नील निशा अवसेची
रतिचिन्हांची नखनक्षत्रे चंद्रकोर द्वितियेची
कोरितो कौतुक चितरंग ॥ रमणिसह... ॥ ४ ॥

मृणालमृदुलां भुजयुगुलांवर करतल-रातोत्पले
मरकत-कंकण मिलिंद-वलये मंजुल हिमशीतले
गुंजती रसलालस भृंग ॥ रमणिसह... ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

पृथुजघना रतिमंदिर सुंदर सुवर्ण-मदनासन ते
नेसवि वसना मणिमय रशना तोरण कटिबंधाते
विपुलघन गौरवि उत्संग ॥ रमणिसह… ॥ ६ ॥

कामिनि कोमल पदकमलांते लावित कमलानिलया
हृदयावरि रतनार पाउले, नखमणि चेतवि प्रणया
वांछिते प्रीतीसुख-संग ॥ रमणिसह… ॥ ७ ॥

किती ग फसवा कपटसिंधु तो बंधू बलरामाचा
विरस करी माझिया मनाचा, विसर पडे वचनाचा
गोपिका, रतिरंगी दंग ॥ रमणिसह… ॥ ८ ॥

कशास राहू उदासवाणी एकलीच या विपिनी
कपटनटवरा आठवीत मी फसुनी लटक्या वचनी
निर्दय करी मनोभंग ॥ रमणिसह… ॥ ९ ॥

श्रीहरिचरिता मधुरसनिर्झर कवनी या नित सेवा
कलिमलहरणा दुरित निवारी, चरणी रत जयदेवा
चित्त हे चिंतनात गुंग ॥ रमणिसह… ॥ १० ॥

(प्रबंध पंधरावा समाप्त)

किति कठिण हृदय ग हरिचे
केलिस किति विनवणी तरी ना
पाझरते मन त्याचे
किति कठिण हृदय ग हरिचे ॥ ध्रु० ॥

अगणित युवती रसिक गुणवती
उन्मादिनि रतिरंगी रमती
कृष्णभृंग हा फुलाफुलांसह खेळ करी नवलाचे
किति कठिण हृदय ग हरिचे ॥ १ ॥

नाहि तुझा अपराध सखे ग
भोग कपाळी चुकेल का ग
आकर्षण हे नवनवतींच्या, नाजुक सौंदर्याचे
किति कठिण हृदय ग हरिचे ॥ २ ॥

सखये परि माझी उत्कंठा
भेटवील मजसी वैकुंठा

अनुक्रमणिका

फिटेल बाई कधीतरी ग पारणेच विरहाचे
किति कठिण हृदय ग हरिचे ॥ ३ ॥

## प्रबंध सोळावा

(राग—वराडी, ताण—रूपक)

रमता रतिरंगी हृषिकेशी ग
छळ सुखद होति रमणीसी ॥ ध्रु० ॥

वायुविकंपित नयन थरकती
शयनी निजता तनु लुसलुसती
भीतिही धिटुकली होय कशी ॥ छळ सुखद... ॥ १ ॥

अधरसुधा पिउनी नवतरुणी
लाडिक कुजबुज मंजुल वचनी
शरमंचक हो सुखशेज कशी ॥ छळ सुखद... ॥ २ ॥

कुंजकमल ते विकसित होई
हृदयभेद साधे न स्मरा ही
मलयानिल जाळिल काय कशी ॥ छळ सुखद... ॥ ३ ॥

कवळित कंजचरण करकमळी
चंद्रकिरण नच येती जवळी
बाधे न शीत घेताच कुशी ॥ छळ सुखद... ॥ ४ ॥

मेघापरि घननीळ उन्मनी
कामिनि ती घालवी यामिनी
विरहदाह नच हो तिजसी ॥ छळ सुखद... ॥ ५ ॥

सोनसळी ती वसन-झळाळी
गुपित कळवि रंगलि रसबाळी
परिजन हसता मोद तिशी ॥ छळ सुखद... ॥ ६ ॥

श्यामसुलोचन त्रिभुवनसुंदर
करि रतिलीला मदनमनोहर
वेदनेत आनंद निशी ॥ छळ सुखद... ॥ ७ ॥

श्रीजयदेव वदे ही वचने

अनुक्रमणिका

वसो हृदयसदनी हरिभजने
विरहाकुल वृत्ती होय कशी ॥ छळ सुखद... ॥ ८ ॥

(प्रबंध सोळावा समाप्त)

मलयगिरी-चंदनांवरुनिया सुदूर दक्षिणदेशी
प्रसन्न पावन परिमळ पसरित वाहत पवना, येशी
मदनाते अनुकूल होउनी झालासी मज वैरी
दया करी रे एकदा तरी भेटवि श्याम मुरारी
जिवलग माझा मला पाहु दे निश्चिल डोळे भरुनी
खुशाल घेई प्राण सख्या रे प्राणसखा दावोनी ॥ ५ ॥

मन धाव घेत तुजकडेच श्याम-मुरारी
हे मुकुंद माधव शौरी ॥ ध्रु० ॥

आसमंत, विपिनी वसंत सारे कसे जाहले वैरी
हे मुकुंद माधव शौरी ॥ १ ॥

सखि, परिजन मधु-कुंजवन तसे
अनिल अनलसम जाळित भासे
झोंबति अंगा नागिणीपरी, चंद्रकिरण अति जहरी
हे मुकुंद माधव शौरी ॥ २ ॥

आवरिता आवरे न बाई
आठविता कपटी चतुराई
आशांची उच्छृंखल घाई, कामकुपित मनलहरी
हे मुकुंद माधव शौरी ॥ ३ ॥

प्राणविहग तुजविण तळमळतो
उरी लागता शर कळवळतो
कठिणहृदयि हा मन्मथ छळतो, आणि जिवाला घेरी
हे मुकुंद माधव शौरी ॥ ४ ॥

छळि रे सुखे मलयानिला
करि वेदना मदना मला
गृह ते नको बघणे पुन्हा
सुटका न हो मरणाविना
घे प्राण ग शमनस्वसे
यमुने, जली बुडवी मला ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

**आनंदे सुरवृंद लोळतो तुझिया चरणांवरी**
**नीलमणी मुकुटात शोभती मिलिंद इंदीवरी**
**मरंदसुंदर मंदाकिनि ती स्वच्छंदे वाहते**
**पदारविंदां तुझ्या मुकुंदा वंदित वंदारुंते ॥ ७ ॥**

[सर्ग सातवा : नागर-नारायण समाप्त]

अनुक्रमणिका

## सर्ग आठवा

## विलक्ष-लक्ष्मीपती

प्रबंध १७

राधिकेला भेटावयाला श्रीकृष्ण प्रभातकाली आला असता गतरात्रीची सुरतकेलीची प्रसादचिन्हे पाहून राधा क्रोधाने त्याला बोलते.
असूयेचा आविष्कार (खंडिता राधा)
शुभयाचना

# सर्ग आठवा
# विलक्ष-लक्ष्मीपती

कशि तरी कंठिते काळरात राधिका
जागरणी पाही स्वप्नसंगमोत्सुका
हो प्रभात तरिही अजुनी मदनाधीना
आला जरि माधव तयाकडे पाहिना
करि अनुनय लाडिक तिज रमवायास्तव
घालून मिठी दाखवी प्रीतिलाघव
झटकून हात ती उभी दूर जाउनी
खंडिता राधिका बोले रागावुनी ॥ १ ॥

## प्रबंध सतरावा

(राग—भैरव, ताल—रूपक)

जा रे जा कपटी धूर्ता, मशि बोलु नको गोविंदा
हे फंद तुझे कळले रे, नाटकी चेटकी छंदा ॥ ध्रु० ॥

ते आळसलेले डोळे, त्या खुणा उमटल्या गाली
सांगती रंगसंगाते ती जागरणाची लाली
जा तिथेच आता परता, रमवाया तिजसि मुकुंदा ॥ २ ॥

लालिमा दंतपंक्तीचा, तांबूल तोडिता ओठी
चुंबिता नेत्र, काजळले जाहले श्याम जगजेठी
जा शठा तिजकडे आता, जी पुरवी तव रतिछंदा ॥ ३ ॥

स्मरसमरी कुसर क्षतांची कोरिली नखांनी वक्षी
पाचूवर कांचनलेखा रतिविजयाची आलक्षी
ती प्रियंवदा परिणावी, हो प्रशंसिनी जी प्रमदा ॥ ४ ॥

उमटला आळिता ह्रदयी कवळिता चरण रमणीचे
रंगले तुरे अंकुरले नथपल्लव मदनद्रुमांचे
जा नाच शिरी घेवोनी रतिकुशला लांछित चंद्रा ॥ ५ ॥

उमटले डंख ते ओठी चोचींचे चिमणे चावे
ते उरात खुपती माझ्या, नित नवेच मी निरखावे
जा खुशाल उरि कवळावा, रसरसला नाजुक बांधा ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

अंतरी असिस तू कृष्ण, वरुनिया जसा तू काळा
ते हलाहलहि प्रिय वाटे, फसविलेस मज गोपाळा
हा मदनताप शमवाया मी उगा लागले नादा ॥ ७ ॥

तुडविसी यौवना पायी हे नसेच रे नवलाचे
भटकसी वनी यासाठी हरितोस प्राण प्रमदांचे
कामिनी-सुंदरा चतुरा रति चेतवि रसिकमिलिंदा ॥ ८ ॥

तव चरित जाणते पुरते, ते सराव बाळपणीचे
ते कुटिल खेळ आठवितो, घट डोई उचलायाचे
निर्दया पूतना वधिली, कुच कर्षुनि बालमुकुंदा ॥ ९ ॥

कुचकुंभ–कंचुकी मिरवी, डोईवर चुंबळ ठेवी
उचलता वरी कर चुकती, कुस्करिति कळेना केवी
वाकताच चुंबिसि अधरा, तरि साळसूद तू साधा ॥ १० ॥

खंडिता गोपयुवतींचा हा विलाप ऐका कानी
स्वर्गातहि सौख्य असे हे कधि पाहिले न देवांनी
जयदेव-कवी-विरचित या श्रवणीय गीतिका-छंदा ॥ ११ ॥

(प्रबंध सतरावा समाप्त)

प्रियेच्या पायांचा हृदयि तुझिया रंग वठला
बघोनी ती वक्षी प्रणयप्रतिमा ऊर फुटला
खुणा त्या निर्लज्ज्ञा, कळविति मला प्रेम विझले
तसे लाजेने हे मन विरमले नेत्र भिजले ॥

पहाट होताच ती
तयांची धांदल झाली किती ॥ ध्रु० ॥

पीतांबर नेसली राधिका, सुचे न घाइत घाई
निळे वसन नेसला सावळा, कळे न दोघांनाही
सांगते वस्त्रांतर सुखरती
तयांची धांदल झाली किती ॥ १ ॥

हसती पाहुनि सख्या, मनोमनि किती लाजली राधा
चोरुनि बघतो कृष्ण तिजकडे, नाहि बाइ ग साधा
मानसी अधिकच संकोचती
तयांची धांदल झाली किती ॥ २ ॥

अनुक्रमणिका

**प्रणयविलासी खुलते सखिचे लज्जित वदनांबुज**
**सकलांते आनंद निशिदिनी, देई नंदात्मज**
**रंगला विलास सुखसंगती**
**तयांची धांदल झाली किती ॥ ३ ॥**

[सर्ग आठवा : विलक्ष-लक्ष्मीपती समाप्त]

अनुक्रमणिका

## सर्ग नववा

## मुग्ध-मुकुन्दवदन

प्रबंध १८

राधिकेची सखी तिला सांत्वना देते आणि श्रीकृष्णभेटीची उत्सुकता वाढवून त्याच्याशी रममाण होण्याचा आग्रह करिते. (कलहान्तरिता राधा)

शुभकामना

अनुक्रमणिका

# सर्ग नववा
# मुग्ध-मुकुन्दवदन

मन्मथखिन्ना, रतिरसभिन्ना, शोकविपन्ना राधा
चिंतनमग्ना, कलहांतरिता, सखि हरिते मनबाधा ॥ १ ॥

### प्रबंध अठरावा

(राग—गुर्जरी, ताल—यति)

धरु नकोस मान असा मानिनी,
ये माधव राधे मधुपवनी
सुख याहुनि अधिक नसे भुवनी
जा रमवि तयाते मृदु हसुनी ॥ ध्रु० ॥

तालफलापरि कठिण कुचयुगे
विफलच करिसी काय शुभांगे
कुस्करिता जाशील मोहरुनि। ये माधव राधे मधुपवनी ॥ १ ॥

विकल होउनी उगाच रडसी
संतापाने का बडबडसी
हसत युवतिजन तुज बघुनी। ये माधव राधे मधुपवनी ॥ २ ॥

नलिनदलांवर कोमल शयनी
पाही माधव डोळे भरुनी
पुरवि ग अपुली हौस मनी। ये माधव राधे मधुपवनी ॥ ३ ॥

उगाच का गे मनात झुरसी
हरिणीपरि हृदयी हुरहुरसी
जा भेट तया लाडिक वचनी। ये माधव राधे मधुपवनी ॥ ४ ॥

ऐक राधिके मधुर बोल ते
येता हरि तुज रिझवायाते
हा सोडि सोडि रुसवा रमणी। ये माधव राधे मधुपवनी ॥ ५ ॥

श्रीजयदेव कवी अतिललिते
रचि-रुचिरा ही हरिची चरिते
प्रिय रसिका सुखवे छंद गुणी। ये माधव राधे मधुपवनी ॥६॥

अनुक्रमणिका

(प्रबंध अठरावा समाप्त)

बोलता मधुर मधुर हरि तुजसी
अशी का मान मुरडुनी बघसी? ॥ ध्रु० ॥

किति ग वागसि विपरीत? तुडविसी पायी हरिप्रीत
मनामधि काय अढी धरिसी? प्रेमळा कठिण हृदय करिसी ॥ १ ॥

तुजकडे पाहतसे कुतुके
कसे राहवते तुजसि मुके?
अबोला काय असा वरिसी। करावी देवघेव हरिसी ॥ २ ॥

बोल ग बोल मंजु बोला
नको दुखवूस माधवाला
माधवी लता रसालासी। तुवा कवळावा हृषिकेशी ॥ ३ ॥

लोळतो, धरितो तव चरण
पाझरे नच का पाषाण
निर्झरापरि जरि झुळझुळसी। जलावर्तात डुंबवीसी ॥ ४ ॥

उटी ही मलयचंदनाची
मिठी हो जहरि भुजंगाची
फुका फूत्कार टाकितेसी। कामकालिया खेळवीसी ॥ ५ ॥

चंद्रमा सुखद ताप देई
जाळते जलसिंचन देही
तुहिनकर दंशित हृदयासी। आणिता उधाण विरहासी ॥ ६ ॥

मनी संताप तुवा धरिला
नको त्या वाटति रतिलीला
मनोमनि मात्र आठवीसी। अधरि चुंबनाभास पुससी ॥ ७ ॥

होतसे अंगाची लाही
तुझी तू करिसि दशा का ही?
सुखाते दुःख मानितेसी। आपुल्या आपण छळतेसी ॥ ८ ॥

भुलवि मृगनयना, मोहवि मना ॥ ध्रु० ॥
धरित शिरि फुले, विकच दल खुले
फुलुनि मंदार गाळि सुमना ॥ १ ॥

अनुक्रमणिका

**करि अरि जर्जर, वारित विपदा**
**महामंत्र तो तारि जना ॥ २ ॥**

**कंसनिखंदन, दानवध्वंसन**
**करि वंशीस्वन ये श्रवणा ॥ ३ ॥**

**आनंदित मन करि पदवंदन**
**संकीर्तनि गोविंदगुणा ॥ ४ ॥**

[सर्ग नववा : मुग्ध-मुकुन्दवदन समाप्त]

अनुक्रमणिका

## सर्ग दहावा

## चतुर-चतुर्भुज

प्रबंध १९

श्रीकृष्ण राधिकेचा अनुनय करितो. (मानिनी राधा)

अनुक्रमणिका

## सर्ग दहावा

## चतुर-चतुर्भुज

सरता ये दिवस, गगनि सांज फुलत चालली
तारकतति घेउनि ये रात चोरपावली
टाकित निःश्वास सखी, गुंफि अश्रुमालिका
धरुनि रोष हरिवरती मदनविकल राधिका
ये मुकुंद प्रेमधुंद, मंदमंद पावली
वदता सद्‌गदित वचे राधिका सुखावली
रोमांचित कटिकंपित, अधिरा ती लाजवती
येइ भरुनि ऊर तिचा, तटतटली कंचुकि ती
निरखित निमिलित नयनी, लाजुनि सानंद सखी
महिरुनि ये अंग-अंग, अधर मिटवि मधुर चुकी ॥ १ ॥

### प्रबंध एकोणिसावा

(राग—वराडी, ताल—अष्टताल)

प्रिये चारुशीले, प्रिये चारुशीले ।
दंतकौमुदी विलसे, उलता ती अधरदले
तिमिर हरित, भय मनिचे चतुरे चित्-चंद्रकले ॥ प्रिये चारुशीले… ॥ १ ॥

लालस लोचन चकोर, इंदुवदन बघुनि भुले
सोडि कोप मजवरिचा, भिजवि चरण अश्रुजले ॥ प्रिये चारुशीले…॥ २ ॥

जाळित हा हृदय मदन, झाले मन शोकसदन
वदनामृत पान तुझे मिळता मत्प्राण फुले ॥ प्रिये चारुशीले… ॥ ३ ॥

खरिच जरी तू कुपिता, नखशरजर्जर करिता
बांधुनि घे भुजगलता, आवळि दृढ बाले ॥ प्रिये चारुशीले… ॥ ४ ॥

कोपयुते ग सुदती, चावुनि गालावरती
वठवि मंडलाकृती चिन्ह भूषवीले ॥ प्रिये चारुशीले… ॥ ५ ॥

तू माझे जीवन गे, मजलागी भूषण गे
रत्नखनी भुवनी या, प्राणप्रिये ब्रिजबाले ॥ प्रिये चारुशीले… ॥ ६ ॥

सांग सये सांगु किती, स्मरमंजिरि चारुमती

अनुक्रमणिका

तुझिया श्वासावरती जीवित हे घेत झुले ॥ प्रिये चारुशीले… ॥ ७ ॥

नीलनलिननयनदले प्रणय मधुर बिंबले
खुलती रतनार किती, सुरत रातोत्पले ॥ प्रिये चारुशीले… ॥ ८ ॥

होइ तीच प्रिय रागिणि, अनुकूला अनुरागिणि
ऐकू दे बोल तुझे, श्रवणि मंजुले ग ॥ प्रिये चारुशीले… ॥ ९ ॥

सघनजघन कटिवरती, मणिरशना रुणझुणती
मदन मंजुघोष जणू आमंत्रण रुंजविले ॥ प्रिये चारुशीले… ॥ १० ॥

जलकमला लाजविती, दे अनुमति मज सुमती
रसरंगी रंगवु दे अंकि धरुनि पाउले ॥ प्रिये चारुशीले… ॥ ११ ॥

रत्नहार कंठि रुळे, आंदोलित स्तनयुगुले
हृत्प्रांती कांति खुले, खालीवर हिंदकळे ॥ प्रिये चारुशीले… ॥ १२ ॥

शिरि ठेवुनि पदकमला, शांतवि गे स्मरगरला
मधुर-मधुर चुंबन ते, जगविल जगि अनुभविले ॥ प्रिये चारुशीले… ॥ १३ ॥

चारु चटुल कृष्णवचे, अनंग-कुटिल मन डिवचे
हो प्रसग्न राधिका, मीलना उचंबळे ॥ प्रिये चारुशीले… ॥ १४ ॥

गाई जयदेव-कवी मधुर-मंजुला गिरा
सुखवी रसिकजनां कृष्णलळित सुंदरा
प्रीतीचे खेळ हे हास्य लास्यातले ॥ प्रिये चारुशीले… ॥ १५ ॥

(प्रबंध एकोणिसावा समाप्त)

सखि राधे, सोडुनि शंका दे आलिंगन अविलंबे
हे नितंबिनी, स्तनभारे झुकलीस गौररतिरंभे
तुजवाचुनि अन्य न कोणी मदनाविण माझ्या हृदयी
मानितो धन्य, मज छळतो, पळ उसंत नच हा देई
ती पुलकचमू घेवोनी मीनध्वज धरि फडफडता
हा चोर हेर ग बाई, भयभीत उभा थरथरता
संचार तयाचा चाले, करि उठावणी चौफेरी
ये सहजच अंगचटीला हा निलाजरा ग वैरी
पळपुटा परि न हा बाई, राहील ठायिच्या-ठाया
करि ससेहोलपट याची, मम हृदयातुनि हुसकाया

अनुक्रमणिका

कुचभल्ली टोचुनि याते दे देहदंड बंडा या
करकचुनि बांध भुजबंधी, जागीच तया चुरडाया
सुकुमार कोवळी काया, उरि अधीरता आंदोळे
आरंभे सखि परिरंभे, झुलवाया भुजहिंदोळे ॥ २ ॥

सुदती, घेउनिया चावा, दंश या गाली वठवावा
कुपिते, चावुनिया ओठी, आपुला रुसवा शमवावा
भुजलता-बंधन आवळुनी, बांध हे शरीर करकचुनी
घुसळुनी निर्घृण भुजबंधी, करी गे मला तुझा बंदी
कुचाग्रे टोचुनिया साची, चाळणी करि या देहाची
वाचवी सखे, घेइ प्राण, छळी सारखा पंचबाण
झुलू दे मज श्वासावरती, देइ हा दंड कोपवंती ॥ ३ ॥

वाकडा भ्रूभंग तो, मोहूनिया करि वेदना
डसते उरी ती नागिणी, फूत्कारिते, जहरी फणा
तो मंत्र जाणसि तूच गे, भयभीत या तरुणा जना
जगवील त्या जहरातुनी, अधरामृताची मंत्रणा ॥ ४ ॥

धरिलेस मौन का असे, सांग राजसे, राधिके बाई
दुखविसी ह्रदय जिवलगे विमुख होताही
सखि बोल, मंजु, मधु बोल, ऐकु दे कानी
नजरेत निरख चंद्रिके, बघ जरा वळुनी
चोरटे नयनचांदणे, तुझे लाजणे, शमवि मन माझे
मिटू नकोस पापणि अशी उघडि दरवाजे
मी आलो होउनि स्वये, तुजकडे प्रिये, नको अव्हेरू
रागाने थरकापती, मला सुखविती तुझे रंभोरू
हा राग सोड भामिनी, छेड रागिणी, मधुर रसवंती
स्वीकारी मज सुंदरी, उचित तुज जरी, शरण मदयंती ॥ ५ ॥

बंधूक-पुष्पकांती ओठी तुझ्या विराजे
गाली मधूक-शोभा, नेत्री निळी सरोजे
ती नासिका बघोनी लाजे कळी तिळाची
कुंदापरी दिसावी दंतद्युती प्रियेची
आले पराग अंगी मुकुलांत गंध लोळे
निवडूनि वेचिले हे रसरंग वेगळाले
सजवी प्रसून शोभा, खुलवी सुवर्णकाया
पुष्पायुधे फुले ही पूजा तुझी कराया ॥ ६ ॥

रेखियले इंदुमती चंद्रबिंब गौरसे

मदलालस नयन पिसे लाविती मदालसे
आंदोलति उरुरंभा पदन्यास मंदगती
चालता मनोरमे, सहज चित्त चोरती
संकोचे सावरिता लाज अडवि आतुरता
कमनीया गतिशीला, गमसि द्रुतविलंबिता
उर्वशी विकंपिताच, चंद्रकोर चालती
केलिकला रतिकुशला चतुर तू कलावती
भ्रुरुचिरा रेखिलीस चित्रलेखेपरी
सुरांगनांसवेच काय उतरलीस भूवरी! ॥ ७ ॥

कंसकदनि कुवलयपीडा जिंकिले जयाने
भयाभीत झाली सारी सभा विस्मयाने
करित करी कुंभक्रीडा मस्त वारणाते
स्मरे, मर्दिताना हाती राधिकास्तनांते
घुमे नाद जिंकियला हा बालकृष्ण वीर
कंस कोसळे भीतीने जाहला बधीर ॥ ८ ॥

[सर्ग दहावा : चतुर-चतुर्भुज समाप्त]

अनुक्रमणिका

**सर्ग अकरावा**

**सानन्द-दामोदर**

प्रबंध २०

राधेला सखी श्रीकृष्णासह रममाण होण्यासाठी त्वरा करावयाला सांगते.

सखीकृत कृष्णस्थितिवर्णन

अभिसारिका व रात्रीचे वर्णन

प्रबंध २१

कुंजद्वारी उभ्या असलेल्या प्रियकराला पाहून लाजलेल्या राधिकेला सखी धीर देते.

(राधिकामिलन)

प्रबंध २२

श्रीकृष्णवर्णन

ईश्वरस्मरण

सर्गोपसंहार

**अनुक्रमणिका**

## सर्ग अकरावा
## सानन्द-दामोदर

रुचिर अनुनयाने जिंकिले राधिकेला
अभिनव-रतिरंगा साजश्रृंगार केला
कुसुमित सुखशेजी जाइ श्रीरंग कुंजी
पदरव ललनेचा घालितो गोड रुंजी
अभिनय करि, भासे नीज ये पापणीत
अवखळ किति बाई, सूक्ष्म संकेत-रीत
निबिड वननिकुंजी, चालता मंदमंद
करित सखि तियेशी शेजनिद्रा विनोद
‘लगबग चल राधे, रात-अंधार होई
थबकसि भयभीते, गे जरा धीट होई’ ॥ १ ॥

### प्रबंध विसावा

(राग—वसंत, ताल—यति)

हे मुग्धे, प्रमदे, राधिके
ऐक गडे ग, माझिया वचना
जिवलगा भेट मधुसूदना ॥ ध्रु० ॥

मधु बोलुनिया मथविले ग
रुसुनिया जया फसविले ग
आणिले शरण चरणा, सहज रतिरमणा
जा भेट सखे, मधुमथना ॥ २ ॥

अनुकूल तुजसि हरि झाला
कुंजात लपंडावाला
पाहतो वाट अलबेला, मिटुनि मृगनयना
जा भेट सखे, मधुमथना ॥ ३ ॥

जलधार हार कुचकुंभी
दे कंप सहेतुक दंभी
जा हरिलागी परिरंभी
मनि अनंगतरंग उठति लाजती रैना
जिवलगा भेट मधुमथना ॥ ४ ॥

तनु सज्ज संगरा सजवी

रतिवेषे रणदल मिरवी
हे नयन मदालस फिरवी
जयघोष दुंदुभी करिति किंकिणी रशना
रणशिंग फुंकि मधुमथना ॥ ५ ॥

पदमंद हंसगति लीना
फुटति गे बोल नुपुरांना
रुम्झुमे मंजुला रशना
हे नितंबिनी, स्तनभारे तनु झुलताना
जा भेट गडे, मधुमथना ॥ ६ ॥

मुरलिची मधुर रसवंती
गुंजती अली मधुवंती
पिक गाती अनंगगीती
'कुहु कुहु' करित मदहरणा, सुचवि रतिशयना
जा भेट सखे, मधुमथना ॥ ७ ॥

या वायुलहरि ग बाई
डुलविती वल्लरींनाही
करपल्लव सांगति काही
जा, नितंबिनी जा, विलंब न करी गमना
जिवलगा भेट मधुमथना ॥ ८ ॥

कळविती हळुच, 'मी आल्ये'
करकंकणरव ब्रिजबाले
करनखरच स्मरशर झाले
सखि, हात धरुनि लडिवाळे लज्जित-वदना
जिवलगा भेट मधुमथना ॥ ९ ॥

सुमहार गुंफिला साचा
मद उतरी लावण्याचा
हरि गर्वही मुक्तमण्यांचा
वाग्विलास जयदेवाचा, सुखवी सुजना
कंठात रुळो भवतरणा ॥ १० ॥

(प्रबंध विसावा समाप्त)

प्राणप्रिया सखि राधा मजसरसी पाहिल का?
बोलुनिया मधुवरचे आलिंगन देइल का

अनुक्रमणिका

रमविल का रतिशयनी, येत मनी मज शंका
चिंताकुल अति माधव-भेट तरी होइल का?
आलिस तू भेटाया, कल्पुनिया कापतसे
पडताना मधुर मिठी रोमांचित भासतसे
तंद्रीतच रतिलीला, घामाने अंग भिजे
चाललीस सोडुनिया दे निरोप तुज नुमजे
देहभान सुटले ग, काय तुला सांगु कथा
मूर्च्छा येउनि पडतो, साहते न विरहव्यथा
सावध होउनि बघतो, तळमळतो ग विरही
जागवी अचेतनास, जा राधे, कुंजगृही ॥ २ ॥

नयनांत भरे तम-अंजन ते, दलनीलतमालसुमा श्रवणी
कुचचित्रित कस्तुरि चित्रलता, सुकुमार उरी धरि कृष्णमणी
शिरि श्याम सरोजिनि हार सजे, करि रात असा अभिसार निळा
परिरंभित अंग नि अंग सखे, रतिलोलुप हा अंधार तुला ॥ ३ ॥

घननीळ नभी सित चंद्रकला, परिधान करी श्यामल वसना
प्रतिबिंब मनोरम नीलसरी लहरी लपवी जलि चंद्रगुणा
संकेत निकुंजलता लपवी अभिसारित आकृतिबंध तमी
तरि सांगतसे तिमिरी बिजली, विझली न मुळी तनुबंधित मी ॥ ४ ॥

तरुतमाल नवमंजिरि श्यामल घन तिमिर गमे
प्रेमहेमरेखांकित, निकष काय चित्त भ्रमे
कांचनमणिरत्नकांची, पीतगौर तनुकांती
तरलित करि कटिबंधा, ललितकलित एकांती
कांचनसर कंचुकिवर रुळत उरी मध्य तटी
रत्नपदक कांति तरल, लावित अंगास उटी
मुक्ताफलहार कंठि बाजुबंद बाहुवटी
कंकण करि मणिरशना, रत्नखचित, सिंहकटी
तेज झळाळे, तळपे उजळि अलंकार तमा
कुंजद्वारि येत जशी, राधिका तिलोत्तमा
पाहुनिया दारि उभा, माधव ती लाजवती
हो परती संकोचे भयभीता मंदगती
आसुसली आतुरता, कामुकता का मुकती
देइ धीर चतुर सखी समजावी मंजुमती ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

## प्रबंध एकविसावा

(राग—वराडी, ताल—आडव)

मंजुतर कुंजतलि केलिसदनी
रमवि रमणास गे हसत वदनी
एकांति कांत प्रियकरा ह्रदयि कवळी
जा आत राधिके, जाइ माधवाजवळी ॥ ध्रु० ॥

अशोक-अंकुर नवदल-श्यामल शयना
उरि झुलवि सुमनहार, तरलनयना
होईल हरित मीलनी हळद पिवळी
जा आत राधिके, जाइ माधवाजवळी ॥ २ ॥

कुसुमचयरचितमंच कुंजगेही
विलस विलासिनी, सुकुमार देही
हा मंचक नच वंचक होइ अवेळी
जा आत राधिके, जाइ माधवाजवळी ॥ ३ ॥

मधुलोलुप अलिपुंज गुंजित कुंजी
आलिंगित मधुमंजिरि घालित रुंजी
रसतस्कर करि केसर कुरवाळी
जा आत राधिके, जाइ माधवाजवळी ॥ ४ ॥

सुरभि शीतल मलयपवन मंद वाही
प्रददे, भयभीते, मदनशरा साही
विंधिता ह्रदय, येतील देह जवळी
जा आत राधिके, जाइ माधवाजवळी ॥ ५ ॥

वनवल्लरि पल्लवघन विपिन झाले
पीनस्तन सघन जघन ब्रिजबाले
कटिमध्य सुखासन ललितत्रिवली
तरतो शिकताहि न मीन जली
जा आत राधिके, जाइ माधवाजवळी ॥ ६ ॥

रवमंजुल कोकिलकुलकूजित हे
नच उसंत, वसंतसुख क्रीडित हे
लावण्यलते, श्रृंगारतरूते कवळी
हो धीट राधिके, जाइ माधवाजवळी ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

हसत वदनि रुचिरतर रदनकांती
उधळित राधिके, रतिरसिके एकांती
रति पुरत उरत तरि सुरत छळी
जा आत राधिके, जाइ माधवाजवळी ॥ ८ ॥

पद्मावति सुखनिधान हे ज्याचे
छंद गुणी जयदेवहि गाइ मुकुंदाचे
नित मंगल होवो लीन चरणकमली
जा आत राधिके, जाइ माधवाजवळी ॥ ९ ॥

(प्रबंध एकविसावा समाप्त)

तव चिंतनि रातदिनी झुरतो, विरहा सहतो स्मरक्लांत हरी
वांछित चुंबन गोड तुझे, पिउ देइ तयास सुधा अधरी
आलिंगुनि काय मदालस ही, तुज घेइल गे अंकावरती
सुटता शर नाजुक घाय उरी, नच सावज हे सहजी सुटती
लव पापणि घेसि मिटून अशी, नयनां खुणवून पुन्हा बघता
का होसि भयाकुल सांग सखे, अग दास तुझा झाला पुरता ॥ ६ ॥

मंदस्मिता प्रसन्ना मदलोललोचना ही
पद मंदमंद ठेवी मंजीरशिंजिताही
रोमांच ये फुलोनी,राधा-सुवर्णदेही
जाई विलासिनी ती गोविंदकुंजगेही ॥ ७ ॥

## प्रबंध बाविसावा

(राग—वराडी, ताल—रूपक)

बघता सखि चंद्रमुखी, संगसुखा ये भरती
उचंबळे प्रेमसिंधु-भावतरंगावरती ॥ ध्रु० ॥

येता सागर उसळे गगनांगणि चंद्रकला
सदनांगणि ये राधा, उठति मिटति भावकला
शोभत किंचित् कलती ॥ २ ॥

उत्कंठित आतुर ती, विलोकिता विलासिनी
आनंदे हृदय भरे, श्याममदनमूर्ति गुणी
अनुकंपित, तगमग ती ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

वक्षस्थलि वैजयंति, धवल हार शोभला
कालिंदीजलि कदंबफेन काय हासला
विखरि हसू चहुभवती ॥ ४ ॥

कोमलदलश्यामलतनु विकचकंज भासे
रुचिचंचल चंचरीक पाकळीत हासे
रसलोलुप भृंगतती ॥ ५ ॥

कटिबंधावरि दुकूल, गौर ते विराजे
परागपीतपटलवलयि नीलनलिन साजे
मीलनास आतुर ती ॥ ६ ॥

नयनविहगयुगुल भुलवि, जागवि रतिभाव उरी
उमलति सलिली कमले शरदातिल नीलसरी
उजळित कर नयनवती ॥ ७ ॥

मंदस्मित वदनकांति कुंडल ये भेटाया
भासति ते रक्तओठ आसुसले चुंबाया
आतुरता थरथरती ॥ ८ ॥

कृष्णनील, घन कुंतल सित कुसुमे गुंफियली
मेघमंडळात जणु चंद्रकला लपलेली
लपवित मन हृदि लपली ॥ ९ ॥

गगनतमी उगवे हा हसत चंद्र पुनवेचा
शुभचंदनतिलक भालि लावियला नवलाचा
रसरंगा ये भरती ॥ १० ॥

कापती अधीर भाव, रतिलीला आठविता
छिनिमिनि मणितेज उजळि पुलकित हो श्यामलता
प्रणयाते कणव न ती ॥ ११ ॥

मणिभूषण अलंकार अंधारी झगमगती
कुंजकुटिरि येता सखि, राधा लावण्यवती
उजळि आस मालवती ॥ १२ ॥

द्विगुणित संस्कृतिसंचय, राधामाधव पाही
वंदुनि जयदेव—कवी, चरणी कवना वाही
मंजुल स्वर अनुसरती ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

(प्रबंध बाविसावा समाप्त)

अपांगदृष्टि नयन तुझे श्रवणपथा अनुसरती
आकुंचनि दृक्पाती, लाजुनिया थरथरती
चोरुनिया पाहताहि नच मीलन चुकले ग
इकडुनि तिकडे वळता चलित नयन थकले ग
श्रमजलदवबिंदुंनी गाल तुझे भिजले ग
उसळति आनंदोर्मि अधरि हसू सजले ग ॥ १ ॥

उगिच खाजवीत गाल खुणवि हळुच लाजरी
सोडुनिया सखिवृंदा जाइ शयनमंदिरी
सहचरि कलहंसींचा जाता तो उडुनि थवा
होइ धीट एकांती धीर देत भ्रांत जिवा
पाहताच जिवलग तो स्मरतापे विकल उरी
लाजते न लाजवती, मृगनयना सुखवि हरी ॥ २ ॥

ललनालालस अनंगलीला लावण्याची लळिते
सौंदर्याचे सार सकल ते मानससरि अनुसरते
सरोजसुंदर उरोजयुगुले राजहंस जलि तरते
राधा हृत्पल्वल रंगस्थल मनसिज खेलनस्थल ते
उर्मिवलय वर्तुळे रम्य ती मृदुल स्पर्शसुख हसिते
केलिकुशल करि कलित ललित रतिमन्मथ मुकुंद मुदिते ॥ ३ ॥

जसा ये चालोनी द्विरदशिरि सिंदूर भरला
रणी लीलेने तो गज कुवलयापीड वधिला
जयश्री ज्या लाभे, गगन जयनादे दुमदुमे
करी वर्षा हर्षे वरुनि सुरमंदारकुसुमे
असा रक्तस्नाता विजयि गजहंता भुज सदा
हरी या संसारी दुरित, प्रिय होवो जनपदा ॥ ४ ॥

[सर्ग अकरावा : सानन्द-दामोदर समाप्त]

अनुक्रमणिका

**सर्ग बारावा**

**सुप्रीत-पीताम्बर**

प्रबंध २३

श्रीकृष्णाची राधेला रतिप्रार्थना

रतोत्सववर्णन

प्रबंध २४

सुरतोत्सवानंतर विस्कळित झालेला आपला श्रृंगार राधिका श्रीकृष्णाकडून पुन्हा नीट करवून घेते.
श्रीकृष्ण राधेला सजवितो.

उपसंहार

अनुक्रमणिका

# सर्ग बारावा
# सुप्रीत-पीताम्बर

जाता सोडुनि सखिवृंद, मनोमनि तिज हो आनंद
नुरली भीती संकोच, सुटला लाजेचा जाच
तरिही मिटते ना लाली, रक्तिमा रेंगळतो गाली
पाहता पुढे कुसुमशेज, खुणेची पापणीत नीज
रंगली कानांची पाळी, कंचुकी होई वरखाली
दाविते मंदहास्य ओठी, मीलनी कुतुहल उत्कंठा
चाळवी अनंग का ऐसा, उताविळ झाली वैकुंठा
आतुरा हौस मनी मोठी, यावया मिठींत जगजेठी
नको रे छळू अता देवा, उमलत्या-फुलत्या राजीवा
सखीचा न हो मनोभंग, बोलला हळूच श्रीरंग
'जिवलगे येइ गडे जवळी,' पुलकित होय तनू कवळी ॥ १ ॥

### प्रबंध तेविसावा

(राग—विभास, ताल—एकताल)

प्रमदे, पुरवि मनोरथ गे
मन्मथ मनि घेतला जिवलगे,
पुरवि मनोरथ गे ॥ ध्रु० ॥

कुसुमसुकोमल रचिली शय्या, वैरिण तुजसी अदया
ठेवि सखे, सुकुमार पाउले लाजवि सुमना-निचया
चुरडुनी गर्व हरी सुभगे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ २ ॥

येता दुरुनी थकलिस बाई चरण चुरू दे मला
अनुसरती तुज पैंजण शयनी, असु दे पायातला
रुणुझुणु पायि तुझ्या बिलगे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ ३ ॥

बोल मंजुले, सुधामधुर ती मज अनुकूला वाणी
संकोचाचा पदर आडवा नको गडे या स्थानी
लपविते लाज गुपित सुभगे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ ४ ॥

दूर करू दे चीर रुचिर हे कुचांवरुनिया आता

तुझ्या नि माझ्या मधे दुरावा, नकोच अडवू हाता
म्हणावे 'होय' राहूनी उगे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ ५ ॥

अधरामृत-मधुपान करू दे अचेतना जगवाया
गाली चुंबनलाली वठता महिरुनि जाई काया
करि गे, मृतमानस जागे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ ६ ॥

विरहानल हा जाळित हृदया मदन सारखा छळी
करपुनि जाई प्रीत उमलती ओठांची पाकळी
शांतवी दाह प्रेमगंगे,
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ ७ ॥

ऐकविती ना मधुर कूजिते वसंत-कोकिळांची
रुमुझुमु दे मेखला, शशिमुखी श्रवणा होय विपंची
छेडिता तारश्रुति रंगे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ ८ ॥

विकल दशा ही पाहुनि माझी, मनिच्या-मनि तू हससी
होसि अधोमुख, नयन निमीलित, विनये लाजुनि बघसी
पापणी हितगुज मज सांगे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ ९ ॥

विफल रात चालली सखे ग, करि मजवरि अनुकंपा
झाले गेले विसरुनि बाई, सोडि अकारण कोपा
मानिनी, प्रीति मान भंगे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ १० ॥

करि अनुनय माधव राधेचा होय प्रिया अनुकूला
गाई श्रीजयदेव-कवी या युगुलांच्या रतिलीला
रंजवी रसिका संयोगे
प्रमदे, पुरवि मनोरथ गे ॥ ११ ॥

(प्रबंध तेविसावा समाप्त)

देता दृढ आलिंगन, नागिणिची ती लपेट
आड येति पुलकबंध, नाजुक गाली चपेट
पाहता तिच्याकडे घे मिटोनी लोचनां

अनुक्रमणिका

कुजबुजती मंजु ओठ, अडवि अधरचुंबना
कटि जवळी आवळिता किणकिणते मणिरशना
आंदोलवि श्वसन, वसन करि मधेच वंचना
सुरतसंग उत्संगा जबे धरून आर्जवा
साधिताहि साधतो न हर्ष येइ आडवा ॥ २ ॥

उभार भार दडपित हो कुच कठोर कोवळे
नख कोरिति ओरखडे, अंग-अंग डंखिले
कवळि जवळि उरि धरुनी, अंग ठेवि दाबुनी
चावुनिया गाल दशनदंश करित चाळणी
ओठावर रक्त ठसे, डसे प्रदिर्घ चुंबनी
ठेवि श्वास कोंडुनीच बोलु दे न भामिनी
धरी मुठीत केश, झुकवि वाकवी तया बळे
ताडितसे श्रोणितटे कामदेह हिंदकळे
सैल होइना विळखा, जखडि फिरुनि नागिणी
करि कमान वाकवुनी, मदांध हो नितंबिनी
हालवून कटिबंधा झाकि जधनसंपुटे
मदनोन्मादे सखिचे सहज देहभान सुटे
झुलवि देह, सुखविति या मना असंख्य वेदना
अनंग खेळतो असाच चेतवीत भावना
अंगावर घेइ डाव, जिंकिताहि हारवी
प्रीतीचे क्रुर खेळ रीत ही नसे नवी ॥ ३ ॥

मदालस लालस राधा सजे
रती विपरीत कराया धजे
प्रियाते सहज हारवाया
विजयिनी होइन मी जाया
अंगना अंगावरती निजे ॥ रति... ॥ १ ॥

जाहले स्तब्ध जघन दोन्ही
हलेना बाहु कवळोनी
पयोधर धर्मजलाने भिजे ॥ रति... ॥ २ ॥

भीतिने घे झाकुनि डोळे
शिथिल ती अंगावरि लोळे
स्मरकंदनि चंदन झिजे ॥ रति... ॥ ३ ॥

कसा साधावा पुरुषार्थ
श्रम हे पुरे होति व्यर्थ

अनुक्रमणिका

जुळेना जुळते पुरुषास जे ॥ रति... ॥ ४ ॥

आणिते उगाच अवसान
साधते मुळी न संधान
तियेचे पौरुष निमिषी विझे ॥ रति... ॥ ५ ॥

आला तिजसी थकवा, लोळतसे धुंद मनी
जागरणाची लाली, भरली तिचिया नयनी
सुटले कुंतल वेणी, झाले ग ओठ फिके
चुरगळली गंधफुले, उरले हे देठ सुके
वक्षःस्थलि कोरियली नखरेखित ही लेणी
पुसले काजळ गाली विस्कटली ग वेणी
वाट चुके कंचुकिही शालु तो दिसे न कुठे
तळहाते कुचकोरक, जघनबिंब झाकितसे
पंचशरे विकलकाप श्रांत-क्लांत राधिका
पाहुनिया कामिनिही मोहित ही श्यामसखा ॥ ४ ॥

क्षीरसिंधुतीरावरि, सखये वरिलेस मला
तुजवरती मोहुनिया शिवशंकर होय खुळा
परि झालिस तू माझी, परिणय हुकला म्हणुनी
जाहला निराश मनी कालकूट घे पिउनी
ऐकतसे पूर्वकथा, ध्यानमग्न ती रमणी
राहिले न भान, उरी अंचल सरला उडुनी
दिसत गौर कुचमंडळ, बघत गौरवे हरी
रक्षिल तो मधुसूदन दुरितांचे तिमिर हरी ॥ ५ ॥

केश विखुरले, सुटली वेणी, गाली विलसे दव
ओठावरती दंतव्रण, ये कुचकलशी मार्दव
हार मानि तो हार फुलांचा, नितळ तनू गोजिरी
शालू फिटला, नसे कंचुकी, विषली मंदोदरी
माजमेखला, सरली खाली, मूक जाहले मणी
विगलितवसना, नग्नगौरवा निरखि चोरपापणी
पुष्ट नितंबा, रतिबिंबाते झाकुनि घेई करी
अंकावरती अंक ठेवुनी, ती मन्मथमंजिरी
रक्तगौर त्या भूगोलार्धा सावरीत घडिघडी
करकमलाने लपवी, फिरवी गौर भुजांची घडी
लाजुनि पाही तनू गोरटी आपुलीच आपण
अनावृत्ता राधिका जिंकिते परि हरीचे मन ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

शिथिल तनू ती थकली राधा मन्मयलीलारती
अर्धे उघडे लालस डोळे ऊर ऊसासे किती
सैल जाहले बंध भुजांचे गळोनि पडली मिठी
सुकली लाली ओठांवरली स्वप्न पाहते दिठी
रदनकांतिने ओठ उजळले, मूक भाव बोलके
श्वासाने आंदोळति झुलती कंपित कुचकोरके
ऐकु न येई गिरा, अक्षरे अधरी ओठंगती
या अधरांची सुधा प्राशिता धन्य होय जगती ॥ ७ ॥

अनंगतृप्ता विमुक्तबाधा राधा रतिसुंदरा
मुग्ध करी आधीन प्रियकरा सहज श्यामसुंदरा
'सख्या जिवलगा, पुरवावी ही हौस माझिया मनी
मला भूषवा अपुल्या हाते,' बोलतसे कामिनी ॥ ८ ॥

## प्रबंध चोविसावा

(राग—रामकली, ताल—यति)

यदुनंदनाते विनवी राधा हृदयानंदिनी ॥ ध्रु० ॥
काढि गडे मृदु चंदनचित्रे
शीत सुगंधित अपुल्या हाते
मदनकलश कुच मृगमद रंगवि रंजनी ॥ १ ॥

मन्मथशर भ्रमरांचे चंचल
चुंबित नयनां पुसले काजळ
करांगुलीने घालि लोचनी उचलुनिया पापणी ॥ २ ॥

रोधिति नयनकुरंमा कामी
श्रुतिमंडल हे मनसिजरश्मी
कर्णभूषणी कुंडलकांती लज्जित अनुरागिणी ॥ ३ ॥

कमलमुखावरि खेळति अवखळ
कचसंभारा भूलले अलिकुल
गुंफि गडे हो माझी वेणी, रचि कुंतलबंधनी ॥ ४ ॥

श्रमजलबिंदु विलसती भाली
चंद्रकोर कस्तुरी रेखिली
पुसुनी स्वकरे, राजिवनयना मज सजवी चित्रांकणी ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

मदनचामरे मयुरपिसारा
विंचरुनी या कचसंभारा
माळि वेणि वनमाळी चतुरा पुष्पसुगंधित गुंफुनी ॥ ६ ॥

मस्त मतंगज मदनकुहर की
मांसल नितंबबिंब विलोकी
रत्नखचित मेखला घालुनी, नेसवी वसना भूषणी ॥ ७ ॥

हरिचरणी रत रसिकजना
जयदेवाची रमवी रसना
कलिमल हरुनी, सुखवी अवनी, दुरितांच्या भंजनी ॥ ८ ॥

(प्रबंध चोविसावा समाप्त)

कुच कर्कश कुस्करुनी करि गौरव, कस्तुरि चर्चुनि रंग भरी
मुख चुंबुनि रंगवि गाल तिचे, परिरंभित तो चितरंग हरी
उरि कंचुकि चंदनचिव उटी कटिमध्य मणीरशना सजवी
कर चंचल गौरभुजा धरुनी, वरि सुंदर अंगद ते चढवी ॥ १ ॥

करि कंकण कांचनमाळ गळा, पदि पैंजण घालित श्यामसखा
चतुरा तिज भूषविता करि तो प्रिय आवडत्या लडिवाळ चुका
थरकापत तो ललितांगलता, पुलकावलि दावित आपुलकी
मनहौस तिची पुरवीत हरी, कुतुके बघते तिज दृष्टि मुकी ॥ २ ॥

अनुकूल तयास दुकूलहि हो सरते न वरी पुरते चकवी
करि नेसविता रुचिरा वसना, रतिसंग सुखासन ते लपवी
कुरवाळि हनु, कवटाळि तनू, कुच चेपविता चुचुका सुखवी
सीत्कार करी, सत्कार तरी, दुखवीत मुखास नवीन चवी ॥ ३ ॥

शेषफणाशिखरश्रेणी, अगणितमणिकांति
प्रतिबिंबित अमित नयन श्यामसदनमूर्ती
शेषशयनि चुरित चरणपद्म धरुनि अंकी
बिंबलोचनी रमेस नेणता विलोकी ॥ ४ ॥

ती गंधर्वकला गुणी कुशलता लाभे जया वैष्णवा
श्रृंगारातिल सार नर्म रसना, सत्काव्य वीणारवा
सानंदे जयदेव पंडितकवी छंदास गुंफी गुणी
ही माला रसिका सुशोभित करो कंठास मुक्तामणी
वाहे निर्भर भावरम्य सरिता को छंद निस्यंद हे

राधामाधवप्रीति भक्ति मधुरा श्रीगीतगोविंद हे ॥ ५ ॥

सोडि सख्या अभिमान मधा तू, बैस उगी शर्करे ।
द्राक्ष, माधुरी फिकी, सुधे गे, दैव तुझेही फिरे,
तुझे जाहले पाणी दुग्धा, अधर, विभव संपले
नीरसपण तुज आले आम्रा, मरंदजल शिंपिले
जयदेवाची ही रसवंती, नवरसमधुमंजिरी
श्रृंगाराची खनीच केवळ जोवर अवनीवरी ॥ ६ ॥

राधामाधवविलासलीलालाघव यमुनापुलिनी
रोमावलिची मुक्तामाला संगमिताच त्रिवेणी
आल्हादे कुचप्रयागतीर्थी हाती पुण्यफले ती
सहर्ष झेली पुरुषोत्तम दे चिदानंदरसस्फूर्ती ॥ ७ ॥

[सर्ग बारावा : सुप्रीत-पीताम्बर समाप्त]

अनुक्रमणिका

महाकवि-श्रीजयदेवविरचितम्

# गीतगोविन्दकाव्यम्

अनुक्रमणिका

## प्रथमः सर्गः

### सामोद-दामोदरः

मेघैर्मेदुरमम्बरं वनभुवः श्यामास्तमालद्रुमै-
नर्क्तं भीरुरयं त्वमेव तदिमं राधे गृहं प्रापय ।
इत्थं नन्दनिदेशतश्चलितयोः प्रत्यध्वकुञ्जद्रुमं
राधामाधवयोर्जयन्ति यमुनाकूले रहः कलेयः ॥ १ ॥

वाग्देवताचरितचित्रितचित्तसद्मा
पद्मावतीचरणचारणचक्रवर्ती ।
श्रीवासुदेवरतिकेलिकथासमेत-
मेतं करोति जयदेवकविः प्रबन्धम् ॥ २ ॥

यदि हरिस्मरणे सरसं मनो यदि विलासकलासु कुतूहलम् ।
मधुरकोमलकान्तपदावलीं शृणु तदा जयदेवसरस्वतीम् ॥ ३ ॥

वाचः पल्लवयत्युमापतिधरः संदर्भशुद्धिं गिरां
जानीते जयदेव एव शरणः श्लाध्यो दुरूहद्रुतेः ।
शृङ्गारोत्तरसत्प्रेयरचनैराचार्यगोवर्धन-
स्पर्धी कोऽपि न विश्रुतः श्रुतिधरो धोयी कविक्ष्मापतिः ॥ ४ ॥

### प्रथमः प्रबन्धः

(मालवरागेण रूपकतालेन गीयते ।)

प्रलयचयोधिजले धृतवानसि वेदम्
विहितवहित्रचरित्रमखेदम् ।
केशव धृतमीनशरीर जय जगदीश हरे ॥ ध्रुवम् ॥ जय... ॥ १ ॥

क्षितिरतिविपुलतरे तव तिष्ठति पृष्ठे
धरणिधरणकिणचक्रगरिष्ठे ।
केशव धृतकच्छपरूप जय जगदीश हरे ॥ २ ॥

वसति दशनशिखरे धरणी तव लग्ना
शशिनि कलङ्ककलेव निमग्ना ।
केशव धृतशूकररूप जय जगदीश हरे ॥ ३ ॥

तव करकमलवरे नखमद्भुतशृङ्गं

दलितहिरण्यकशिपुतनुभृङ्गम् ।
केशव धृतनरहरिरूप जय जगदीश हरे ॥ ४ ॥

छलयसि विक्रमणे बलिमद्भुतवामन
पदनखनीरजनितजनपावन ।
केशव धृतवामनरूप जय जगदीश हरे ॥ ५ ॥

क्षत्रियरुधिरमये जगदपगतपापं
स्नपयसि पयसि शमितभवतापम् ।
केशव धृतभृगुपतिरूप जय जगदीश हरे ॥ ६ ॥

वितरसि दिक्षु रणे दिक्पतिकमनीयं
दशमुखमौलिबलिं रमणीयम् ।
केशव धृतरघुपतिरूप जय जगदीश हरे ॥ ७ ॥

वहसि वपुषि विशदे वसने जलदाभं
हलहतिभीतिमिलितयमुनाभम् ।
केशव धृतहलधररूप जय जगदीश हरे ॥ ८ ॥

निन्दसि यज्ञविधेरहह श्रुतिजातं
सदयहृदय दर्शितपशुघातम् ।
केशव धृतबुद्धशरीर जय जगदीश हरे ॥ ९ ॥

म्लेच्छनिवहनिधने कलयसि करवालं
धूमकेतुमिव किमपि करालम् ।
केशव धृतकल्किशरीर जय जगदीश हरे ॥ १० ॥

श्रीजयदेवकवेरिदमुदितमुदारं
शृणु शुभदं सुखदं भवसारम् ।
केशव धृतदशविधरूप जय जगदीश हरे ॥ ११ ॥

(इति प्रथमः प्रबन्धः ।)

वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते
दैत्यान् दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते ।
पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते
म्लेच्छान् मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

## द्वितीयः प्रबन्धः

(गुर्जरीरागनिः सारतालाभ्यां गीयते ।)

श्रितकमलाकुचमण्डल धृतकुण्डल ए
कलितललितवनमाल जय जय देव हरे ॥ ध्रुवम् ॥ जय जय... ॥ १ ॥

दिनमणिमण्डलमण्डन भवखण्डन ए
मुनिजनमानसहंस जय जय देव हरे ॥ २ ॥

कलियविषधरगञ्जन जनरञ्जन ए
यदुकुलनलिनदिनेश जय जय देव हरे ॥ ३ ॥

मधुमुरनरकविनाशन गरुडासन ए
सुरकुलकेलिनिदान जय जय देव हरे ॥ ४ ॥

अमलकमलदललोचन भवमोचन ए
त्रिभुवनभवननिधान जय जय देव हरे ॥ ५ ॥

जनकसुताकृतभूषण जितदूषण ए
समरशमितदशकण्ठ जय जय देव हरे ॥ ६ ॥

अभिनवजलधरसुन्दर धृतमन्दर ए
श्रीमुखचन्द्रचकोर जय जय देव हरे ॥ ७ ॥

श्रीजयदेवकवेरिदं कुरुते मुदम् ए
मङ्गलमुज्ज्वलगीतं जय जय देव हरे ॥ ८ ॥

(इति द्वितीयः प्रबन्धः ।)

पद्मापयोधरतटीपरिरम्भलग्न-
काश्मीरमुद्रितमुरो मधुसूदनस्य ।
व्यक्तानुरागमिव खेलदनङ्गखेद
स्वेदाम्बुपूरमनुपूरयतु प्रियं वः ॥ ६ ॥

वसन्ते वासन्तीकुसुमसुकुमारैरवयवै-
र्भ्रमन्तीं कान्तारे बहुविहितकृष्णानुसरणाम् ।
अमन्दं कन्दर्पज्वरजनितचिन्ताकुलतया
चलद्बाधां राधां सरसमिदमूचे सहचरी ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

## तृतीयः प्रबन्धः

(वसन्तरागयतितालाभ्यां गीयते ।)

ललितलवङ्गलतापरिशीलनकोमलमलयसमीरे ।
मधुकरनिकरकरम्बितकोकिलकूजितकुञ्जकुटीरे ॥

विहरति हरिरिह सरसवसन्ते
नृत्यति युवतिजनेन समं सखि विरहिजनस्य दुरन्ते ॥ ध्रुवम् । विहरति... ॥ १ ॥

उन्मदमदनमनोरथपथिकवधूजनजनितविलापे ।
अलिकुलसङ्कुलकुसुमसमूहनिराकुलबकुलकलापे ॥ विहरति... ॥ २ ॥

मृगमदसौरभरभसवशंवदनवदलमालतमाले ।
युवजनहृदयविदारणमनसिजनखरुचिकिंशुकजाले ॥ विहरति... ॥ ३ ॥

मदनमहीपतिकनकदण्डरुचिकेशरकुसुमविकासे ।
मिलितशिलीमुखपाटलपटलकृतस्मरतूणविलासे ॥ विहरति... ॥ ४ ॥

विगलितलज्जितजगदवलोकनतरुणकरुणकृतहासे ।
विरहिनिकृन्तनकुन्तमुखाकृतिकेतकिदन्तुरिताशे ॥ विहरति... ॥ ५ ॥

माधविकापरिमलललिते नवमालतिजातिसुगन्धौ ।
मुनिमनसामपि मोहनकारिणि तरुणाकारणबन्धौ ॥ विहरति... ॥ ६ ॥

स्फुरदतिमुक्तलतापरिरम्भणमुकुलितपुलकितचूते ।
वृन्दावनविपिने परिसरपरिगतयमुनाजलपूते ॥ विहरति... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितमिदमुदयति हरिचरणस्मृतिसारम् ।
सरसवसन्तसमयवनवर्णनमनुगतमदनविकारम् ॥ विहरति... ॥ ८ ॥

(इति तृतीयः प्रबन्धः ।)

दरविदलितमल्लीवल्लिचञ्चत्पराग-
प्रकटितपटवासैर्वासयन् काननानि ।
इह हि दहति चेतः केतकीबन्धबन्धुः
प्रसरदसमबाणप्राणवद्गन्धवाहः ॥ ८ ॥

उन्मीलन्मधुगन्धलुब्धमधुपव्याधूतचूताङ्कुर-

अनुक्रमणिका

क्रीडत्कोकिलकाकलीकलरवैरुद्गीर्णकर्णज्वराः ।
नीयन्ते पथिकैः कथं कथमपि ध्यानावधानक्षण-
प्राप्तप्राणसमासमागमरसोल्लासैरमी वासराः ॥ ९ ॥

अनेकनारीपरिरम्भसंभ्रमस्फुरन्मनोहारिविलासलालसम् ।
मुरारिमारादुपदर्शयन्त्यसौ सखी समक्षं पुनराह राधिकाम् ॥ १० ॥

## चतुर्थः प्रबन्धः

(रामकरीरागयतितालाभ्यां गीयते ।)

चन्दनचर्चितनीलकलेवरपीतवसनवनमाली ।
केलिचलन्मणिकुण्डलमण्डितगण्डयुगस्मितशाली ॥

हरिरिह मुग्धवधूनिकरे
विलासिनि विलसति केलिपरे ॥ ध्रुवम् ॥ हरि॰... ॥ १ ॥

पीनपयोधरभारभरेण हरिं परिरभ्य सरागम् ।
गोपवधूरनुगायति काचिदुदञ्चितपञ्चमरागम् ॥ हरि॰... ॥ २ ॥

कापि विलासविलोलविलोचनखेलनजनितमनोजम् ।
ध्यायति मुग्धवधूरधिकं मधुसूदनवदनसरोजम् ॥ हरि॰... ॥ ३ ॥

कापि कपोलतले मिलिता लपितुं किमपि श्रुतिमूले ।
चारु चुचुम्ब नितम्बवती दयितं पुलकैरनुकूले ॥ हरि॰... ॥ ४ ॥

केलिकलाकुतुकेन च काचिदमुं यमुनाजलकूले ।
मञ्जुलवञ्जुलकुञ्जगतं विचकर्ष करेण दुकूले ॥ हरि॰... ॥ ५ ॥

करतलतालतरलवलयावलिकलितकलस्वनवंशे ।
रासरसे सहनृत्यपरा हरिणा युवतिः प्रशशंसे ॥ हरि॰... ॥ ६ ॥

श्लिष्यति कामपि चुम्बति कामपि रमयति कामपि रामाम् ।
पश्यति सस्मितचारु परामपरामनुगच्छति वामाम् ॥ हरि॰... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितमिदमद्भुतकेशवकेलिरहस्यस् ।
वृन्दावनविपिने ललितं वितनोतु शुभानि यशस्यम् ॥ हरि॰... ॥ ८ ॥

(इति चतुर्थः प्रबन्धः ।)

अनुक्रमणिका

विश्वेषामनुरञ्जनेन जनयन्नानन्दमिन्दीदर–
श्रेणीश्यामलकोमलैरुपनयन्नङ्गैरनङ्गोत्सवम् ।
स्वच्छन्दं व्रजसुन्दरीभिरभितः प्रत्यङ्गमालिङ्गितः
शृङ्गारः सखि मूर्तिमानिव मधौः मुग्धो हरिः क्रीडति ॥ ११ ॥

अद्योत्सङ्गवसद्भुजङ्गकवलवलेशादिवेशाचलं
प्रालेयप्लवनेच्छयानुसरति श्रीखण्डशैलानिलः ।
किं च स्निग्धरसालमौलिमुकुलान्यालोक्य हर्षोदया–
दुन्मीलन्ति कुहूः कुहूरिति कलोत्तालाः पिकानां गिरः ॥ १२ ॥

इति जयदेवकृतौ श्रीगोतगोविन्दे सामोद–दामोदरो नाम प्रथमः सर्गः ।

अनुक्रमणिका

## द्वितीयः सर्गः

### अक्लेश-केशवः

विहरति वने राधा साधारणप्रणये हरी
विगलितनिजोत्कर्षादीर्ष्यावशेन गताऽन्यतः ।
क्वचिदपि लताकुञ्जे गुञ्जन्मधुव्रतमण्डली-
मुखरशिखरे लीना दीनाप्युवाच रहः सखीम् ॥ १ ॥

### पञ्चमः प्रबन्धः

(गुर्जरीरागेच यतिताले व गीयते ।)

संचरदधरसुधामधुरध्वनिमुखरितमोहनवंशम् ।
चलितदृगञ्चलचञ्चलमौलिकपोलविलोलवतंसम् ॥

रासे हरिमिह विहितविलासम् ।
स्मरति मनो मम कृतपरिहासम् ॥ ध्रुवम् ॥ रासे... ॥ १ ॥

चन्द्रकचारुमयूरशिखण्डकमण्डलवलयितकेशम् ।
प्रचुरपुरन्दरधनुरनुञ्जितमेदुरमुदिरसुवेशम् ॥ रासे... ॥ २ ॥

गोपकदम्बनितम्बवतीमुखचुम्बनलम्भितलोभम् ।
बन्धुजीवमधुराधरपल्लवमुल्लसितस्मितशोभम् ॥ रासे... ॥ ३ ॥

विपुलपुलकभुजपल्लववलयितबल्लवयुवतिसहस्रम् ।
करचरणोरसि मणिगणभूषणकिरणविभिन्नतमिस्रम् ॥ रासे... ॥ ४ ॥

जलदपटलवलदिन्दुविनिन्दकचन्दनतिलकललाटम् ।
पीनपयोधरपरिसरमर्दननिर्दयहृदयकपाटम् ॥ रासे... ॥ ५ ॥

मणिमयमकरमनोहरकुण्डलमण्डितगण्डमुदारम् ।
पीतवसनमनुगतमुनिमनुजसुरासुरवरपरिवारम् ॥ रासे... ॥ ६ ॥

विशदकदम्बतले मिलितं कलिकलुषभयं शमयन्तम् ।
मामपि किमपि तरङ्गदनङ्गदृशा मनसा रमयन्तम् ॥ रासे... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितमतिसुन्दरमोहनमधुरिपुरूपम् ।
हरिचरणस्मरणं प्रति सम्प्रति पुण्यवतामनुरूपम् ॥ रासे... ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

(इति पञ्चमः प्रबन्धः ।)

**गणयति गुणग्रामं भामं भ्रमादपि नेहते**
**वहति च परीतोषं दोषं विमुञ्चति दूरतः ।**
**युवतिषु चलत्तृष्णे कृष्णे विहारिणि मां विना**
**पुनरपि मनो वामं कामं करोति करोमि किम् ॥ २ ॥**

**षष्ठः प्रबन्धः**

(मालवगौडरागेण एकतालीतालेन च गीयते ।)

**निभृतनिकुञ्जगृहं गतया निशि रहसि निलीय वसन्तम् ।**
**चकितविलोकितसकलदिशा रतिरभसभरेण हसन्तम् ॥**

**सखि हे केशिमधनमुदारम् ।**
**रमय मया सह मदनमनोरथभावितया सविकारम् ॥ ध्रु० ॥ सखि... ॥ १ ॥**

**प्रथमसमागमलज्जितया षटुचाटुशतैरनुकूलम् ।**
**मृदुमधुरस्मितभाषितया शिथिलीकृतजघनदुकूलम् ॥ सखि... ॥ २ ॥**

**किसलयशयननिवेशितया चिरमुरसि ममैव शयानम् ।**
**कृतपरिरम्भणचुम्बनया परिरभ्य कृताधरपानम् ॥ सखि... ॥ ३ ॥**

**अलसनिमीलितलोचनया पुलकावलिललितकपोलम् ।**
**श्रमजलसिक्तकलेवरया वरमदनमदादतिलोलम् ॥ सखि... ॥ ४ ॥**

**कोकिलकलरवकूजितया जितमनसिजतन्त्रविचारम् ।**
**श्लथकुसुमाकुलकुन्तलया नखलिखितघनस्तनभारम् ॥ सखि... ॥ ५ ॥**

**चरणरणितमणिनूपुरया परिपूरितसुरतवितानम् ।**
**मुखरविशृङ्खलमेखलया सकचग्रहचुम्बनदानम् ॥ सखि... ॥ ६ ॥**

**रतिसुखसमयरसालसया दरमुकुलितनयनसरोजम् ।**
**निःसहनिपतिततनुलतया मधुसूदनमुदितमनोजम् ॥ सखि... ॥ ७ ॥**

**श्रीजयदेवभणितमिदमतिशयमधुरिपुनिधुवशीलम् ।**
**सुखमुत्कण्ठितगोपवधूकथितं वितनोति सलीलम् ॥ सखि... ॥ ८ ॥**

(इति षष्ठः प्रबनधः ।)

अनुक्रमणिका

**हस्तस्रस्तविलासवंशमनृजुभ्रूवल्लिमद्वल्लवी-**
**वृन्दोत्सारिदृगन्तदीक्षितमतिस्वेदार्द्रगण्डस्थलम् ।**
**मामुद्वीक्ष्य विलज्जितं स्मितसुधामुग्धाननं कानने**
**गोविन्दं व्रजसुन्दरीगणवृतं पश्यामि हृष्यामि च ॥ ३ ॥**

**दुरालोकस्तोकस्तबकनवकाशीकलतिका-**
**विकासः कासारोपवनपवनोऽपि व्यथयति ।**
**अपि भ्राम्यद्भृङ्गीरणितरमणीया न मुकुल-**
**प्रसूतिश्चूतानां सखि शिखरिणीयं सुखयति ॥ ४ ॥**

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविंन्दे अक्लेश-केशवो नाम द्वितीयः सर्गः ।

## तृतीयः सरिर्गः

### मुग्ध-मधुसूदनः

कंसारिरपि संसारवासनाबन्धशृङ्खलाम् ।
राधामाधाय हृदये तत्याज व्रजसुन्दरीः ॥ १ ॥

इतस्ततस्तामनुसृत्य राधिकामनङ्गबाणव्रणखिन्नमानसः ।
कृतानुतापः स कलिन्दनन्दिनीतटान्तकुञ्जे विषसाद माधवः ॥ २ ॥

### सप्तमः प्रबन्धः

(गुर्जरीरागयतितालाभ्यां गीयते ।)

मामियं चलिता विलोक्य वृतं वधूनिचयेन ।
सापराधतया मयापि न वारितातिभयेन ॥

हरिहरि हतादरतया गता सा कुपितेव ॥ ध्रुवम् ॥ हरिहरि... ॥ १ ॥

किं करिष्यति किं वदिष्यति सा चिरं विरहेण ।
किं धनेन जनेन किं मम जीवितेन गृहेण ॥ हरिहरि... ॥ २ ॥

चिन्तयामि तदाननं कुटिलभ्रु कोपभरेण ।
शोणपद्ममिवोपरि भ्रमताकुलं भ्रमरेण ॥ हरिहरि... ॥ ३ ॥

तामहं हृदि संगतामनिशं भृशं रमयामि ।
किं वनेऽनुसरामि तामिह किं वृथा विलपामि ॥ हरिहरि... ॥ ४ ॥

तन्वि खिन्नमसूयया हृदयं तवाकलयामि ।
तन्न वेद्मि कुतो गतासि न तेन तेऽनुनयामि ॥ हरिहरि... ॥ ५ ॥

दृश्यसे पुरतो गतागतमेव मे विदधासि ।
किं पुरेव ससंभ्रमं परिरम्भणं न ददासि ॥ हरिहरि... ॥ ६ ॥

क्षम्यतामपरं कदापि तवेदृशं न करोमि ।
देहि सुन्दरि दर्शनं मम मन्मथेन दुनोमि ॥ हरिहरि... ॥ ७ ॥

वर्णितं जयदेवकेन हरेरिदं प्रवणेन ।
किन्दुबिल्वसमुद्रसंभवरोहिणीरमणेन ॥ हरिहरि... ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

(इति सप्तमः प्रबन्धः ।)

हृदि बिसलताहारो नायं भुजङ्गमनायकः
कुवलयदलश्रेणीकण्ठे न सा गरलद्युतिः ।
मलयजरजो नेदं भस्म प्रियारहिते मयि
प्रहर न हरभ्रान्त्यानङ्ग क्रुधा किमु धावसि ॥ ३ ॥

पाणौ मा कुरु चूतसायकममुं मा चापमारोपय
क्रीडानिर्जितविश्व मूर्च्छितजनाघातेन किं पौरुषम् ।
तस्या एव मृगीदृशो मनसिजप्रेङ्खत्कटाक्षाशुग-
श्रेणीजर्जरितं मनागपि मनो नाद्यापि संधुक्षते ॥ ४ ॥

भ्रूचापे निहितः कटाक्षविशिखो निर्मातु मर्मव्यथां
श्यामात्मा कुटिलः करोतु कबरीभारोऽपि मारोद्यमम् ।
मोहं तावदयं च तन्वि तनुतां बिम्बाधरो रागवान्
सदवृत्तः स्तनमण्डलस्तव कथं प्राणैर्मम क्रीडति ॥ ५ ॥

तानि स्पर्शसुखानि ते च तरलाः स्निग्धा दृशोर्विभ्रमा-
स्तद्वक्त्राम्बुजसौरभं स च सुधास्यन्दी गिरां वक्रिमा ।
सा बिम्बाधरमाधुरीति विषयासङ्गेऽपि मन्मानसं
तस्यां लग्नसमाधि हन्त विरहव्याधिः कथं वर्धते ॥ ६ ॥

भ्रूपल्लवं धनुरपाङ्गतरङ्गितानि
बाणा गुणः श्रवणपालिरिति स्मरेण ।
तस्यामनङ्जयजङ्गमदेवताया-
मस्त्राणि निर्जितजगन्ति किमर्पितानि ॥ ७ ॥

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे मुग्ध-मधुसूदनो नाम तृतीयः सर्गः ।

अनुक्रमणिका

## चतुर्थः सर्गः

### स्निग्ध-मधुसूदनः

यमुनातीरवानीरनिकुञ्जे मन्दमास्थितम् ।
प्राह प्रेमभरोद्भ्रान्तं माधवं राधिका सखी ॥ १ ॥

### अष्टमः प्रबन्धः

(कर्णाटरागैकतालीतालाभ्यां गीयते ।)

निन्दति चन्दनमिन्दुकिरणमनुविन्दति खेदमधीरम् ।
व्यालनिलयमिलनेन गरलमिव कलयति मलयसमीरम् ॥

सा विरहे तव दीना ।
माधव मनसिजविशिखभयादिव भावनया त्वयि लीना ॥ ध्रु० ॥ सा विरहे... ॥ १ ॥

अविरलनिपतितमदनशरादिव भवदवनाय विशालम् ।
स्वहृदयमर्मणि वर्म करोति सजलनलिनीदलजालम् ॥ सा विरहे... ॥ २ ॥

कुसुमविशिखशरतल्पमनल्पविलासकलाकमनीयम् ।
व्रतमिव तव परिरम्भसुखाय करोति कुसुमशयनीयम् ॥ सा विरहे... ॥ ३ ॥

वहति च चलितविलोचनजलभरमाननकमलमुदारम् ।
विधुमिव विकटविधुन्तुददन्तदलनगलितामृतधारम् ॥ सा विरहे... ॥ ४ ॥

विलिखति रहसि कुरङ्गमदेन भवन्तमसमशरभूतम् ।
प्रणमति मकरमधो विनिधाय करे च शरं नवचूतम् ॥ सा विरहे... ॥ ५ ॥

ध्यानलयेन पुरः परिकल्प्य भवन्तमतीव दुरापम् ।
विलपति हसति विषीदति रोदिति चञ्चति मुञ्चति तापम् ॥ सा विरहे... ॥ ६ ॥

प्रतिपदमिदमपि निगदति माधव तव चरणे पतिताहम् ।
त्वयि विमुखे मयि सपदि सुधानिधिरपि तनुते तनुदाहम् ॥ सा विरहे... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितमिदमधिकं यदि मनसा नटनीयम् ।
हरिविरहाकुलबल्लवयुवतिसखीवचनं पठनीयम् ॥ सा विरहे... ॥ ८ ॥

(इति अष्टमः प्रबन्धः ।)

अनुक्रमणिका

आवासो विपिनायते प्रियसखीमालापि जालायते
तापोऽपि श्वसितेन दावदहनज्वालाकलापायते ।
सापि त्वद्विरहेण हन्त हरिणीरूपायते हा कथं
कन्दर्पोऽपि यमायते विरचयञ्शार्दूलविक्रीडितम् ॥ २ ॥

**नवमः प्रबन्धः**

(देशाख्यरागैकतालीतालाभ्यां गीयते ।)

स्तनविनिहतमपि हारमुदारम् ।
सा मनुते कृशतनुरतिभारम् ॥
राधिका तव विरहे केशव ॥ ध्रुवम् ॥ राधिका... ॥ १ ॥

सरसमसृणमपि मलयजपङ्कम् ॥
पश्यति विषमिव वपुषि सशङ्कम् ॥ राधिका... ॥ २ ॥

श्वसितपवनमनुपमपरिणाहम् ।
मदनदहनमिव वहति सदाहम् ॥ राधिका... ॥ ३ ॥

दिशि दिशि किरति सजलकणजालम् ।
नयननलिनमिव विगलितनालम् ॥ राधिका... ॥ ४ ॥

त्यजति न पाणितलेन कपोलम् ।
बालशशिनमिव सायमलोलम् ॥ राधिका... ॥ ५ ॥

नयनविषयमपि किसलयतल्पम् ।
कलयति विहितहुताशविकल्पम् ॥ राधिका... ॥ ६ ॥

हरिरिति हरिरिति जपति सकामम् ।
विरहविहितमरणेव निकामम् ॥ राधिका... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितमिति गीतम् ।
सुखयतु केशवपदमुपनीतम् ॥ राधिका... ॥ ८ ॥

(इति नवमः प्रबन्धः ।)

सा रोमाञ्चिति सीत्करोति विलपत्युत्कम्पते ताम्यति
ध्यायत्युद्भ्रमति प्रमीलति पतत्युद्याति मूर्च्छत्यपि ।
एतावत्यतनुज्वरे वरतनुर्जीवेन्न किं ते रसात्

अनुक्रमणिका

स्ववैद्यप्रतिम प्रसीदसि यदि त्यक्तोऽन्यथा हस्तकः ॥ ३ ॥

स्मरातुरां दैवतवैद्यहृद्य त्वदङ्गसङ्गामृतमात्रसाध्याम् ।
निवृत्तबाधां कुरुषे न राधामुपेन्द्र वज्रादपि वारुणोऽसि ॥ ४ ॥

कन्दर्पज्वरसंज्वरातुरतनोराश्चर्यमस्याश्चिरं
चेतश्चन्दनचन्द्रमः कमलिनीचिन्तासु संताम्यतिं ।
किन्तु क्लान्तिवशेन शीतलतनुं त्वामेकमेव प्रियं
ध्यायन्ती रहसि स्थिता कथमपि क्षीणा क्षणं प्राणिति ॥ ५ ॥

क्षणमपि विरहः पुरा न सेहे
नयननिमीलनखिन्नया यया ते ।
श्वसिति कथमसौ रसालशाखां
चिरविरहेण विलोक्य पुष्पिताग्राम् ॥ ६ ॥

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे स्निग्ध-मधुसूदनो नाम चतुर्थः सर्गः ।

अनुक्रमणिका

## पञ्चमः सर्गः

### साकाङ्क्ष-पुण्डरीकाक्षः

अहमिह निवसामि याहि राधा-
मनुनय मद्वचनेन चानयेथाः ।
इति मधुरिपुना सखी नियुक्ता
स्वयमिदमेत्य पुनर्जगाद राधाम् ॥ १ ॥

### दशमः प्रबन्धः

(देशीवराडीरागेण रूपकतालेन गीयते. ।)

वहति मलयसमीरे मदनमुपनिधाय ॥
स्फुटति कुसुमनिकरे विरहिहृदयदलनाय ।
तव विरहे वनमाली सखि सीदति ॥ ध्रुवम् ॥ तव विरहे… ॥ १ ॥

दहति शिशिरमयूखे मरणमनुकरोति ।
पतति मदनविशिखे विलपति विकलतरोऽति ॥ तव विरहे… ॥ २ ॥

ध्वनति मधुपसमूहे श्रवणमपिदधाति ।
मनसि कलितविरहे निशि निशि रुजमुपयाति ॥ तव विरहे… ॥ ३ ॥

वसति विपिनविताने त्यजति ललितधाम ।
लुठति धरणिशयने बहु विलपति तब नाम ॥ तव विरहे… ॥ ४ ॥

भणति कविजयदेवे विरहखिलसितेन ।
मनसि रभसविभवे हरिरुदयतु सुकृतेन ॥ तब विरहे… ॥ ५ ॥

(इति दशमः प्रबंधः)

पूर्वं यत्र समं त्वया रतिपतेरासादिताः सिद्धय-
स्तस्मिन्नेव निकुञ्जमन्मथमहातीर्थे पुनर्माधवः ।
ध्यायंस्त्वामनिशं जपन्नपि तवैवालापमन्त्रावलीं
भूयस्त्वत्कुचकुम्भनिर्भरपरीरम्भामृतं वाञ्छति ॥ २ ॥

अनुक्रमणिका

**एकादशः प्रबन्धः**

(गुर्जरीरागेण एकतालीतालेन गीयते ।)

रतिसुखसारे गतमभिसारे मदनमनोहरवेशम् ।
न कुरु नितम्बिनि गमनविलम्बनमनुसर तं हृदयेशम् ॥

धीरसमीरे यमुनातीरे वसति वने वनमाली ।
गोपीपीनपयोधरमर्दनचञ्चलकरयुगशाली ॥ ध्रुवम् ॥ धीर०... ॥ १ ॥

नामसमेतं कृतसङ्केतं वादयते मृदु वेणुम् ।
बहु मनुतेऽतनु ते तनुसंगतपवनचलितमपि रेणुम् ॥ धीर०... ॥ २ ॥

पतति पतत्रे विचलिति पत्रे शङ्कितभवदुपयानम् ।
रचयति शयनं सचकितनयनं पश्यति तव पन्थानम् ॥ धीर०... ॥ ३ ॥

मुखरमधीरं त्यजमञ्जीरं रिपुमिव केलिसुलोलम् ।
चल सखि कुञ्ज सतिमिरपुञ्जं शीलय नीलनिचोलम् ॥ धीर०...॥ ४ ॥

उरसि मुरारेरुपहितहारे घन इव तरलबलाके ।
तडिंदिव पीते रतिविपरीते राजसि सुकृतविपाके ॥ धीर०... ॥ ५ ॥

विगलितवसनं परिहृतरशनं घटय जघनमपिधानम् ।
किसलयशयने पङ्कजनयने निधिमिव हर्षनिदानम् ॥ धीर०... ॥ ६ ॥

हरिरभिमानी रजनिरिदानीमियमपि याति विरामम् ।
कुरु मम वचनं सत्वररचनं पूरय मधुरिपुकामम् ॥ धीर०... ॥ ७ ॥

श्रीजयदेवे कृतहरिसेवे भणति परमरमणीयम् ।
प्रमुदितहृद्यं हरिमतिसदयं नमत सुकृतकमनीयम् ॥ धीर०... ॥ ८ ॥

(इति एकादशः प्रबन्धः ।)

विकिरति मुहुः श्वासानाशाः पुरो मुहुरीक्षतें
प्रविशति मुहुः कुञ्जं गुञ्जन्मुहुर्बहु ताम्यति ।
रचयति मुहुः शय्यां पर्याकुलं मुहुरीक्षते
मदनकदनक्लान्तः कान्ते प्रियस्तव वर्तते ॥ ३ ॥

त्वद्वाम्येन समं समग्रमधुना तिग्मांशुरस्तं गतो

गोविन्दस्य मनोरथेन च समं प्राप्तं तमः सान्द्रताम् ।
कोकानां करुणस्वनेन सदृशी दीर्घा मदभ्यर्थना
तन्मुग्धे विफलं विलम्बनमसौ रम्योऽभिसारक्षणः ॥ ४ ॥

आश्लेषादनु चुम्बनादनु नखोल्लेखादनु स्वान्तज-
प्रोद्बोधादनु संभ्रमादनु रतारम्भादनु प्रीतयोः ।
अन्यार्थं गतयोर्भ्रमान्मिलितयोः संभाषणैर्जानतो-
र्दम्पत्योरिह को न को न तमसि व्रीडाविमिश्रो रसः ॥ ५ ॥

सभयचकितं विन्यस्यन्तीं दृशं तिमिरे पथि
प्रतितरु मुहुः स्थित्वा मन्दं पदानि वितन्वतीम् ।
कथमपि रहः प्राप्तामङ्गैरनङ्गतरङ्गिभिः
सुमुखि सुभगः पश्यन् स त्वामुपैतु कृतार्थताम् ॥ ६ ॥

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे साकाङ्क्ष-पुण्डरीकाक्षो नाम पञ्चमः सर्गः ।

अनुक्रमणिका

## षष्ठः सर्गः

## सोत्कण्ठ-वैकुण्ठ

अथ तां गन्तुमशक्तां चिरमनुरक्तां लतागृहे दृष्टवा ।
तच्चरितं गोविन्दे मनसिजमन्दे सखी प्राह ॥ १ ॥

### द्वादशः प्रबन्धः

(गौडकरीरागेण रूपकतालेन गीयते ।)

पश्यति दिशि दिशि रहसि भवन्तम् ।
त्वदधरमधुरमधूनि पिबन्तम् ॥
नाथ हरे जय नाथ हरे सीदति राधा वासगृहे ॥ ध्रुवम् ॥ नाथ हरे... ॥ १ ॥

त्वदभिसरणरभसेन वलन्ती ।
पतति पदानि कियन्ति चलन्ती ॥ नाथ हरे... ॥ २ ॥

विहितविशदबिसकिसलयवलया ।
जीवति परमिह तव रतिकलया ॥ नाथ हरे... ॥ ३ ॥

मुहुरवलोकितमण्डनलीला ।
मधुरिपुरहमिति भावनशीला ॥ नाथ हरे... ॥ ४ ॥

त्वरितमुपैति न कथमभिसारम् ।
हरिरिति वदति सखीमनुवारम् ॥ नाथ हरे... ॥ ५ ॥

श्लिष्यति चुम्बति जलधरकल्पम् ।
हरिरुपगत इति तिमिरमनल्पम् ॥ नाथ हरे... ॥ ६ ॥

भवति विलम्बिनि विगलितलज्जा ।
विलपति रोदिति वासकसज्जा ॥ नाथ हरे... ॥ ७ ॥

श्रीजयदेवकवेरिदमुदितम् ।
रसिकजनं तनुतामतिमुदितम् ॥ नाथ हरे... ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

(इति द्वादशः प्रबन्धः ।)

**विपुलपुलकपालिः स्फीतसीत्कारमन्त-**
**र्जनितजडिमकाकुव्याकुलं व्याहरन्ती ।**
**तव कितव विधायामन्दकन्दर्पचिन्तां**
**रसजलनिधिमग्ना ध्यानलग्ना मृगाक्षी ॥ २ ॥**

**अङ्गेष्वाभरणं करोति बहुशः पत्रेऽपि संचारिणि**
**प्राप्तं त्वां परिशङ्कते वितनुते शय्यां चिरं ध्यायति ।**
**इत्याकल्पविकल्पतल्परचनासंकल्पलीलाशत-**
**व्यासक्तापि विना त्वया वरतनुर्नैषा निशां नेष्यति ॥ ३ ॥**

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे सोत्कण्ठ-वैकुण्ठो नाम षष्ठः सर्गः ।

अनुक्रमणिका

## सप्तमः सर्गः

### नागर-नारायणः

अत्रान्तरे च कुलटाकुलवर्त्मघात-
संजातपातक इव स्फुटलाञ्छनश्रीः ।
वृन्दावनान्तरमदीपयदंशुजालै-
र्दिक्सुन्दरीवदनचन्दनबिन्दुरिन्दुः ॥ १ ॥

प्रसरति शशधरबिम्बे विहितविलम्बे च माधवे विधुरा ।
विरचितविविधविलापं सा परितापं चकारोच्चैः ॥ २ ॥

### त्रयोदशः प्रबन्धः

(मालवरागयतितालाभ्यां गीयते ।)

कथितसमयेऽपि हरिरहह न ययौ वनं
मम विफलमिदममलरूपमपि यौवनम् ॥
यामि हे कमिह शरणं सखीजनवचनवञ्चिता ॥ ध्रुवम् ॥ यामि हे... ॥ १ ॥

यदनुगमनाय निशि गहनमपि शीलितम् ।
तेन मम हृदयमिदमसमशरकीलितम् ॥ यामि हे... ॥ २ ॥

मम मरणमेव वरमिति वितथकेतना ।
किमिह विषहामि विरहानलमचेतना ॥ यामि हे... ॥ ३ ॥

मामहह विधुरयति मधुरमधुयामिनी ।
कापि हरिमनुभवति कृतसुकृतकामिनी ॥ यामि हे... ॥ ४ ॥

अहह कलयामि वलयादिमणिभूषणम् ।
हरिविरहदहनवहनेन बहुदूषणम् ॥ यामि हे... ॥ ५ ॥

कुसुमसुकुमारतनुमतनुशरलीलया ॥
स्त्रगपि हृदि हन्ति मामतिविषमशीलया ॥ यामि हे... ॥ ६ ॥

अहमिह निवसामि नगणितवनवेतसा ।
स्मरति मधुसूदनो मामपि न चेतसा ॥ यामि हे... ॥ ७ ॥

हरिचरणशरणजयदेवकविभारती ।

अनुक्रमणिका

वसतु हृदि युवतिरिव कोमलकलावती ॥ यामि हे… ॥ ८ ॥

(इति त्रयोदशः प्रबन्धः ।)

तत्किं कामपि कामिनीमभिसृतः किं वा कलाकेलिभि-
बर्द्धो बन्धुभिरन्धकारिणि वनाभ्यर्णे किमुद्भ्राम्यति ।
कान्तः क्लान्तमना मनागपि पथि प्रस्थातुमेवाक्षमः
संकेतीकृतमञ्जुवञ्जुललताकुञ्जेऽपि यन्नागतः ॥ ३ ॥

अथागतां माधवमन्तरेण सखीमियं वीक्ष्य विषादमूकाम् ।
विशङ्कमाना रमितं कयापि जनार्दनं दृष्टवदेतदाह ॥ ४ ॥

## चतुर्दशः प्रबन्धः

(वसन्तरागयतितालाभ्यां गीयते ।)

स्मरसमरोचितविरचितवेषा ।
गलितकुसुमदलविलुलितकेशा ॥
कापि मधुरिपुणा विलसति युवतिरधिकगुणा ॥ ध्रुवम् ॥ कापि… ॥ १ ॥

हरिपरिरम्भणवलितविकारा ।
कुचकलशोपरि तरलितहारा ॥ कापि… ॥ २ ॥

विचलदलकललिताननचन्द्रा ।
तदधरपानरभसकृततन्द्रा ॥ कापि… ॥ ३ ॥

चञ्चलकुण्डलदलितकपोला ।
मुखरितरशनजघनगतिलोला ॥ कापि… ॥ ४ ॥

दयितविलोकितलज्जितहसिता ।
बहुविधकूजितरतिरसरसिता ॥ कापि… ॥ ५ ॥

विपुलपुलकपृथुवेपथुभङ्गा ।
श्वसितनिमीलितविकसदनङ्गा ॥ कापि… ॥ ६ ॥

श्रमजलकणभरसुभगशरीरा ॥
परिपतितोरसि रतिरणधीरा ॥ कापि… ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितहरिरमितम् ।

अनुक्रमणिका

कलिकलुषं जनयतु परिशमितम् ॥ कापि... ॥ ८ ॥

(इति चतुर्दशः प्रबन्धः ।)

विरहपाण्डुमुरारिमुखाम्बुजद्युतिरयं तिरयन्नपि वेदनाम् ॥
विधुरतीव तनोति मनोभुवः सुहृदये हृदये मदनव्यथाम् ॥ ५ ॥

**पञ्चदशः प्रबन्धः**

(गुर्जरीरागैकतालीतालेन गीयते ।)

समुदितमदने रमणीवदने चुम्बनवलिताधरे ।
मृगमदतिलकं लिखति सपुलकं मृगमिव रजनीकरे ॥
रमते यमुनापुलिनवने विजयी मुरारिरधुना ॥ ध्रुवम् ॥ रमते... ॥ १ ॥

घनचयरुचिरे रचयति चिकुरे तरलिततरुणानने ।
कुरबककुसुमं चपलासुषमं रतिपतिमृगकानने ॥ रमते... ॥ २ ॥

घटयति सुघने कुचयुगगगने मृगमदरुचिरूषिते ।
मणिसरममलं तारकपटलं नखपदशशिभूषिते ॥ रमते... ॥ ३ ॥

जितबिसशकले मृदुभुजयुगुले करतलनलिनीदले ।
मरकतवलयं मधुकरनिचयं वितरति हिमशीतले ॥ रमते... ॥ ४ ॥

रतिगृहजघने विपुलापघने मनसिजकनकासने ।
मणिमयरशनं तोरणहसनं विकिरति कृतवासने ॥ रमते... ॥ ५ ॥

चरणकिसलये कमलानिलये नखमणिगणपूजिते ।
बहिरपवरणं यावकभरणं जनयति हृदि योजिते ॥ रमते... ॥ ६ ॥

रमयति सुदृशं कामपि सुभृशं खलहलधरसोदरे ।
किमफलमवसं चिरमिह विरसं वद सखि विटपोदरे ॥ रमते... ॥ ७ ॥

इह रसभणने कृतहरिगुणने मधुरिपुपदसेवके ।
कलियुगरचितं न वसतु दुरितं कविनृपजयदेवके ॥ रमते... ॥ ८ ॥

नायातः सखि निर्दयो यदि शठस्त्वं दूति किं दूयसे
स्वच्छन्दं बहुवल्लभः स रमते किं तत्र ते दूषणम् ।
पश्याद्य प्रियसंगमाय दयितस्याकृष्यमाणं गुणै-

अनुक्रमणिका

रुत्कण्ठार्तिभरादिव स्फुटदिदं चेतः स्वर्ग यास्यति ॥ ६ ॥

(इति पञ्चदशः प्रबन्धः ।)

**षोडशः प्रबन्धः**

(देशवराडीरागेण रूपकतालेन गीयते ।)

अनिलतरलकुवलयनयनेन ।
तपति न सा किसलयशयनेन ॥
सखि या रमिता वनमालिना ॥ ध्रुवम् ॥ सखि या... ॥ १ ॥

विकसितसरसिजललितमुखेन ।
स्फुटति न सा मनसिजविशिखेन ॥ सखि या... ॥ २ ॥

अमृतमधुरमृदुतरवचनेन ।
ज्वलति न सा मलयजपवनेन ॥ सखि या... ॥ ३ ॥

स्थलजलरुहरुचिकरचरणेन ।
लुठति न सा हिमकरकिरणेन ॥ सखि या... ॥ ४ ॥

सजलजलदसमुदयरुचिरेण ।
दलति न सा हृदि चिरविरहेण ॥ सखि या... ॥ ५ ॥

कनकनिकषरुचिशुचिवसनेन ।
श्वसिति न सा परिजनहसनेन ॥ सखि या... ॥ ६ ॥

सकलभुवनजनवरतरुणेन ॥
वहति न सा रुजमतिकरुणेन ॥ सखि या... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितवचनेन ॥
प्रविशतु हरिरपि हृदयमनेन ॥ सखि या... ॥ ८ ॥

(इति षोडशः प्रबन्धः ।)

मनोभवानन्दन चन्दनानिल प्रसीद रे दक्षिण मुञ्च वामताम् ।
क्षणं जगत्प्राण विधाय माधवं पुरो मम प्राणहरो भविष्यसि ॥ ७ ॥

रिपुरिव सखीसंवासोऽयं शिखीव हिमानलो

अनुक्रमणिका

विषमिव सुधारश्मिर्यस्मिन्दुनोति मनोगते ।
हृदयमदये तस्मिन्नेवं पुनर्वलते बला-
त्कुवलयदृशां वामः कामो निकामनिरङ्कुशः ॥ ८ ॥

बाधां विधेहि मलयानिल पञ्चबाण
प्राणान् गृहाण न गृहं पुनराश्रयिष्ये ।
किं ते कृतान्तभगिनि क्षमया तरङ्गै-
रङ्गानि सिञ्च मम शाम्यतु देहदाहः ॥ ९ ॥

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे नागर-नारायणो नाम सप्तमः सर्गः ।

अनुक्रमणिका

## अष्टमः सर्गः

### विलक्ष-लक्ष्मीपतिः

अथ कथमपि यामिनीं विनीय
स्मरशरजर्जरितापि सा प्रभाते ।
अनुनयवचनं वदन्तमग्रे
प्रणतमपि प्रियमाह साभ्यसूयम् ॥ १ ॥

### सप्तदशः प्रबन्धः

(भैरवीरागयतितालाभ्यां गीयते ।)

रजनिजनितगुरुजागररागकषायितमलसनिवेशम् ।
वहति नयनमनुरागमिव स्फुटमुदितरसाभिनिवेशम् ॥

हरिहरि याहि माधव याहि केशव मा वद कैतववादम् ।
तामनुसर सरसीरुहलोचन या तव हरति विषादम् ॥ ध्रुवम् ॥ हरि०... ॥ १ ॥

कज्जलमलिनविलोचनचुम्बनविरचितनीलिमरूपम् ।
दशनवसनमरुणं तव कृष्ण तनोति तनोरनुरूपम् ॥ हरि०... ॥ २ ॥

वपुरनुहरति तव स्मरसङ्गरखरनखरक्षतरेखम् ।
मरकतशकलकलितकलधौतलिपेरिव रतिजयलेखम् ॥ हरि०... ॥ ३ ॥

चरणकमलगलदलक्तकसिक्तमिदं तव हृदयमुदारम् ।
दर्शयतीव बहिर्मदनद्रुमनवकिसलयपरिवारम् ॥ हरि०... ॥ ४ ॥

दशनपदं भवदधरगतं मम जनयति चेतसि खेदम् ॥
कथयति कथमधुनापि मया सह तव वपुरेतदभेदम् ॥ हरि०... ॥ ५ ॥

बहिरिव मलिनतरं तव कृष्ण मनोऽपि भविष्यति नूनम् ।
कथमथ वञ्चयसे जनमनुगतमसमशरज्वरदूनम् ॥ हरि०... ॥ ६ ॥

भ्रमति भवानबलाकवलाय वनेषु किमत्र विचित्रम् ।
प्रथयति पूतनिकैव वधूवधनिर्दयबालचरित्रम् ॥ हरि०... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितरतिवञ्चितखण्डितयुवतिविलापम् ।
शृणुत सुधामधुरं विबुधा विबुधालयतोऽपि दुरापम् ॥ हरि०... ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

(इति सप्तदशः प्रबन्धः।)

**तवेदं पश्यन्त्याः प्रसरदनुरागं बहिरिव**
**प्रियापादालक्तच्छुरितमरुणद्योति हृदयम्।**
**ममाद्य प्रख्यातप्रणयभरभङ्गेन कितव।**
**त्वदालोकः शोकादपि किमपि लज्जां जनयति ॥ २ ॥**

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे विलक्ष-लक्ष्मीपतिर्नाम अष्टमः सर्गः।

अनुक्रमणिका

## नवमः सर्गः

## मुग्ध-मुकुन्दः

तामथ मन्मथखिन्नां रतिरसभिन्नां विषादसंपन्नाम्।
अनुचिन्तितहरिचरितां कलहान्तरितामुवाच रहसि सखी ॥ १ ॥

### अष्टादशः प्रबन्धः

(गुर्जरीरागयतितालाभ्यां गीयते।)

हरिरभिसरति वहति मधुपवने
किमपरमधिकसुखं सखि भवने ॥
माधवे मा कुरु मानिनि मानमये ॥ ध्रुवम् ॥ माधवे... ॥ १ ॥

तालफलादपि गुरुमतिसरसम्।
किं विफलीकुरुषे कुचकलशम् ॥ माधवे... ॥ २ ॥

कति न कथितमिदमनुपदमचिरम्।
मा परिहर हरिमतिशयरुचिरम् ॥ माधवे ॥ ३ ॥

किमिति विषीदसि रोदिषि विकला।
विहसति युवतिसभा तव सकला ॥ माधवे... ॥ ४ ॥

सजलनलिनदलशीतलशयने।
हरिमवलोकय सफलय नयने ॥ माधवे... ॥ ५ ॥

जनयसि मनसि किमिति गुरुखेदम्।
शृणु मम वचनमनीहितभेदम् ॥ माधवे... ॥ ६ ॥

हरिरुपयातु वदतु बहुमधुरम्।
किमिति करोषि हृदयमतिविधुरम् ॥ माधवे... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितमतिललितम्।
सुखयतु रसिकजनं हरिचरितम् ॥ माधवे... ॥ ८ ॥

(इति अष्टादशः प्रबन्धः।)

स्निग्धे यत्परुषासि यत्प्रणमति स्तब्धासि यद्रागिणि

अनुक्रमणिका

**द्वेषस्थासि यदुन्मुखे विमुखतां यातासि तस्मिन्प्रिये।**
**तद्युक्तं विपरीतकारिणि तव श्रीखण्डचर्चा विषं**
**शीतांशुस्तपनो हिमं हुतवहः क्रीडामुदो यातनाः ॥ २ ॥**

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे मुग्ध-मुकुन्दो नाम नवमः सर्गः।

अनुक्रमणिका

## दशमः सर्गः

### चतुर-चतुर्भुजः

अत्रान्तरे मसृणरोषवशामपार-
निःश्वासनिः सहमुखीं सुमुखीमुपेत्य।
सव्रीडमीक्षितसखीवदनां दिनान्ते
सानन्दगद्‌गदपदं हरिरित्युवाच ॥ १ ॥

### एकोनविंशतितमः प्रबन्धः

(देशवराडीरागाष्टतालाभ्यां गीयते।)

वदसि यदि किञ्चिदपि दन्तरुचिकौमुदी
हरति दरतिमिरमतिघोरम्।
स्फुरदधरसीधवे तव वदनचन्द्रमा
रोचयतु लोचनचकोरम् ॥

प्रिये चारुशीले मुञ्च मयि मानमनिदानम्।
सपदि मदनानलो दहति मममानसं
देहि मुखकमलमधुपानम् ॥ ध्रुवम् ॥ प्रिये... ॥ १ ॥

सत्यमेवासि यदि सुदति मयि कोपिनी
देहि खरनखरशरघातम्।
घटय भुजबन्धनं जनय रदखण्डनं
येन वा भवति सुखजातम् ॥ प्रिये... ॥ २ ॥

त्वमसि मम भूषणं त्वमसि मम जीवनं
त्वमसि मम भवजलधिरत्नम्।
भवतु भवतीह मयि सततमनुरोधिनी
तत्र मम हृदयमतियत्नम् ॥ प्रिये... ॥ ३ ॥

नीलनलिनाभमपि तन्वि तव लोचनं
धारयति कोकनदरूपम्।
कुसुमशरबाणभावेन यदि रञ्जयसि
कृष्णमिदमेतदनुरूपम् ॥ प्रिये... ॥ ४ ॥

स्फुरतु कुचकुम्भयोरुपरि मणिमञ्जरी
रञ्जयतु तव हृदयदेशम्।

अनुक्रमणिका

रसतु रशनापि तव घनजघनमण्डले
घोषयतु मन्मथनिदेशम् ॥ प्रिये... ॥ ५ ॥

स्थलकमलगञ्जनं मम हृदयरञ्जनं
जनितरतिरङ्गपरभागम् ।
भण मसृणवाणि करवाणि पदपङ्कजं
सरसलसदलक्तकरागम् ॥ प्रिये... ॥ ६ ॥

स्मरगरलखण्डनं मम शिरसि मण्डनं
धेहि पदपल्लवमुदारम् ।
ज्वलति मयि दारुणो मदनकदनारुणो
हरतु तदुपाहितविकारम् ॥ प्रिये... ॥ ७ ॥

इति चटुलचाटुपटुचारु मुरवैरिणो
राधिकामधि वचनजातम् ।
जयति जयदेवकविभारतीभूषितं
मानिनीजनजनितशातम् ॥ प्रिये... ॥ ८ ॥

(इति एकोनविंशतितमः प्रबन्धः ।)

परिहर कृतातङ्के शङ्कां त्वया सततं घन-
स्तनजघनयाक्रान्ते स्वान्ते परानवकाशिनी ।
विशति वितनोरन्यो धन्यो न कोऽपि ममान्तरं
प्रणयिनि परीरम्भारम्भे विधेहि विधेयताम् ॥ २ ॥

मुग्धे विधेहि मयि निर्दयदन्तदंशं
दोर्वल्लिबन्धनिबिडस्तनपीडनानि ।
चण्डि त्वमेव मुदमञ्च न पञ्चबाण-
चण्डालकाण्डदलनादसवः प्रयान्ति ॥ ३ ॥

व्यथयति वृथा मौनं तन्वि प्रपञ्चय पञ्चमं
तरुणि मधुरालापैस्तापं विनोदय दृष्टिभिः ।
सुमुखि विमुखीभावं तावद्विमुञ्च न मुञ्च मां
स्वयमतिशयस्निग्धो मुग्धे प्रियोऽहमुपस्थितः ॥ ४ ॥

बन्धूकद्युतिबान्धवोऽयमधरः स्निग्धो मधूकच्छवि-
र्गण्डश्चण्डि चकास्ति नीलनलिनश्रीमोचनं लोचनम् ॥
नासाभ्येति तिलप्रसूनपदवीं कुन्दाभदन्ति प्रिये ।
प्रायस्त्वन्मुखसेवया विजयते विश्वं स पुष्पायुधः ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

**दृशौ तव मदालसे वदनमिन्दुसंदीपकं**
**गतिर्जनमनोरमा विजितरम्भमूरुद्वयम् ।**
**रतिस्तव कलावती रुचिरचित्रलेखे भ्रुवा-**
**वहो विबुधयौवतं वहसि तन्वि पृथ्वीगता ॥ ६ ॥**

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे चतुर-चतुर्भुजो नाम दशमः सर्गः ।

अनुक्रमणिका

## एकादशः सर्गः

## सानन्द-दामोदरः

सुचिरमनुनयेन प्रीणयित्वा मृगाक्षीं
गतवति कृतवेशे केशवे कुञ्जशय्याम् ।
रतिरुचिरविभूषां दृष्टिमोषे प्रदोषे
स्फुरति निरवसादां कापि राधां जगाद ॥ १ ॥

### विंशतितमः प्रबन्धः

(वसन्तरागयतितालाभ्यां गीयते ।)

विरचितचाटुवचनरचनं चरणे रचितप्रणिपातम् ।
सम्प्रति मञ्जुलवञ्जुलसीमनि केलिशयनमनुयातम् ॥
मुग्धे मधुमथनमनुगतनुसर राधिके ॥ ध्रुवम् ॥ मुग्धे... ॥ १ ॥

घनजघनस्तनभारभरे दरमन्थचरणविहारम् ।
मुखरितमणिमञ्जीरमुपैहि विधेहि मरालविकारम् ॥ मुग्धे... ॥ २ ॥

शृणु रमणीयतरं तरुणीजनमोहनमधुपविरावम् ।
कुसुमशरासनशासनबन्दिनि पिकनिकरे भज भावम् ॥ मुग्धे... ॥ ३ ॥

अनिलतरलकिसलयनिकरेण करेण लतानिकुरम्बम् ।
प्रेरणमिव करभोरु करोति गतिं प्रति मुञ्च विलम्बम् ॥ मुग्धे... ॥ ४ ॥

स्फुरितमनङ्गतरङ्गवशादिव सूचितहरिपरिरम्भम् ।
पृच्छ मनोहरहारविमलजलधारममुं कुचकुम्भम् ॥ मुग्धे... ॥ ५ ॥

अधिगतमखिलसखीभिरिदं तव वपुरपि रतिरणसज्जम् ।
चण्डि रणितरशनारवडिण्डिममभिसर सरमतलज्जम् ॥ मुग्धे... ॥ ६ ॥

स्मरशरसुभगनखेन करेण सखीमवलम्ब्य सलीलम् ।
चल वलयक्वणितैरवबोधय हरिमपि निजगतिशीलम् ॥ मुग्धे... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितमधरीकृतहारमुदासितवामम् ।
हरिविनिहितमनसामधितिष्ठतु कण्ठतटीमविरामम् ॥ मुग्धे... ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

(इति विंशतितमः प्रबन्धः।)

सा मां द्रक्ष्यति वक्ष्यति स्मरकथां प्रत्यङ्गमालिङ्गनैः
प्रीतिं यास्यति रंस्यते सखि समागत्येति चिन्ताकुलः।
स त्वां पश्यति वेपते पुलकयत्यानन्दति स्विद्यति
प्रत्युद्गच्छति मूर्च्छति स्थिरतमःपुञ्जे निकुञ्जे प्रियः ॥ २ ॥

अक्ष्णोर्निक्षिपदञ्जनं श्रवणयोस्तापिच्छगुच्छावलीं
मूर्ध्नि श्यामसरोजदाम कुचयोः कस्तूरिकापत्रकम्।
धूर्तानामभिसारभ्रमजुषां विष्वङ्निकुञ्जे सखि
ध्वान्तं नीलनिचोलचारु सुदृशा प्रत्यङ्गमालिङ्गति ॥ ३ ॥

काश्मीरगौरवपुषामभिसारिकाणा-
माबद्धरेखमभितो रुचिमञ्जरीभिः।
एतत्तमालदलनीलतमं तमिस्रं
तत्प्रेमहेमनिकषोपलतां तनोति ॥ ४ ॥

हारावलीतरलकाञ्चनकाञ्चिदाम-
केयूरकङ्कणमणिद्युतिदीपितस्य।
द्वारे निकुञ्जनिलयस्य हरिं निरीक्ष्य
व्रीडावतीमथ सखीमियमित्युवाच ॥ ५ ॥

## एकविंशतितमः प्रबन्धः

(वराडीरागरूपकतालाभ्यां गीयते।)

मञ्जुतरकुञ्जतलकेलिसदने।
विलस रतिरभसहसितवदने ॥
प्रविश राधे माधवसमीपमिह ॥ ध्रुवम् ॥ प्रविश... ॥ १ ॥

नवभवदशोकदलशयनसारे।
विलस कुचकलशतरलहारे ॥ प्रविश... ॥ २ ॥

कुसुमचयरचितशुचिवासगेहे।
विलस कुसुमसुकुमारदेहे ॥ प्रविश... ॥ ३ ॥

चलमलयवनपवनसुरभिशीते।
विलस रसवलितललितगीते ॥ प्रविश... ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

विततबहुवल्लिनवपल्लवघने।
विलस चिरमलसपीनजघने ॥ प्रविश...॥ ५ ॥

मधुमुदितमधुपकुलकलितरावे।
विलस मदनरससरसभावे ॥ प्रविश...॥ ६ ॥

मधुरतरपिकनिकरनिनदमुखरे।
विलस दशनरुचिरुचिरशिखरे ॥ प्रविश...॥ ७ ॥

विहितपद्मावतीसुखसमाजे।
कुरु मुरारे मङ्गलशतानि।
भणति जयदेवकविराजराजे ॥ प्रविश...॥ ८ ॥

(इति एकविशंतितमः प्रबन्धः।)

त्वां चित्तेन चिरं वहन्नयमतिश्रान्तो भृशं तापितः
कन्दर्पेण च पातुमिच्छति सुधासंबाधबिम्बाधरम्।
अस्याङ्कं तदलंकुरु क्षणमिह भ्रूक्षेपलक्ष्मीलव-
क्रीते दास इवोपसेवितपदाम्भोजे कुतः संभ्रमः ॥ ६ ॥

सा ससाध्वससानन्दं गोविन्दे लोललोचना।
सिञ्जानमञ्जुमञ्जीरं प्रविवेशाभिवेशनम् ॥ ७ ॥

## द्वाविंशतितमः प्रबन्धः

(वराडीरागयतितालाभ्यां गीयते।)

राधावदनविलोकनविकसितविविधविकारविभङ्गम्।
जलनिधिमिव विधुमण्डलदर्शनतरलिततुङ्गतरङ्गम् ॥

हरिमेकरसं चिरमभिलषितविलासम्।
सा ददर्श गुरुहर्षवशंवदवदनमनङ्गनिवासम ॥ ध्रुवम् ॥ हरि०... ॥ १ ॥

हारममलतरतारमुरसि दधतं परिरभ्य विदूरम्।
स्फुटतरफेनकदम्बकरम्बितमिव यमुनाजलपूरम् ॥ हरि०... ॥ २ ॥

श्यामलमृदुलकलेवरमण्डलमधिगतगौरदुकूलम्।
नीलनलिनमिव पीतपरागपटलभरवलयितमूलम् ॥ हरि०... ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

तरलदृगञ्चलचलनमनोहरवदनजनितरतिरागम् ।
स्फुटकमलोदरखेलितखञ्जनयुगमिव शरदि तडागम् ॥ हरि॰... ॥ ४ ॥

वदनकमलपरिशीलनमिलितमिहिरसमकुण्डलशोभम् ।
स्मितरुचिरुचिरसमुल्लसिताधरपल्लवकृतरतिलोभम् ॥ हरि॰... ॥ ५ ॥

शशिकिरणच्छुरितोदरजलधरसुन्दरसकुसुमकेशम् ।
तिमिरोदितविधुमण्डलनिर्मलमलयजतिलकनिवेशम् ॥ हरि॰... ॥ ६ ॥

विपुलपुलकभरदन्तुरितं रतिकेलिकलाभिरधीरम् ।
मणिगणकिरणसमूहसमुज्ज्वलभूषणसुभगशरीरम् ॥ हरि॰... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितविभवद्विगुणीकृतभूषणभारम् ।
प्रणमत हृदि विनिधाय हरिं सुचिरं सुकृतोदयसारम् ॥ हरि॰... ॥ ८ ॥

(इति द्वाविंशतितमः प्रबन्धः ।)

अतिक्रम्यापाङ्गं श्रवणपथपर्यन्तगमन-
प्रयासेनेवाक्ष्णोरमलतरतारं गमितयोः ।
इदानीं राधायाः प्रियतमसमायातसमये
पपात स्वेदाम्बुप्रसर इव हर्षाश्रुनिकरः ॥ ८ ॥

भजन्त्यास्तल्पान्तं कृतकपटकण्डूतिपिहित-
स्मितं याते गेहाद्बहिरवहितालीपरिजने ।
प्रियास्यं पश्यन्त्याः स्मरपरवशाकूतसुभगं
सलज्ज्ञा लज्ज्ञापि व्यगमदिव दूरं मृगदृशः ॥ ९ ॥

इति जयदेवकृतौ श्रीगीतगोविन्दे सानन्द-दामोदरो नामैकादशः सर्गः ।

अनुक्रमणिका

## द्वादशः सर्गः

### सुप्रीत-पीताम्बरः

गतवति सखीवृन्देऽमन्दत्रपाभरनिर्भर-
स्मरपरवशाकूतस्फीतस्मितस्नपिताधराम् ।
सरसमनसं दृष्ट्वा राधां मुहुर्नवपल्लव-
प्रसवशयने निक्षिप्ताक्षीमुवाच हरिः प्रियाम् ॥ १ ॥

### त्रयोविंशतितमः प्रबन्धः

(विभासरागैकतालाभ्यां गोयते ।)

किसलयशयनतले कुरु कामिनि चरणनलिनविनिवेशम् ।
तव पदपल्लववैरिपराभवमिदमनुभवतु सुवेशम् ॥
क्षणमधुना नारायणमनुगतमनुसर मां राधिके ॥ ध्रुवम् ॥ क्षण०... ॥ १ ॥

करकमलेन करोमि चरणमहमागमितासि विदूरम् ।
क्षणमुपकुरु शयनोपरि मामिव नूपुरमनुगतिशूरम् ॥ क्षण०... ॥ २ ॥

वदनसुधानिधिगलितममृतमिव रचय वचनमनुकूलम् ।
विरहमिवापनयामि पयोधररोधकमुरसि दुकूलम् ॥ क्षण०... ॥ ३ ॥

प्रियपरिरम्भणरभसवलितमिव पुलकितमतिदुरवापम् ।
मदुरसि कुचकलशं विनिवेशय शोषय मनसिजतापम् ॥ क्षण०... ॥ ४ ॥

अधरसुधारसमुपनय भामिनि जीवय मृतमिव दासम् ।
त्वयि विनिहतमनसं विरहानलदग्धवपुषमविलासम् ॥ क्षण०... ॥ ५ ॥

शशिमुखि मुखरय मणिरशनागुणमनुगुणकण्ठनिनादम् ।
श्रुतियुगले पिकरुतविकले मम शमय चिरादवसादम् ॥ क्षण०... ॥ ६ ॥

मामतिविफलरुषा विकलीकृतमवलोकितुमधुनेदम् ।
मीलितलज्जितमिव नयनं तव विरम विसृज रतिखेदम् ॥ क्षण०... ॥ ७ ॥

श्रीजयदेवभणितमिदमनुपदनिगदितमधुरिपुमोदम् ।
जनयतु रसिकजनेषु मनोरमरतिरसभावविनोदम् ॥ क्षण०... ॥ ८ ॥

(इति त्रयोविंशतितमः प्रवन्धः ।)

अनुक्रमणिका

प्रत्यूहः पुलकाङ्कुरेण निबिडाश्लेषे निमेषेण च
क्रीडाकूतविलोकितेऽधरसुधापाने कथानर्मभिः ।
आनन्दाधिगमेन मन्मथकलायुद्धेऽपि यस्मिन्नभू-
दुद्भूतः स तयोर्बभूव सुरतारम्भः प्रियंभावुकः ॥ २ ॥

दोर्म्यां संयमितः पयोधरभरेणापीडितः पाणिजै-
राविद्धो दशनैः क्षताधरपुटः श्रोणीतटेनाहतः ।
हस्तेनानमितः कचेऽधरमधुस्यन्देन संमोहितः ।
कान्तः कामपि तृप्तिमाप तदहो कामस्य वामा गतिः ॥ ३ ॥

वामाङ्गे रतिकेलिसंकुलरणाम्भे तया साहस-
प्रायं कान्तजयाय किञ्चिदुपरि प्रारम्भि यत्संभ्रमात् ।
निष्पन्दा जघनस्थली शिथिलिता दोर्वल्लिरुत्कम्पितं
वक्षो मिलितमक्षि पौरुषरसः स्त्रीणां कुतः सिध्यति ॥ ४ ॥

तस्याः पाटलपाणिजाङ्कितमुरो निद्राकषाये दृशौ
निर्धौतोऽधरशोणिमा विलुलितस्रस्तस्रजो मूर्धजाः ।
काञ्चीदाम दरश्लथाञ्चलमिति प्रातर्निवातैर्दृशो-
रेभिः कामरैस्तदद्भुतमभूत् पत्युर्मनः कीलितम् ॥ ५ ॥

व्याकोशः केशपाशस्तरलितमलकैः स्वेदमोक्षौ कपोलौ
क्लिष्टा बिम्बाधरश्रीः कुचकलशरुचा हारिता हारयष्टिः ।
काञ्चीकान्तिर्हताशा स्तनजघनपदं पाणिनाच्छाद्य सद्यः
पश्यन्ती सत्रपा सा तदपि विलुलिता मुग्धकान्तिर्धिनोति ॥ ६ ॥

ईषन्मीलितदृष्टि मुग्धविलसत्सीकारधारावशा-
दव्यक्ताकुलकेलिकाकुविकसद्दन्तांशुधौताधरम् ।
शान्तस्तब्धपयोधरं भृशपरिष्वङ्गात्कुरङ्गीदृशो
हर्षोत्कर्षविमुक्तनिः सहतनोर्धन्यो धयत्याननम् ॥ ७ ॥

अथ सहसा सुप्रीता सुरतान्ते सा नितान्तखिन्नाङ्गी ।
राधा जगाद सादरमिदमानन्देन गोविन्दम् ॥ ८ ॥

### चतुर्विंशतितमः प्रबन्धः

(रामकरीरागयतितालाभ्यां गीयते ।)

कुरु यदुनन्दन चन्दनशिशिरतरेण करेण पयोधरे ।
मृगमदपत्रकमत्र मनोभवमङ्गलकलशमहोदरे ॥

अनुक्रमणिका

निजगाद सा यदुनन्दने क्रीडति हृदयानन्दने ॥ ध्रुवम् ॥ निज०... ॥ १ ॥

अलिकुलगञ्जनमञ्जनकं रतिनायकसायकमोचने ।
त्वदधरचुम्बनलम्बितकज्जलमुज्ज्वलय प्रिय लोचने ॥ निज०... ॥ २ ॥

नयनकुरङ्गतरङ्गविकासनिरासकरे श्रुतिमण्डले ।
मनसिजपाशविलासधरे शुभवेश निवेशय कुण्डले ॥ निज०... ॥ ३ ॥

भ्रमरचयं रचयन्तमुपरि रुचिरं सुचिरं मम संमुखे ।
जितकमले विमले परिकर्मय नर्मजनकमलकं मुखे ॥ निज०... ॥ ४ ॥

मृगमदरसवलितं ललितं कुरु तिलकमलिकरजनीकरे ।
विहितकलङ्ककलं कमलानन विश्रमितश्रमशीकरे ॥ निज०... ॥ ५ ॥

मम रुचिरे चिकुरे कुरु मानद मनसिजध्वजचामरे ।
रतिगलिते ललिते कुसुमानि शिखण्डिशिखण्डकडामरे ॥ निज०... ॥ ६ ॥

सरसघने जघने मम शम्बरदारणवारणकन्दरे ।
मणिरशनावसनाभरणानि शुभाशय वासय सुन्दरे ॥ निज०... ॥ ७ ॥

श्रीजयदेववचसि रुचिरे हृदयं सदयं कुरु मण्डने ।
हरिचरणस्मरणामृतनिर्मितकलिकलुषज्वरखण्डने ॥ निज०... ॥ ८ ॥

(इति चतुर्विंशतितमः प्रबन्धः ।)

रचय कुचयोः पत्रं चित्रं कुरुष्व कपोलयो-
घर्टय जघने काञ्चीं मुग्धस्रजा कबरीभरम् ।
कलय वलयश्रेणीं पाणौ पदे मणिनूपुरा-
विति निगदितः प्रीतः पीताम्बरोऽपि तथाकरोत् ॥ ९ ॥

यद् गान्धर्वकलासु कौशलमनुध्यानं च यद्वैष्णवं
यच्छृङ्गारविवेकतत्त्वरचनाकाव्येषु लीलायितम् ।
तत्सर्वं जयदेवपण्डितकवेः कृष्णैकतानात्मनः
सानन्दाः परिशोधयन्तु सुधियः श्रीगीतगोविन्दतः ॥ १० ॥

साध्वी माध्वीक चिन्ता न भवति भवतः शर्करे कर्कशासि
द्राक्षे द्रक्ष्यन्ति के त्वाममृत मृतमसि क्षीर नीरं रसस्ते ।
माकन्द क्रन्द कान्ताधर धरणितलं गच्छ यच्छन्ति भावं
यावच्छृङ्गारसारं शुभमिह जयदेवस्य वैदग्ध्यवाचः ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

**श्रीभोजदेवप्रभवस्य रामादेवीसुतश्रीजयदेवकास्य ।**
**पराशरादिप्रियवर्गकण्ठे श्रीगीतगोविन्दकवित्वमस्तु ॥ १२ ॥**

इति श्रीजयदेवकृतौ गीतगोविन्दे सुप्रीत-पीताम्बरो नाम द्वादशः सर्गः

**समाप्तं चेदं काव्यम् ।**

अनुक्रमणिका

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

अनुक्रमणिका